## लष्कराच्या ऑर्डिनन्स फॅक्ट्रीत स्फोट, २ ठार

■ वृत्तसंस्था, जबलपूर, दि. २२:
जबलपूरच्या आयुध निर्माणी खमारियामध्ये मंगळवारी सकाळी भीषण स्फोट झाला. यात २ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला तर १० हून अधिक जळाले आहेत. दोघांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कारखाना व्यवस्थापनाने घटनास्थळ गाठून तपास सुरू केला आहे. कारखान्याच्या एफ -६ विभागातील इमारत क्रमांक २०० मध्ये हा स्फोट झाला. स्फोटानंतर एक कर्मचारी बेपत्ता होता, त्याचा मृतदेह सापडला आहे. त्याचवेळी अन्य एका कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत.

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १९६ * * नागपूर *
बुधवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018
महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

अग्रग्रलेख **खरीखरी...**

## चंद्राबाबूंचे काय चुकले

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू हे सध्याच्या केंद्र सरकारचे अघोषित नेते आहेत. सरकार जरी एनडीए किंवा भारतीय जनता पक्षाचे असले. तरी या सरकारच्या कुलपाची किल्ली चंद्राबाबू यांच्याजवळ आहे, हे उघड आहे. नेपाळचे राजे एका घराण्याचे असले तरी कोणे एके काळी नेपाळची राजसत्ता राणा घराण्याकडे होती. यामुळेच चंद्राबाबू जे म्हणतात, त्याला महत्त्व येते. परवा चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशातील जनतेने म्हणजेच तरुण जोडप्यांनी दोनपेक्षा अधिक मुलांना जन्म द्यावा, असे म्हटले आहे. ज्याला दोन पेक्षा जास्त मुले असतील त्यालाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत उभे राहता येईल. असे विधेयक चंद्राबाबा नायडू त्यांच्या विधानसभेत आणणार आहेत. कोणी म्हणत असेल की, चंद्राबाबूंचा हा निर्णय घड्याळ्याचे काटे उलटे फिरवण्यासारखा आहे. तर ती गोष्ट खरीच आहे. भारतीय जनतेमध्ये अनादी काळापासून अनेक अपत्यांना जन्म देण्याची परंपरा होती. स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीनंतर हळूहळू देशातील वाढलेल्या जनतेमुळे अनेक समस्या उत्पन्न होत होत्या. त्यासाठी कुटुंब नियोजन करणे गरजेचे आहे. असे वारंवार सांगितले जात होते. काही विशिष्ट समाज सोडल्यास बहुसंख्य समाजात हळूहळू दोन किंवा तीन अपत्यांपर्यंत ही संख्या मर्यादित झाली. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये ही संख्या आणखी खाली आली आहे. अनेक शिकले- सवरलेले लोक किंवा पती-पत्नी दोघेही नोकरी करणारे असतील. तर एकतर एका मुलापुरते किंवा विनापत्य राहू इच्छितात. ही सुशिक्षित भारतीयांची सध्याची स्थिती आहे. महाराष्ट्रापासून सुरुवात केली. तर महाराष्ट्र हा उत्तर आणि दक्षिण यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. महाराष्ट्राच्या उत्तरेकडे हिंदी भाषीक पट्टा सुरू होतो आणि त्या पट्ट्यात अनेक पट्टे आजही कुटुंब नियोजनाला फुली मारून अधिकाधिक अपत्यांना जन्म देण्याचे पुण्यकर्म अगदी मनापासून करीत असतात. त्यामुळेच महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील लोकसंख्येचे प्रमाण ज्या प्रमाणात कमी झालेले आहे. त्याची तुलना हिंदी पट्ट्यातील राज्यांशी केली. तर हे प्रकरण वेगळेच कसे आहे हे दिसून येते. या गदारोळात पुन्हा लोकसंख्येच्या मतदारसंघाचे परिसीमन करण्यात आले. तर उत्तर प्रदेश आणि बिहार यांच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढतील. मग त्या तुलनेत दक्षिण भारत मागे पडेल. आता चंद्राबाबूंच्या या म्हणण्याचा अर्थ काय आहे. हे आम्हाला माहीत नाही. पण राष्ट्रीय पातळीवर विचार केला तर हा समतोल अन्यायकारक आहे, असे निश्चितच म्हणता येईल. चंद्राबाबू म्हणतात की, आपण आधी लोकसंख्या नियंत्रणाचे समर्थक होतो. पण आता जे काही चित्र दिसते आहे. त्यात अनेक गावांमध्ये केवळ जेष्ठ नागरिकच दिसत आहेत. म्हणजेच आंध्र प्रदेशातही गावागावात कुटुंबांचे परिपूर्ण नियोजन झालेले आहे. अवाढव्य चीन देशाने काही वर्षांपूर्वी एका जोडप्याला फक्त एकच अपत्य असे सरकारी धोरण ठरवले होते. त्याचे सक्तीने पालनही केले गेले. पण आता चीनमधील ज्येष्ठांची संख्या बेसुमार वाढली आहे. त्या तुलनेत तरुणांची कमतरता जाणवण्याइतपत कमी झालेली आहे. यामुळेच आता जिनपिंग सरकारने आता चिंगपिंग करीत जास्त मुले प्रसवण्याचा कायदा केलेला आहे. पण आताच्या परिस्थितीत मुलांची कटकट नको. असाच सर्वसाधारण सुर चीनमध्ये सुद्धा निघालेला आहे. एकांगी विचार केला तर धोरण धपाटा कसा उलटू शकतो. याचा हा सुस्पष्ट पुरावा आहे. आता चंद्राबाबू यांच्या विधानाकडे वळूया. चंद्रबाबूंनी काहीही म्हटले तरी त्यांच्या किंवा दक्षिणेकडच्या इतर राज्यात फारसा फरक पडेल, असे आज तरी दिसत नाही. सध्याच्या घडीला दरवर्षी वाढणा?या आपल्या लोकसंख्येला आटोक्यात आणणे सुरू आहे आणि समजा, स्थानिक स्वराज्य संस्थेत दोन पेक्षा अधिक मुले असलेल्यांनाच उभे राहता येईल. असा कायदा केला तर तो राष्ट्रीय धोरणाच्या विरुद्ध असेल. मग तो सर्वोच्च न्यायालयापर्यंत टिकेलच. असे आम्हाला तरी वाटत नाही. आधीच आपल्याकडे खाणारी तोंडे जास्त आणि साधन संपत्ती कमी अशी स्थिती आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आताचा भारत म्हणजे भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यात सगळी मिळून फक्त 40 कोटी लोकसंख्या होती. आता या ठिकाणची संपूर्ण लोकसंख्या जवळपास 200 कोटी आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये ही लोकसंख्या पाचपटीने वाढलेली आहे. म्हणजेच चंद्राबाबू म्हणतात त्यातही फारशा पटतीलच, अशा गोष्टी नाहीत आणि भारतातील कुटुंबीयांना सर्वधर्म समभावात आणण्यात आले नाही. तर लोकसंख्या वाढीचे भूत कधीच आपल्या मानगुटी वरून खाली उतरणार नाही. हेही तितकेच खरे आहे. यामुळेच गोंधळलेल्या चंद्राबाबू यांच्या मनातील शंका कुशंका कशा दूर करता येतील. याचा विचार आपण केला पाहिजे. चंद्राबाबूंच्या प्रदेशातच नाही, तर सर्व भारतातच खेड्यापाड्यातील मुले शहराकडे धावत आहेत. त्यामुळेही त्यांना जो भास होत आहे. तो बरोबर आहे असे म्हणता येणार नाही. प्रादेशिक असमतोल आणि लोकसंख्या वाढीचा समतोल याची सांगड घालणे गरजेचे आहे. हाच चंद्राबाबूंच्या विधानाचा अर्थ आहे, असे आम्हाला वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## बाळासाहेब थोरात साधणार काँग्रेसकडून समन्वय...

# प्रदेशाध्यक्ष पटोलेंना चाप?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२:
महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) या दोन पक्षांत गेल्या काही दिवसात उडालेले खटके, त्यातून आलेली टोकाची विधाने आणि निर्माण झालेले एकमेकांविषयीचे अविश्वासाचे वातावरण लक्षात घेता काँग्रेस पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीत समन्वय साधण्याची जबाबदारी आमदार बाळासाहेब थोरात यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे.

राज्यातील काँग्रेस नेत्यांना काल दिल्लीत पाचरण करण्यात आले होते. त्या सर्वांसमोर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी थोरात यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी सोपवली. या नव्या जबाबदारीने थोरात यांचे पक्षाअंतर्गत वजन वाढल्याचे तर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना चाप लावण्यात आल्याचे सांगितले जाते.

जागा वाटपाच्या कारणावरून खासदार संजय राऊत यांनी नाना पटोले यांना लक्ष केले. पटोले यांनीही त्यांना उत्तर दिल्याने मोठे शाब्दिक युद्ध रंगले. त्याचे पडसाद महाविकास आघाडीत उमटले. नंतर या उभयतांनी माध्यमांसमोर येत सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. हे पान उलटत नाही तोच खासदार संजय राऊत दिल्लीत गृहमंत्री



अमित शहा यांना भेटले, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांचीही गुप्त भेट झाल्याची बातमी पसरली. एवढेच नाही तर स्वबळावर लढण्याची भाषाही बोलली गेली.

राज्यातील या घडामोडींवर लक्ष ठेवून असलेल्या काँग्रेसच्या श्रेष्ठींनी महाराष्ट्रातील नेत्यांना काल दिल्लीत पाचारण केले. सर्वांशी चर्चा केल्यानंतर समन्वयाची जबाबदारी थोरात यांच्यावर सोपवण्याचा निर्णय पक्षाच्या श्रेष्ठींनी घेतला. थोरात यांनीही उत्साहाने नवी जबाबदारी स्वीकारत आज राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली. नंतर ते शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचीही भेट घेणार असल्याची माहिती मिळाली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे मूलतः आक्रमक स्वभावाचे नेते म्हणून ओळखले जातात. भाजप मधून त्यांचा झालेला काँग्रेस प्रवेश, विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष पद आश्चर्यकारकरीत्या सोडणे आणि अन्य काही गोष्टींमुळे काँग्रेस पक्षात त्यांच्याविषयी अविश्वासाचे वातावरण आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर राऊत आणि त्यांच्यात शाब्दिक खटके उडाल्याचे तत्कालीन कारण पटोले यांना महागात पडले आहे.

## अजित पवारांच्या गटातच घड्याळाची टिकटिक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२:

**दादांना सर्वोच्च दिलासा**



सर्वोच्च न्यायालयाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा दिलासा दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने एका याचिकेद्वारे राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आलेले घड्याळ हे चिन्ह गोठवून त्या जागी दुसरे चिन्ह देण्याची मागणी केली होती. पण सुप्रीम कोर्टाने त्यांची ही मागणी धुडकावून लावली. यामुळे विधानसभा निवडणुकीच्या ऐन धामधुमीत अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर होण्या आधीच आमदार अपात्र प्रकरणाचा निकाल न्यायालयाने द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे तथा शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आली होती. मात्र आता आचारसंहिता लागल्यामुळे या बाबत शरद पवार गट अधिक आक्रमक झाला होता. निवडणुका जाहीर झाल्या तरी अद्याप या प्रकरणाचा निकाल समोर आला नव्हता. या प्रकरणाचा निकाल आता आला आहे. यात अजित पवारांना मोठा दिलासा मिळाला असून शरद पवार गटाची याचिका फेटाळण्यात आली आहे.

सप्टेंबर महिन्यामध्ये हे प्रकरण तब्बल आठ वेळा सूचीबद्ध करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात देखील हे प्रकरण तीन वेळा सूचीबद्ध करण्यात आले होते. मात्र यातील एकाही वेळी या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नव्हती. गेल्या काही महिन्यांमध्ये या प्रकरणाला तारीख पे तारीख मिळत होती. त्यामुळे विरोधकांच्या वतीने न्यायालयावर देखील टीका करण्यात येत होती. मात्र, आता या प्रकरणात न्यायालयाने निर्णय दिला आहे.

## मोदी-पुतिन यांची गळाभेट



■ वृत्तसंस्था, मास्को, दि. २२ :
ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी रशियातील कझान शहरात पोहोचले. येथे त्यांनी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यादरम्यान पुतिन म्हणाले, आमचे संबंध इतके चांगले आहेत की मी जे बोलतो ते तुम्हाला ट्रांसलेटर (अनुवादक) शिवाय समजते.

त्याचवेळी पंतप्रधान मोदींनी युक्रेन युद्धावर भारताची भूमिका कायम ठेवली. ते म्हणाले, प्रत्येक प्रश्न शांततेने सोडवला पाहिजे. भारताचा प्रत्येक प्रयत्न मानवतेच्या समर्थनार्थ आहे. आम्हाला लवकरात लवकर शांतता प्रस्थापित करायची आहे, असे ते म्हणाले.

गेल्या ४ महिन्यांत पंतप्रधान मोदी दुसऱ्यांदा रशियाला गेले आहेत. यापूर्वी ते जुलैमध्ये रशियाला गेले होते तेव्हा त्यांनी पुतीन यांना बॉम्ब, बंदुका आणि गोळ्यांनी शांतता प्रस्थापित करता येत नाही, असा सल्ला दिला होता. यानंतर ते युक्रेनच्या दौऱ्यावरही गेले होते.

## डॉक्टरांचे उपोषण मागे, मंगळवारचा आरोग्य संपही रद्द

■ वृत्तसंस्था, कोलकाता, दि. २२ :

**कोलकाता रेप-हत्या**

कोलकात्यात महिला डॉक्टरांवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या निषेधार्थ सुरू असलेले उपोषण कनिष्ठ डॉक्टरांनी १७ व्या दिवशी मागे घेतले आहे. यासोबतच मंगळवारचा डॉक्टरांचा आरोग्य संपही मागे घेण्यात आला आहे.

प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्येप्रकरणी न्याय मिळावा, या मागणीसाठी ५ ऑक्टोबरपासून उपोषणावर असलेले कनिष्ठ डॉक्टर राज्याच्या आरोग्य सेवेच्या रचनेत बदल करण्याची मागणी करत आहेत. यावर आता तोडगा निघाल्याचे बोलले जात आहे.

## बडतर्फ सचिन वाझेला जामीन मंजूर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २२:



राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतरांविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून तुरूंगात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेला जामीन मंजूर झाला आहे.

देशमुख यांच्यासह अन्य आरोपी जामिनावर बाहेर आहेत, त्यामुळे सचिन वाझे यांनीही जामिनासाठी याचिका केली होती. सचिन वाझे हे गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात होते. त्यांच्यावर उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाच्या बाहेर जिलेटिनच्या कांड्या ठेवल्याचा आणि धमकीचा आरोप आहे. तसेच मन्सुख हिरेन हत्या प्रकरण आणि १०० कोटींच्या खंडणी प्रकरणात ते आरोपी आहेत.

दरम्यान, खंडणीच्या गुन्ह्यात वाझे यांना विशेष सीबीआय न्यायालयाने गेल्यावर्षीच जामीन दिला होता. परंतु, इतर दोन गुन्ह्यांत आरोपी असल्याने त्यांचा तुरुंगवास लांबला. मे महिन्यांत त्यांनी पुन्हा अर्ज करून जामीनाची मागणी केली होती. परंतु, तेव्हाही त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावण्यात आला. आता त्यांना जामीन मिळाला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या घराजवळ हिट अँड रन मर्सिडीजच्या धडकेत २१ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:
ठाण्यात एका २१ वर्षीय मुलाला मर्सिडीज कारने धडक दिली, त्यात त्याचा मृत्यू झाला. दर्शन हेगडे असे मृताचे नाव आहे. दर्शन खाद्य पदार्थांची खरेदी करून घरी परतत असताना हा अपघात झाला. नाशिक महामार्गाकडे जाणाऱ्या मर्सिडीजने त्याला धडक दिली अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पळून गेला.

त्यानंतर पोलिसांनी कार ताब्यात घेतली, मात्र आरोपी चालक अद्याप फरार आहे. अभिजीत नायर असे त्याचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. महाराष्ट्रात सहा महिन्यांतील हिट अँड रनची ही चौथी घटना आहे. नौपाडा पोलिस स्टेशनमध्ये अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील निवासस्थानाजवळ हा अपघात झाला आहे. पोलिस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. मात्र, घटनेच्या वेळी परिसरातील अनेक सीसीटीव्ही कॅमेरे काम करत नव्हते.

या वर्षी मे महिन्यात पुण्यात एका १७ वर्षीय मुलाने दोन दुचाकीस्वारांना त्याच्या पोर्श कारने धडक दिली होती. या अपघातात दोघांचाही मृत्यू झाला होता. दुसऱ्या घटनेत, २४ वर्षीय मिहिर शाहने मुंबईत एका महिलेला त्याच्या बीएमडब्ल्यूने धडक दिली होती. या अपघातात महिलेचा मृत्यू झाला होता. मिहीर शहा हा शिवसेना नेत्याचा पुत्र आहे.

१० ऑक्टोबरच्या रात्री पुण्यात एका ऑडी कारने फूड डिलिव्हरी बॉयला धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर हिट ॲन्ड रनची ही चौथी घटना आहे.

## मविआचे जागावाटप निश्चित?

### काँग्रेस १०० ते १०५, उबाठा ९६ ते १००, राकाँ शरद पवार ८० ते ८५

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांमध्ये जागावाटपाची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे दिसत आहे. महाविकास आघाडीमध्ये देखील काही जागांवरून तिढा असून तो देखील आता निवळला असल्याचे दिसत आहे. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर जागावाटपाचा फॉम्युर्ला जवळपास निश्चित झाल्याचे समजत आहे.

महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस 100 ते 105 जागांवर, शिवसेना 96 ते 100 जागांवर, तर शरद पवारांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष 80 ते 85 जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे समजते. तसेच मुंबईमधील बहुतांश भागांवर शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार असणार असल्याची माहिती समोर येत आहे. महाविकास आघाडीचा हा फॉर्म्युला लोकसभा निवडणुकीत मिळवलेल्या विजयावर आधारित असल्याचे सांगण्यात येत आहे.

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या मध्यस्थीनंतर शिवसेना ठाकरे गट व काँग्रेस पक्षातील वाद मिटला असल्याचे दिसत आहे. मुंबईमध्ये शिवसेनेलाच जास्त जागा देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. शिवसेना ठाकरे गटाला 18 जागा, काँग्रेसला 14 जागा तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला केवळ 2 जागा मिळणार असल्याचे समजते.

**महायुतीमध्ये कपडे फाडाफाडी?**

जागा वाटपावरून महाविकास आघाडीमध्ये मतभेद नाहीत, तिकडे महायुतीमध्ये तर जागेसाठी एकमेकांचे कपडे फाडणे सुरू आहे. यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले, वाझे हा भाजपचा माणूस आहे. खोटे आरोप करून अनिल देशमुख यांना फसवण्यात आले असल्याचा आरोप देखील नाना पटोले यांनी केला आहे.

## मराठा समाजातील इच्छुकांच्या २४ तारखेला मुलाखती

■ वृत्तसंस्था, जालना, दि. २२ :
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी विधानसभा निवडणूक लढवण्याची इच्छा असणाऱ्या मराठा समाजातील इच्छुकांच्या २४ तारखेला मुलाखती घेण्याची घोषणा केली आहे.

२४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड व लातूरसह २३ जिल्ह्यांतील प्रत्येक मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार असून, या मुलाखतींसाठी सर्वांनी उपस्थित रहावे, असे त्यांनी म्हटले आहे. यावेळी त्यांनी आपल्या नावाचा गैरवापर करून पैसे गोळा करणाऱ्यांनाही अशा कृत्यांपासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले की, मराठा समाजाने विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजेपासून दिवसभर मी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेईल. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे होणा?या या मुलाखतीला केवळ इच्छुकांनी यावे. त्यांनी आपल्यासोबत कुणालाही आणू नये. यामुळे आंतरवालीत उगीचच गर्दी होईल. २४ तारखेला नागपूर आणि अनेक जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होतील.

## अपघातात दोन ठार

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. २२:

**दोन जखमी**

टाटा सुमोने दुचाकिला दिलेल्या जबर धडकेनंतर घडलेल्या विचित्र अपघातात दोन जण ठार तर दोघे जखमी झालेत. ही घटना तालुका मुख्यालयापासून ६ किमी अंतरावरील सावंगी जवळ २१ ऑक्टोबरच्या रात्री ९.१५ वाजता घडली.

रोहित भास्कर दोनाडकर (वय ३३) व दीपक नारायण सहारे (वय १८), दोघेही राहणार गांधीनगर अशी मृतकांची नावे आहेत. तर जखमीत गवराळा येथील दोन युवकाचा समावेश आहे. गांधीनगर येथील उपरोक्त युवक रात्री ९ वाजताच्या सुमारास सावंगी येथे जाऊन येतो म्हणून घरून निघाले होते. दोन्ही युवक देसाईगंजला येऊन परत गांधीनगरला दुचाकीने जात असतांना लाखांदूर कडुन येणाऱ्या टाटा सुमो वाहनाने सावंगी जवळील राईसमिल जवळ दुचाकीस जबर धडक दिली. या अपघातात दोघेजण जागीच ठार झाले.

दरम्यान राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या अपघातग्रस्त सुमोला गवराळ्यावरून देसाईगंजला दुचाकीने धडक दिली. या अपघातात दोघे जण गंभीर जखमी झालेत. घटनेची माहिती मिळताच देसाईगंज पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. जखमींना उपचार्थ देसाईगंज येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने दोघांनाही पुढील उपचारासाठी ब्रम्हपुरी येथील खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास देसाईगंज पोलीस करीत आहेत.



## अबब... गुजरातच्या गांधीनगरमध्ये बनावट कोर्ट अन् बनावट जज!

### वादग्रस्त प्रकरणांमध्ये निर्णय देऊन १०० एकर जमीनही बळकावली

■ वृत्तसंस्था
गांधीनगर, दि. २२ :
गुजरातमध्ये एका व्यक्तीने बनावट न्यायाधिकरण तयार केले. त्यांनी स्वतःचे न्यायाधीश म्हणून वर्णन केले आणि निकाल दिला, गांधीनगरमधील त्यांच्या कार्यालयात वास्तविक न्यायालयासारखे वातावरण तयार केले. मॉरिस सॅम्युअल असे आरोपीचे नाव आहे.

लवाद म्हणून बनावट न्यायाधीश मॉरिस याने त्याच्या नावावर कोट्यवधी रुपयांची सुमारे १०० एकर सरकारी जमीन संपादित करण्याचे आदेश दिले. आश्चर्याची बाब म्हणजे गेल्या ५ वर्षांपासून हे बनावट न्यायालय सुरू होते.

अहमदाबाद पोलिसांनी मॉरिसला बनावट न्यायाधीश बनवून लोकांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक केली आहे. मॉरिस हा शहरातील इंदिरा नगर हाऊसिंग स्कीममधील एका घरात राहत होता, तेथे त्याने कार्यालय केले होते.

**मित्रच वकील**

ज्यांच्या जमिनीच्या वादाचे खटले शहर दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहेत, अशा लोकांना मॉरिस गोवायचा. तो त्याच्या ग्राहकांकडून केसेस सोडवण्यासाठी फी म्हणून काही पैसे घेत असे. मॉरिसने स्वतःचे अधिकृत न्यायालय-नियुक्त मध्यस्थ म्हणून वर्णन केले. कोर्टाप्रमाणे डिझाइन केलेल्या गांधीनगर येथील कार्यालयात तो आपल्या ग्राहकांना बोलवत असे.

मॉरिसने खटल्यातील युक्तिवाद ऐकला आणि न्यायाधिकरणाचे अधिकारी म्हणून आदेश दिले. एवढेच नाही तर त्याचे साथीदार न्यायालयीन कर्मचारी किंवा वकील असल्याचे दाखवून कारवाई खरी असल्याचे भासवत असत. या युक्तीने आरोपी मॉरिसने ११ हून अधिक प्रकरणांमध्ये त्याच्या बाजूने आदेश पारित केले होते.

आरोपी मॉरिसच्या कार्यालयात एक बनावट कोर्टरूम तयार करण्यात आली होती, जिथे त्याचे सहकारी वकील म्हणून उभे राहत असत. २०१९ मध्ये, आरोपीने त्याच्या क्लायंटच्या बाजूने असाच आदेश दिला होता.

कोर्टाचे रजिस्ट्रार हार्दिक देसाई यांना आढळले की मॉरिस हा लवाद नाही किंवा न्यायाधिकरणाचा आदेश खरा नाही. त्यांनी कारंज पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यानंतर फसवणूक करणाऱ्यावर कारवाई करून त्याच्या बनावट कोटार्चा पदार्फाश झाला.

यापूर्वी गुजरातमध्ये २०२३ मध्ये स्वतःला पंतप्रधान कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी म्हणून सांगणाऱ्या किरण पटेलचे प्रकरणही चर्चेत होते.

## आघाडी फुटेल...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२:

**रामदास कदमांचे भाकित**

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची महाविकास आघाडी अवघ्या २४ तासांत फुटेल, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी केला आहे.

ठाकरे गटाचे काँग्रेस व शरद पवार गटासोबत तीव्र मतभेद निर्माण झालेत. त्यामुळे महाविकास आघाडी पुढील काही तासांतच फुटल्याचे स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत. कदम म्हणाले की, उद्धव ठाकरे यांची शिवसेना व शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रचंड मतभेद वाढलेत. त्यामुळे महाविकास आघाडी फुटल्याचे वृत्त पुढील काही तासांमध्येच पुढे येईल.

# ठाणे जिल्ह्यात महायुतीत बंडाचे वारे

**ठाणे, दि. २२ : प्रतिनिधी**

भाजपने रविवारी जाहीर केलेल्या पहिल्या उमेदवारी यादीनंतर ठाणे जिल्ह्यात महायुतीमधून बंडाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघातून संदीप नाईक यांनी मी निवडणूक लढवणारच असे जाहीर केले आहे. कल्याण पूर्व मतदारसंघातून शिवसेनेचे महेश गायकवाड यांनी गायकवाड कुटुंबातील व्यक्तीला उमेदवारी दिल्यास अपक्ष लढण्याचे संकेत दिले आहेत. तर मुरबाड विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे सुभाष पवार यांनी निवडणूक लढणारच, कुठून ते लवकरच सांगू असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात महायुतीत बंडाची चिन्हे आहेत.

स्थानिक राजकारणामुळे राज्यातील महायुतीच्या विद्यमान आमदारांपुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. यात जिल्ह्यात मुरबाड, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण पूर्व, डोंबिवली, ठाणे, बेलापूर अशा विविध मतदारसंघांचा समावेश आहे. त्यातच रविवारी भाजपच्या वतीने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. या यादीत बेलापूर मतदारसंघातून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. या मतदारसंघातून भाजपचेच संदीप नाईक निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. दोनच दिवसांपूर्वी त्यांनी येथून लढण्याची स्पष्ट संकेत दिले. आता मंदा म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मतदारांच्या आणि कार्यकर्त्यांच्या इच्छेखातर निवडणुकीच्या रिंगणात उतरावे लागणार आहे, असे संदीप नाईक यांनी लोकसत्ताशी बोलताना स्पष्ट केले आहे. त्यामुळे बेलापूर विधानसभा मतदारसंघात बंडखोरी होणार हे स्पष्ट झाले आहे.

दुसरीकडे कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार गणपत गायकवाड शिवसेनेच्या महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केल्यामुळे सध्या तुरुंगात आहेत. त्यांच्या पत्नी सुलभा गायकवाड येथून निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत. रविवारी भाजपने त्यांनाही अधिकृत उमेदवारी जाहीर केली. गेल्या काही वर्षात येथे शिवसेना आणि भाजपचा उघड संघर्ष पाहायला मिळाला आहे. या संघर्षातून गणपत गायकवाड यांनी महेश गायकवाड यांच्यावर भर पोलीस ठाण्यात गोळीबार केला. याप्रकरणी ते सध्या तुरुंगात असले तरी त्यांच्या पत्नी मतदारसंघ पिंजून काढत आहेत. मात्र गायकवाड कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी मिळाल्यास आपण अपक्ष निवडणूक लढवू, असे यापूर्वीच महेश गायकवाड यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातही महायुतीत बंडखोरी होणार असल्याचे चित्र आहे.

मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार किसन कथोरे यांच्या विरुद्ध शिवसेनेचे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार आणि बदलापूर शिवसेनेचे शहर प्रमुख वामन म्हात्रे इच्छुक आहेत. दोघांनीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांना हा मतदारसंघ शिवसेनेला सोडण्याची विनंती केली होती. मात्र आता भाजपने कथोरे यांना येथून उमेदवारी जाहीर केल्याने येथेही बंडखोरीची शक्यता वर्तवली जाते आहे. मी निवडणूक लढणार आहेच, पण कुठून हे लवकरच सांगू अशी माहिती शिवसेनेचे सुभाष पवार यांनी लोकसत्ताशी बोलताना दिली आहे. त्यामुळे मुरबाड विधानसभा मतदारसंघातही बंडखोरीची चिन्हे दिसू लागली आहेत.

# विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातील जाहीर झालेल्या सर्वपक्षीय उमेदवारांची यादी

**मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली असून सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील 288 मतदारसंघात यंदा महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना होणार आहे. मात्र, राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही यंदा एकला चलो रेचा नारा देत विधानसभा मतदारसंघात उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर, वंचित बहुजन आघाडीने विधानसभा उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आघाडी घेतली आहे. मनसेनं सर्वप्रथम 7 मतदारसंघात उमेदवारांची यादी जाहीर केली असून वंचितने आत्तापर्यंत 51 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे, आता महायुती व महाविकास आघाडीतील पक्षांकडून जाहीर होणाऱ्या उमेदवारांच्या नावांची सर्वांनाच प्रतिक्षा लागून राहिली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे मराठवाडा आणि विदर्भ दौऱ्यावर असताना त्यांनी मनसेच्या उमेदवारांची घोषणा केली होती. त्यानुसार, आत्तापर्यंत 7 उमेदवार जाहीर करणयात आले असून राज ठाकरेंनी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी दिलीय. तर, प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन पहिल्या 11 उमेदवारांची यादी जाहीर केली होती. त्यानंतर, वंचितचे परिपत्रक काढून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आलीय. दरम्यान, राज्यात 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान होत असून 23 नोव्हेंबर रोजी विधानसभा 2024 च्या निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे.

## भाजपच्या पहिल्या यादीत गुहागरचा समावेश नाही, शिवसेना की भाजपा जागा लढणार याचा सस्पेंस कायम

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यामध्ये गुहागार विधानसभेच्या उमेदवाराचा समावेश नाही. त्यामुळे या जागेचा सस्पेन्स अजूनही वाढला आहे. ही जागा शिवसेना लढवणार की पुन्हा भाजपच्या वाट्याला येणार हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.

शिवसेना-भाजप युतीच्या जागा वाटपात गुहागर विधानसभा मतदारसंघाची जागा शिवसेनेकडे आहे. शिवसेना शिंदे गटाने ही जागा लढविण्याची घोषणा केली आहे. पक्षाच्या नेत्याकडून उमेदवाराचे नावही घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर शिवसेनेच्या उमेदवाराने मतदारसंघात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. त्याचबरोबर भाजपनेही या मतदारसंघात निवडणुकीची तयारी सुरू केली आहे, मागील वर्षापासून भाजप गुहागरची जागा लढवण्याच्या तयारीत आहे. परंतु प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचा बलाढ्य उमेदवार असल्यामुळे येथे कोणाला उमेदवारी द्यायची यावरून शिवसेना भाजप यांच्यामध्ये रस्सीखेच सुरू आहे. निवडणुकीचा कालावधी सुरू झाल्यानंतर नवीन नवीन चर्चा समोर येत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपने रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाची जागा शिवसेनेकडून हट्टाने मागून घेतली होती. त्या बदल्यात रत्नागिरी जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्व जागा शिवसेनेला देण्याचे भाजपकडून मान्य करण्यात आले होते.

**भाजप उमेदवार यादी**

नागपूर पश्चिम - देवेंद्र फडणवीस
कामठी -चंद्रशेखर बावनकुळे
शहादा - राजेश पाडवी
नंदुरबार- विजयकुमार गावीत
धुळे शहर -अनुप अग्रवाल
सिंदखेडा - जयकुमार रावल
शिरपूर - काशीराम पावरा
रावेर - अमोल जावले
भुसावळ - संजय सावकारे
जळगाव शहर - सुरेश भोळे
चाळीसगाव - मंगेश चव्हाण
जामनेर -गिरीश महाजन
चिखली -श्वेता महाले
खामगाव - आकाश फुंडकर
जळगाव (जामोद) - संजय कुटे
अकोला पूर्व - रणधीर सावरकर
धामगाव रेल्वे - प्रताप अडसद
अचलपूर - प्रवीण तायडे
देवली - राजेश बकाने
हिंगणघाट - समीर कुणावार
वर्धा - पंकज भोयर
हिंगना - समीर मेघे
नागपूर दक्षिण - मोहन माते
नागपूर पूर्व - कृष्ण खोपडे
तिरोरा - विजय रहांगडाले
गोंदिया - विनोद अग्रवाल
अमगांव - संजय पुरम
आर्मोली - कृष्णा गजबे
बल्लारपूर - सुधीर मुनगंटीवार
चिमूर - बंटी भांगडिया
वाणी - संजीवरेड्डी बोडकुरवार
रालेगाव - अशोक उडके
यवतमाळ - मदन येरवर
किनवट - भीमराव केरम
भोकर - श्रीजया चव्हाण
नायगाव - राजेश पवार
मुखेड - तुषार राठोड
हिंगोली - तानाजी मुटकुले
जिंतूर - मेघना बोर्डीकर
परतूर - बबनराव लोणीकर
बदनापूर -नारायण कुचे
भोकरदन -संतोष दानवे
फुलंब्री - अनुराधा चव्हाण
औरंगाबाद पूर्व - अतुल सावे
गंगापूर - प्रशांत बंब
बगलान - दिलीप बोरसे
चंदवड - राहुल अहेर
नाशिक पुर्व - राहुल ढिकाले
नाशिक पश्चिम - सीमाताई हिरे
नालासोपारा - राजन नाईक
भिवंडी पश्चिम - महेश चौघुले
मुरबाड - किसन कथोरे
कल्याम पूर्व - सुलभा गायकवाड
डोंबिवली - रवींद्र चव्हाण
ठाणे - संजय केळकर
ऐरोली - गणेश नाईक
बेलापूर - मंदा म्हात्रे
दहिसर - मनीषा चौधरी
मुलुंड - मिहिर कोटेचा
कांदिवली पूर्व - अतुल भातखलकर
चारकोप - योगेश सागर
मालाड पश्चिम - विनोद शेलार
गोरेगाव - विद्या ठाकूर
अंधेरी पश्चिम - अमित साटम
विले पार्ले - पराग अलवणी
घाटकोपर पश्चिम - राम कदम
वांद्रे पश्चिम - आशिष शेलार
सायन कोलीवाडा- तमिल सेल्वन
वडाळा - कालिदास कोळंबकर
मलबार हिल - मंगलप्रभात लोढा
कुलाबा - राहुल नार्वेकर
पनवेल - प्रशांत ठाकूर
उरण - महेश बाल्दी
दौंड- राहुल कुल
चिंचवड - शंकर जगताप
भोसली -महेश लांडगे
शिवाजीनगर - सिद्धार्थ शिरोले
कोथरुड - चंद्रकांत पाटील
पर्वती - माधुरी मिसाळ
शिर्डी - राधाकृष्ण विखे पाटील
शेवगाव - मोनिका राजले
राहुरी-शिवाजीराव कर्डिले
श्रीगोंदा - प्रतिभा पाचपुते
कर्जत जामखेड - राम शिंदे
केज - नमिता मुंदडा
निलंगा- संभाजी पाटील निलंगेकर
औसा - अभिमन्यू पवार
तुळजापूर - राणा जगजितसिंह पाटील
सोलापूर शहर उत्तर - विजयकुमार देशमुख
अक्कलकोट - सचिन कल्याणशेट्टी
सोलापूर दक्षिण - सुभाष देशमुख
माण -जयकुमार गोरे
कराड दक्षिण - अतुल भोसले
सातारा - शिवेंद्रराजे भोसले
कणकवली - नितेश राणे
कोल्हापूर दक्षिण - अमल महाडिक
इचलकरंजी - राहुल आवाडे
मिरज - सुरेश खाडे
सांगली - सुधीर गाडगीळ

**राज ठाकरेंनी घोषित केलेले मनसेच्या उमेदवारांची यादी**

1. बाळा नांदगावकर - शिवडी, मुंबई
2. दिलीप धोत्रे - पंढरपूर
3. लातूर ग्रामीण - संतोष नागरगोजे
4. हिंगोली विधानसभा - बंडू कुटे
5. चंद्रपूर - मनदीप रोडे
6. राजुरा - सचिन भोयर
7. यवतमाळ - राजू उंबरकर

**वंचितने जाहीर केलेल्या उमेदवारांची यादी**

1. रावेर - शमिभा पाटील
2. सिंधखेड राजा - सविता मुंडे
3. वाशीम - मेघा डोंगरे
4. धामणगाव रेल्वे- निलेश विश्वकर्मा
5. नागपूर साऊथ वेस्ट - विनय भांगे
6. डॉ. आविनाश नन्हे - साकोली
7. फारुख अहमद - दक्षिण नांदेड
8. शिवा नरांगळे -लोहा
9. विकास रावसाहेब दांडगे- औरंगाबाद (संभाजीनगर)
10. किसन चव्हाण - शेवगाव
11. संग्राम माने - खानापूर
12. मलकापुर विधानसभा - शहेजाद खान सलीम खान
13. बाळापूर विधानसभा - खतीब सैय्यद नातीकोद्दीन
14. परभणी विधानसभा - सय्यद समी सय्यद साहेबजान
15. औरंगाबाद मध्य विधानसभा - जावेद मो. इसाक
16. गंगापूर विधानसभा - सय्यद गुलाम नबी सय्यद गफुर
17. कल्याण पश्चिम विधानसभा - अयाज गुलजार मोलवी
18. हडपसर विधानसभा - मोहम्मद अफरोज मुल्ला
19. माण विधानसभा - इम्तियाज जाफर नदाफ
20. शिरोळ विधानसभा - आरिफ मोहम्मद अली पटेल
21. सांगली विधानसभा - आल्लाउद्दीन हयातचाँद काजी
22. धुळे शहर - जितेंद्र शिरसाट
23. सिंदखेडा - भोजासिंग तोडरसिंग रावल
24. उमरेड - सपना राजेंद्र मेश्राम
25. बल्लारपुर - सतीश मुरलीधर मालेकर
26. चिमुर - अरविंद आत्माराम सदिकर
27. किनवट - प्रा. विजय खुपसे
28. नांदेड उत्तर - प्रा. डॉ. गौतम दुथडे
29. देगलूर - सुशील कुमार देगलूरकर
30. पाथरी - विठ्ठल तळेकर
31. परतूर-आष्टी - रामप्रसाद थोरात
32. घनसावंगी - सौ.कावेरीताई बळीराम खटके
33. जालना - डेव्हिड धुमारे
34. बदनापुर - सतीश खरात
35. देवळाली - अविनाश शिंदे
36. इगतपुरी - भाऊराव काशिनाथ डगळे
37. उल्हासनगर - डॉ. संजय गुप्ता
38. अणुशक्ती - नगर सतीश राजगुरू
39. वरळी - अमोल आनंद निकाळजे
40. पेण - देवेंद्र कोळी
41. आंबेगाव - दिपक पंचमुख
42. संगमनेर - अझीज अब्दुल व्होरा
43. राहुरी - अनिल भिकाजी जाधव
44. माजलगाव - शेख मंजूर चांद
45. लातुर शहर - विनोद खटके
46. तुळजापूर - डॉ. स्नेहा सोनकाटे
47. उस्मानाबाद - ॲड. प्रणित शामराव डिकले
48. परंडा - प्रविण रणबागुल
49. अक्कलकोट - संतोषकुमार खंडू इंगळे
50. माळशिरस - राज यशवंत कुमार
51. मिरज - विज्ञान प्रकाश माने

# भिवंडी पूर्वसाठी शिवसेना ठाकरे गट अपक्ष उमेदवारीसह पदाधिकारी राजीनामा देण्याच्या तयारीत

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

शहरातील अजय नगर येथील शिवसेना जिल्हा शाखेत भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम व भिवंडी ग्रामीण विधानसभेच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी भिवंडी पूर्वसाठी शिवसेना ठाकरे गट आक्रमक झाला असून दोन वेळचे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांच्या उमेदवारीसाठी पदाधिकारी राजीनामा देऊन बंड करण्याच्या तयारीत आहेत.यासाठीच उबाठा पदाधिकाऱ्यांनी शनिवारी विशेष बैठकीचे आयोजन करून एकमुखाने म्हात्रे यांच्या भिवंडी पूर्व च्या उमेदवारी साठी मागणी केली.शिवसेनेच्या कठीण काळात माजी आमदार तथा भिवंडी लोकसभा शिवसेना संपर्कप्रमुख रुपेश म्हात्रे यांनी शिवसेनेसाठी खूप मोठे योगदान दिले आहे.त्यामुळे भिवंडी पूर्व विधानसभेतून रुपेश म्हात्रे यांनाच पक्षाचे तिकीट द्यावे असा सूर भिवंडी तालुक्यातील तमाम पदाधिकाऱ्यांनी लावून धरला आहे.तसेच म्हात्रे यांना भिवंडी पूर्व विधानसभेतून तिकीट मिळालेच पाहिजे त्यासाठी मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना साकडे घालण्यात येईल,असेही या आढावा बैठकीत ठरविण्यात आले आहे.महाराष्ट्रात ऊबाठा गट, शरद पवार गट,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष आदींची महाविकास आघाडी आहे.आता नुकतीच या आघाडीत समाजवादी देखील सामील झाली असून समाजवादीने भिवंडी पूर्व आणि पश्चिम मध्ये मुस्लिम बहूल लोकसंख्या असलेल्या या मतदार संघातून रईस शेख आणि रियाज आझमी यांना उमेदवारी जाहीर केली आहे.त्यामुळे आपसूकच भिवंडी पूर्वचे ऊबाठा चे माजी आमदार रुपेश म्हात्रे यांचा पत्ता कट झाला आहे.त्यामुळे भिवंडी तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये नाराजी पसरली असून त्यांनी सामुहिकपणे राजीनामा देण्याचा इशारा दिला आहे.दरम्यान ऊबाठाचे उपजिल्हा प्रमुख इरफान भुरे यांनी रूपेश म्हात्रे यांचा अपक्ष फॉर्म भरा असे आव्हान या बैठकीत तमाम शिवसैनिकाना केले आहे.यावेळी भिवंडी पूर्व भिवंडी पश्चिम भिवंडी ग्रामीण वाडा,मुरबाड,शहापूर,कल्याण परिसरातून शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने हजर होते. सदर बैठक शिवसेनेचे ग्रामीण जिल्हा प्रमुख विश्वास थळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.याप्रसंगी शिवसेना भिवंडी लोकसभा सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील,जिल्हाप्रमुख मनोज गगे ,जिल्हा संघटिका रश्मी निमसे,वैशालीताई मेस्त्री,कविता भगत,जिल्हा सचिव राजाभाऊ पुण्यार्थी, उपजिल्हा प्रमुख तुळशीराम पाटील, उपजिल्हाप्रमुख इरफान भुरे, प्रकाश भोईर,जिल्हा सचिव जय भगत, गोपाळ पाटील,अरुण पाटील,राजन काबाडी,संतोष जाधव,कल्पेश केणे,शिवसेनेचे सर्व पदाधिकारी,युवा सेनेचे शिवसेना अंगीकृत संघटनेच्या महिला आघाडी युवती सेना सर्व सेलचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने बैठकीस हजर होते.तर आम्ही रुपेश म्हात्रे यांना उमेदवारी मिळण्यासाठी महाविकास आघाडीच्या कोणत्याही सीटची आदला बदली करता येईल का,याबाबत चर्चा करण्यासाठी एक-दोन दिवसात मातोश्रीवर जाणार आहोत,असे ठाणे ग्रामीण जिल्हा प्रमुख विश्वास थळे यांनी बैठकी दरम्यान प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

# मुळशीतील खांबोली तलावात बुडून महाविद्यालयीन तरुणांचा मृत्यू

**पुणे, दि. २२ : प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील खांबोली तलाव परिसरात मित्र-मैत्रिणींसोबत फिरायला गेलेल्या फर्ग्युसन महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. तलावात पोहोण्यासाठी उतरल्यानंतर दोघेही गाळामध्ये अडकले. त्यानंतर दोघेजण बुडाले. या घटनेची माहिती मिळताच पौड पोलीस, अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघांना बाहेर काढण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता.

ओजस आनंद कठापुरकर (वय २२, रा. प्राधिकरण, निगडी), राज संभाजी पाटील (वय २२, रा. अमळनेर जळगाव) अशी मृत्युमुखी पडलेल्या तरुणांची नावे आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी (एम.एससी इलेक्ट्रॉनिक्स) विभागातील विद्यार्थी ओजस कठापुरकर, राज पाटील, तसेच मित्र- मैत्रिणी असे नऊजण रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दुचाकीवरून खांबोली तलावाजवळ फिरण्यासाठी आले होते. तेथे गेल्यानंतर सर्वजण पाण्यात उतरले. त्यावेळी ओजस आणि राज तलावात साचलेल्या गाळात अडकले. त्यांच्याबरोबर असलेले मित्र पाण्यातून बाहेर पडले. ओजस आणि राज गाळात अडकल्याची माहिती त्यांनी पोलीस आणि अग्निशमन दलाला दिली. जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन ओजसला बाहेर काढले. मात्र, त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे स्थानिक डॉक्टरांनी सांगितले. गाळ्यात अडकलेल्या राजचा जवानांनी शोध घेतला. त्याला बाहेर काढण्यात आले, अशी माहिती पौड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांनी दिली. याप्रकरणी पौड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

## दिवाळीच्या पार्श्वभूमीवर परराज्यातील घाऊक व्यावसायिकांमुळे भिवंडीतील कुंभारांचा 'पणती' व्यवसाय आर्थिक गर्तेत

**भिवंडी, दि.२२ : प्रतिनिधी**



परराज्यातून मातीच्या पणत्यासह इतर मातीच्या वस्तू भिवंडीत आणून स्वस्त किमतीमध्ये विकल्याने शहरातील कुंभारवाड्यात सर्वसामान्य ग्राहक आणि व्यापाऱ्यांनी पाठ फिरविल्याने कुंभार व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांची दिवाळी अडचणीत आली आहे.दिवाळीच्या निमित्ताने पणती आणि लहान मुलांसाठी मातीची खेळणी तसेच इतर देवदेवतांच्या मातीच्या मूर्तीचे उत्पादन कल्याण येथील काळातलाव येथे होत होते. भिवंडीतील कुंभार समाजातील व्यावसायिक तेथून सुमारे ५ ते १० लॉरी भरलेला माल विक्रीसाठी शहरातील कुंभारवाड्यात आणत होते. मात्र शहराचा विस्तार झाल्यानंतर आणि त्या ठिकाणी लोकवस्ती वाढली. तेथील नागरिकांना शहरातील कुंभारवाड्यात येणे न परवडल्याने त्यांनी जवळच असलेल्या किराणा किंवा जनरल स्टोर मध्ये मिळणाऱ्या पणत्या खरेदी करणे सुरु केले. परिणामी हे दुकानदार शहरातील घाऊक पणत्यांचा व्यापार करणाऱ्या कुंभारवाड्यातील कुंभारांकडून माल घेऊ लागले. हा व्यवहार परराज्यातील घाऊक व्यवसायीकांना समजल्यानंतर त्यांनी स्वतः भिवंडीतील विविध भागातील किराणा दुकानदार आणि जनरल स्टोरच्या दुकानदारांना यावर्षी प्रथमच पणत्या आणि मातीच्या वस्तू विक्रीसाठी दिल्याने कुंभारवाड्यातील व्यावसायिकांची आणि स्थानिक ग्राहकांची गर्दी कमी झाली. त्यामुळे कुंभारवाड्यातील कुंभार समाजातील व्यावसायिक आर्थिक गर्तेत आले आहेत.भिवंडी यंत्रमागाची नगरी असल्याने दिवाळीच्या सणाच्या दिवशी पणत्यांच्या प्रकाशाने हे कारखाने उजळून निघत होते.तर शहरातील लोकवस्तीत असलेले वाडे आणि बाजारपेठेतील दुकानांसह शहरातील विविध दुकानात मातीच्या पणत्या लावल्या जात होत्या. परंतु सध्या पूर्वीचे सुगीचे दिवस न राहिल्याने कारखाना मालकांनी आणि अनेक श्रीमंत लोकांनी मातीच्या पणत्या लावणे कमी केले असून काही काळासाठी जळणारी मेणाची फॅन्सी पणत्या लावणे सुरु केले आहे.त्यासाठी विविध डिझाईनमध्ये फॅन्सी पणत्या मार्केटमध्ये आल्या असून भेट देण्यासाठी काही फॅन्सी पणत्यांची आकर्षक पॅकिंग देखील केली गेली आहे.या पणत्या हळूहळू मातीच्या पणत्यांवर शिरजोर होऊ लागल्या आहेत.मॉल आणि चांगल्या दुकानात या फॅन्सी पणत्या विक्रीसाठी आल्या असल्याने या आकर्षक पणत्या ग्राहकांचे लक्ष्य वेधून घेत आहेत. काही वर्षानंतर हे फॅन्सी पणत्यांचे मार्केट जोर धरेल अशी चर्चा मार्केटमध्ये सुरु झाली आहे.

# सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने शिक्षण क्रांती संघटनेने शिक्षकांसाठी केल्या राज्य निवडणूक आयोगाकडे मागण्या

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचारसंहिता सुरू झाली आहे.त्यानुषंगाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून निवडणूक कर्तव्य बजावण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या अंतर्गत निवडणूक प्रक्रियेत समावेश झालेल्या शिक्षकांना उच्च न्यायालय,मुंबई यांच्या निर्णयानुसार आणि भारत निवडणूक आयोग यांच्या परिपत्रकानुसार अपेक्षित सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटना यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे काही लेखी मागण्या केल्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार दिव्यांग व्यक्ती, गरोदर माता व बाळाला स्तनपान करणाऱ्या माता, सेवानिवृत्ती कालावधीसाठी सहा महिन्यापेक्षा कमी राहिलेले अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक कामकाजातून वगळण्यात आले आहे.महिला कर्मचाऱ्यांना कर्तव्याच्या ठिकाणी मूलभूत सुविधांसह योग्य मुक्कामाची व्यवस्था करावयाची आहे. जोपर्यंत अशी व्यवस्था केली जात नाही,तोपर्यंत कोणत्याही महिलेला निवडणूक कर्तव्य बजावण्यासाठी कोणत्याही ठिकाणी बोलवले जाणार नाही अशी अट घातली आहे. या अटींचे काटेकोरपणे पालन व्हावे. यासाठी महिलांना त्यांच्या निवासस्थानाच्या क्षेत्रातच निवडणूक कामकाज सोपवावे. जेणेकरून त्यांची इतर मुक्कामाच्या ठिकाणी गैरसोय होणार नाही. तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गंभीर वैद्यकीय आजार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक कामकाजातून वगळण्यात आले आहे.तसेच विनाअनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना वगळण्यात आले आहे,याची दाखल घेण्यात यावी,अशी विनंती दिलेल्या पत्रात नमूद केली आहे.निवडणूक दरम्यान यावर्षी दिवाळीच्या सुट्टीच्या दिवसात कपात केलेली आहे.त्या सुट्टीच्या कालावधीत निवडणूक प्रशिक्षणे लावू नयेत.त्यामुळे महत्त्वाच्या कामांसाठी गावी जाणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतरांचे नियोजन बिघडते. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी साहित्य जमा करताना अनेक ठिकाणी रात्री खूप उशिरापर्यंत थांबावे लागते. म्हणून मतदानाच्या दुसऱ्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना विशेष रजा देण्यात यावी,अशी विनंती करण्यात आली असून या मागण्या व सूचनांचा जरूर विचार करून योग्य निर्णय घ्यावेत.तसेच विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच विधानसभा क्षेत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचित करावे,अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी केली आहे.

## रस्त्यात टेम्पो पार्किंग जीवावर बेतले, अपघातात एक ठार

**नवी मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

जलद गती मार्गावर वाहन पार्क करणे नियमबाह्य असतानाही शीव पनवेल मार्गावर अनेक ठिकाणी जड अवजड वाहने पार्क केली जातात. अशाच एका बेकायदा पार्क केलेल्या टेम्पोचा अंदाज न आल्याने टेम्पोला एक कार धडकली . या अपघातात मुंबईत कस्टम मध्ये अधीक्षक पदावर कार्यरत अधिकाऱ्याचा दुर्दवी मृत्यू झाला असून अन्य दोघे जखमी झाले आहे. या प्रकरणी टेम्पो चालकाला ताब्यात घेतले आहे.

घनशाम वर्मा असे आरोपीचे नाव आहे. रविवारी सकाळी शीव पनवेल मार्गावर पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर जुईनगर रेल्वे पादचारी पुलाखाली रस्त्याच्या दुसऱ्या मार्गिकेवर वर्मा याने त्याचा टेम्पो ( एम एच ४६ बी.व्ही. ९२५१ ) पार्क केला होता. विशेष म्हणजे त्याने पार्किंग लाईट लावलेले नव्हते. सकाळी साडे अकरा बाराच्या सुमारास वाशी कडून सीबीडीच्या दिशेने याच मार्गावरून एका कार मधून कस्टम अधीक्षक नरेंद्र राय आणि त्यांचे सहकारी गौरव सिन्हा,अभिनव रामकुमार सिन्हा, आणि दीपक गुप्ता हे जात होते. जलद मार्ग असल्याने गाड्यांचा वेग बऱ्यापैकी जास्त होता. त्यात जुईनगर येथे उभा असलेल्या टेम्पोचा अंदाज टेम्पोचा पार्किंग लाईट सुरु नसल्याने गाडी चालवणारे अभिनव यांना आला नाही.

त्यामुळे या टेम्पोला गाडी मागून धडकली. त्यात हे चौघेही जखमी झाले. मात्र नरेंद्र यांच्या डोळ्याला आणि डोक्याला जबर मार लागला. चौघांनाही अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथे नरेंद्र यांचा मृत्यू झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. तसेच अन्य जखमींवर उपचार सुरु आहेत.सदर अपघात घडल्यावर कार अचानक धडकल्याने मागून येणाऱ्या दुचाकी स्वाराचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि त्याची दुचाकी कारला धडकली. त्यात दुचाकीचे नुकसान झाले तर दुचाकी स्वार किरकोळ जखमी झाला. या प्रकरणी नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हलगर्जी आणि बेकायदा गाडी पार्क केल्याने झालेल्या अपघातात एकाच्या मृत्यूस कारण ठरला म्हणून टेम्पो चालक घनश्याम याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर अटकेची कारवाई केली जाणार आहे. अशी माहिती तपासाधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम कोरडे यांनी दिली.

# डीजे व्यावसायिकाच्या आत्महत्येला राजकीय वळण

■ महासागर प्रतिनिधी,

**भंडारा , दि. २२ :** भंडारा : जिल्ह्यात पुन्हा एक राजकीय वादळ उठले आहे. जिल्ह्यातील एका डीजे व्यावसायिकाने आत्महत्या गेली. त्यानंतर त्याने आत्महत्या का केली, याबाबतची पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल झाली. त्या पोस्टमध्ये जिल्ह्यातील एका मोठ्या नेत्याच्या कुटुंबाचे नाव घेतले जात आहे. आता या आत्महत्येला राजकीय वळण लागले आहे. त्यामुळे जिल्ह्यात विविध चर्चांना ऊत आला आहे.

आंधळगांव पोलिस स्टेशन हद्दीत एका डीजे व्यावसायिकाने गळफास लावला. ही घटना रविवारी (२० ऑक्टोबर) रात्रीच्या सुमारास घडली. याची माहिती आंधळगाव पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळ गाठले आणि पंचनामा सुरू केला. मृतकाच्या वडिलांच्या तक्रारीवरून गावातील एका मुलीसोबत असलेले प्रेमसंबंध तसेच त्याच्यावर असलेले खाजगी फायनान्सच्या कर्जाचा डोंगर. या तणावातून त्याने आत्महत्या केली असावी, असे फिर्यादी मृतकाच्या वडीलांनी पोलिसांना सांगितले.

वडीलांच्या तक्रारीवरून आंधळगाव पोलिस स्टेशन येथे कलम१४४ अन्वये घटनेची नोंद करण्यात आली आहे. आता ही घटना इथपर्यंत ठीक होती. मात्र दुसऱ्या दिवशी याचा थेट संबंध तुमसरचे माजी आमदार आणि शरद पवार गटाचे नेते चरण वाघमारे यांच्या कुटुंबाशी जोडला गेला. तशा पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होऊ लागल्या.

निवडणूक तोंडावर आली आहे. आपली व आपल्या कुटुंबाची नाहक होत असलेली बदनामी लक्षात घेत चरण वाघमारे यांनी आपल्याला बदनाम करण्यासाठी अशा पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याची तक्रार दिली आहे. तसेच पोलिसांनी स्वतः याची चौकशी करावी, अशी मागणीही वाघमारे यांनी केली आहे. व्हायरल पोस्ट बघून चरण वाघमारे स्वतः पोलिसात तक्रार करायला गेले. त्यामुळे साहजिकच या प्रकरणाला राजकीय वलय प्राप्त झाले. झाले ही तसेच जिल्ह्यात विविध चर्चांना उधाण आले आहे.

याबाबत माजी आमदार चरण वाघमारे यांचे मत जाणून घेतले असता, ते म्हणाले की, निवडणूक बघून मला व माझ्या कुटुंबाला बदनाम करण्याचा हा प्रकार आहे. माझ्या कुटुंबाच्या विरोधात अशी कुठलीही तक्रार मृतकाच्या कुटुंबाने केलेली नाही. माझ्या कुटुंबाला बदनाम करण्याचा जो प्रकार सुरू झाला आहे, ते कदापीही सहन करणार नाही. म्हणून याची रीतसर तक्रार आंधळगाव पोलिस स्टेशनमध्ये केली आहे.

स्वतः चरण वाघमारे यांनी आंधळगाव पोलिसांना तक्रार दिली. पोलिसांनी त्यांच्या घरचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असल्याचे सांगितले जात आहे. स्वतः वाघमारे पोलिसांना सहकार्य करत असल्याचे चित्र सध्या आहे. या सर्व घडामोडींमागे २०१४ च्या निवडणुकीत वाघमारे यांच्या विरोधात झालेली तुमसर पोलिसातील तक्रार आणि त्यानंतर त्यांना झालेली अटक अधिक चर्चेत आली होती. आता पुन्हा निवडणुक तोंडावर असताना वाघमारे यांच्यामागे पोलिस तपासाचा ससेमिरा सुरू झाला. एकीकडे स्वतःच्या राष्ट्रवादी शरद पवार गट पक्षात वाघमारे यांच्या विरोधात एक फळी सक्रीय झाली आहे. प्रकरण काहीही असो, पण चरण वाघमारेंना या प्रकरणात जास्त गुंतणे नुकसान करू शकते, हे मात्र निश्चित.

## अवकाळीमुळे ७५०० हेक्टर सोयाबीनचे नुकसान

महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २२ :** जिल्ह्यात गत आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाचा फटका७ हजार ४४३ क्षेत्रावरील सोयाबीन पिकाला बसल्याने सोमवारी समोर आले. याबाबतचा अहवाल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने विभागीय कृषी सहसंचालकांना पाठवला आहे. दोन तालुक्यातील१४१ गावातील पिकांचे नुकसान झाले आहे.

यंदा कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळेखरीपपिकांनाफटकाबसला. जून व जुलै महिन्यात अतिवृष्टीमुळे ४ हजार ५८८ हेक्टरवरील पिकांना फटका बसला. या अतिवृष्टीमुळे १५२ गावांमध्ये नुकसान झाले. ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली असून, नुकसान भरपाईसाठी ७४ कोटी ४ लाख ३५ हजार ४०८ रुपयांची आवश्यकता आहे.

# अमरावतीत अल्पवयीन मुलाची चाकूने भोसकून हत्या

■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि.२२** बालगृहातून नुकत्याच सुटलेल्या मुलाची हत्या करून मृतदेह येथील गडगडेश्वर मंदिर परिसरात फेकल्याची घटना सोमवारी रात्री उशिरा उघडकीस आली. साहिल मनीष चोपडा उर्फ पंजाबी (१७, रा. अंबा कॉलनी) असे मृताचे नाव आहे. गेल्या वीस दिवसांतील हत्येची ही सातवी घटना असल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

खोलापुरी गटे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गडगडेश्वर मंदिरामागे एका युवकाची हत्या करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहचला. परिसराची पाहणी केल्यानंतर मंदिरामागे रक्ताच्या थारोळ्यात साहिलचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाच्या शेजारी आढळलेला चायना चाकू पोलिसांनी जप्त केला. साहिलची हत्या कुणी केली याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

साहिल पंजाबी याचा दोन ते तीन महिन्यांपुर्वी एका युवकासोबत वाद झाला होता. दोन्ही गटातील युवकांनी हा वाद मिटवण्यासाठी राजापेठ परिसरात एक बैठक घेतली होती. पण, त्यावेळीही पुन्हा वाद उफाळून आला आणि साहिलने एका युवकावर चाकूने वार केला होता. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी साहिल याला ताब्यात घेऊन बालसुधारगृहात ठेवले होते. साहिल हा नुकताच बालसुधारगृहातून बाहेर पडला होता. सोमवारी रात्री त्याची हत्या करण्यात आली.

साहिलची पूर्ववैमनस्यातून हत्या करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. गेल्या १५ ऑक्टोबर रोजी चित्रा चौक परिसरात रुपये मागितल्यावर केवळ रुपयेच दिल्याने उद्भवलेल्या वादात दोन आरोपींनी एका तरुणाची चाकू व लोखंडी हुकने हल्ला चढवून हत्या केली होती. त्यामुळे लोकांमध्ये रोष पसरला होता. आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीसाठी परिसरातील नागरिकांनी पोलीस ठाण्यावर धडक देऊन ठिय्या आंदोलन केले होते. निशांत उर्फ गोलू उशरेटे (३०, रा. मसानगंज) या युवकाच्या हत्येप्रकरणी कोतवाली पोलिसांनी मारेकरी विक्की गुप्ता (३५) रा. रतनगंज व योगेश गरूड (३०) रा. विलासनगर यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली होती. गोलूचा केश कर्तनाचा व्यवसाय होता.

त्याने काही दिवसांपूर्वी कावड यात्रा काढण्यातही पुढाकार घेतला होता. पूर्ववैमनस्यातून अल्पवयीन मुलांनी चाकूने हत्या केल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. पोलिसांनी गस्त वाढवली आहे. बंदोबस्त वाढवला आहे, तरीही हत्यासत्र सुरूच आहे.

त्यामुळे पोलिसांसमोर गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान आहे.

# मूर्तिजापूरमध्ये वंचितकडून सुगत वाघमारेंना संधी

■ महासागर प्रतिनिधी,

अकोला, दि. २२ : वंचित बहुजन आघाडीने सोमवारी मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघातून सुगत वाघमारे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. वाघमारे हे उद्योजक असून सामाजिक क्षेत्रात त्यांचे काम आहे. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे. २०१४ मध्ये या मतदारसंघातून भाजपचे आमदार हरीश पिंपळे व वंचितच्या उमेदवार प्रतिभा अवचार यांच्यात लढत झाली होती. पिंपळे केवळ१४२० मतांनी विजयी झाले होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवाराला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते. वंचितने बाळापूर विधानसभा क्षेत्रानंतर दुसरी उमेदवारी मूर्तिजापूरची जाहीर केली. बाळापूरमधून त्यांनी मुस्लीम कार्ड खेळत काँग्रेसचे माजी आमदार ॲड. नातिकोद्दीन खतीब यांना हातोहात पक्षात प्रवेश दिला व उमेदवारीही. सुगत वाघमारे यांच्या उमेदवारीविषयी वंचितचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर आधीपासूनच सकारात्मक होते. त्यानुसार वाघमारे यांनी तीन महिन्यापासूनच मूर्तिजापूर



मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केले होते. त्यांनी दिग्गज सेलिब्रिटी आणून त्यांचे कार्यक्रमही आचारसंहितेपूर्वी उरकून घेतले होते. २०१४ मध्ये वंचितने या मतदारसंघातून महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रतिभा अवचार यांना उमेदवारी दिली होती. त्यांनी ५७,६१७, मते घेतली होती तर भाजपचे हरीश पिंपळे यांना ५४,५३७, मते मिळाली होती. आ. पिंपळे यांचा १४२० मतांनी निसटता विजय झाला होता. त्यामुळे वंचितच्या दृष्टीने हा मतदार संघ महत्वाचा समजला जातो.

दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी अकोल्यात धम्म मेळावा असतो. ॲड. प्रकाश आंबेडकर लाखो अनुयायांना संबोधित करत असतात. या मेळाव्याच्या वेळी संपूर्ण शहरात सुगत वाघमारे यांनी बॅनर लावले होते.

भाजप व महाविकास आघाडीचे ठरेना : भाजपचे विद्यमान आमदार हरीश पिंपळे हे तीनदा मूर्तिजापूर मतदारसंघातून विजयी झाले आहेत. भाजपच्या पहिल्या यादीत मात्र त्यांचे नाव नव्हते. त्यामुळे त्यांना दुसऱ्या यादीची प्रतीक्षा आहे. तसेच महाविकास आघाडीत मतदारसंघ कुणाच्या वाट्याला हेसुद्धा अद्याप निश्चित नसल्याने त्यांचा उमेदवार कोण राहतो यावर निवडणुकीचे गणित अवलंबून आहे. अकोला पूर्व, अकोला पश्चिम व अकोटवर लक्ष वंचित बहुजन आघाडीत कुणाला तिकीट मिळेल याचा अंदाज बांधणे कठीण असते. जिल्ह्यातील दोन उमेदवार घोषित झाले. दोन्ही उमेदवार पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते नाहीत. अशावेळी आता तीन मतदारसंघातून कुणाला तिकीट मिळते, याकडे लक्ष लागून आहे. अकोट व अकोला पूर्वमधून पक्षातील नेते, आजी-माजि अध्यक्षही आपल्याला तिकीट मिळावे म्हणून प्रतीक्षेत आहेत. मात्र, त्या मतदारसंघातही कुणाला तिकीट मिळते याकडे लक्ष लागून आहे.

# खामगावात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. २२ :**येथील जगदंबा चौकातील श्री जगदंबा सार्वजनिक उत्सव मंडळाततर्फे स्थापन केलेली आहे. मोठी देवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देवीच्या दर्शनासाठी जिल्हयासह पर जिल्हयातील भाविकांची दर्शनासाठी गर्दी दिसून येत आहे. यावेळी जगदंबा उत्सवात सकाळी ७ वाजेपासून ते रात्रीपर्यंत दर्शनासाठी महिला व पुरुष भक्तांच्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागलेल्या दिसून येत आहे. कोजागरी पोर्णिमेच्या दिवशी म्हणजे १६ ऑक्टोबरपासून या उत्सवाला प्रारंभ आला आहे. २६ ऑक्टोबर रोजी देवीच्या विसर्जनाने या उत्सवाची सांगता होणार आहे.



मोठया देवी बरोबरच शहरातील विविध जगदंबा उत्सव मंडळांतर्फे देवीच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. जगदंबा मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांमुळे शहरातील रस्ते फुललेले दिसून येत आहे. शहरातील वातावरण भक्तीमय झाले आहे. मोठ्या देवीवर भक्तांची असीम श्रध्दा आहे. त्यामुळे या उत्सव काळात राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक येथे येऊन देवीच्या चरणी नतमस्तक होताना दिसून येतात. अनेक भक्त देवीसमोर नवस बोलतात, तर अनेक जण बोललेला नवस फेडण्यासाठी येतात. भाविकांच्या दर्शनासाठी देवीचा दरबाररूपी मंडप २४ तास उघडा ठेवण्यात आला आहे. मंडळाचे पदाधिकारी व सेवाधारी भक्त रात्रंदिवस पहारा देत आहेत. मंडप परिसरात प्रसाद, ओटी, नारळ, फुल, हार व पातळांची दुकाने थाटली आहेत. मोठ्या देवीची सकाळी ७.३०. वाजता व रात्री ८ वाजता मंगल वाद्यांसह आरती करण्यात येत आहे. अरविंद आगिनकर हे देवीची महाआरती व पूजा करतात.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 54 - Nagpur East**

**Name of the candidate : KRUSHNA PANCHAM KHOPADE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | **Criminal antecedents** | | |
| | a. | Nature of the offences | I) FIR No. 398/2020, u/s. 143, 188, 269,270 of IPC, S. 135 Maharashtra Police Act. & IPC Sec. 51 (B), Disaster Management Act with Ganesh Peth Police Station.<br>II) FIR No. 397/1996, u/s. 143 Indian Railway Act with Lakadganj Police Station.<br>III) FIR No. 22/2004 u/s. 295, 143, 435, 427 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Lakadganj Police Station.<br>IV) FIR No. 42/2022 u/s. 188, 270 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Lakadganj Police Station.<br>V) FIR No. 32/2000 u/s. 143, 341 of IPC, Section 135 Maharashtra Police Act with Kalmana Police Station.<br>VI) FIR No. 3746/2009 u/s. 188 of IPC, Section 33(1), 4, 131 Maharashtra Police Act, with Kalmana Police Station.<br>VII) FIR No. 3535/2012 u/s. 135 Maharashtra Police Act with Kalmana Police Station. |
| | b. | Case no. | I) C. C. No. 13424/2021<br>II) C. C. No. 384/1997<br>III) C. C. No. 63/2005<br>IV) FIR No. 42/2022<br>V) C. C. No. 848/2000<br>VI) C. C. No. 15251/2009<br>VII) C. C. No. 21063/2012 |
| | c. | Name of the Court | I) Case Sr. No. I - Hon'ble J.M.F.C. Court No.1, Nagpur.<br>II) Case Sr. No. II to VII-Hon'ble J.M.F.C., Court No. 3, Nagpur. |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | I) Charge sheet No. 57/2021<br>II) Charge sheet No. 155/1997<br>III) Pending for consideration<br>IV) Pending for consideration<br>V) Charge sheet No. 36/2000<br>VI) Charge sheet No. 884/2009<br>VII) Charge sheet No. 908/2012<br>The cases are still under consideration before the Hon'ble Court. |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate Krushna Pancham Khopade has been very Senior Legislator. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 54 - Nagpur East**

**Name of the candidate : KRUSHNA PANCHAM KHOPADE** ........................................................ and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**

**President,**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# निवडणूक आणि कोलांटउड्या!

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, येत्या दोन ते तीन दिवसात सर्वच राजकीय पक्षांचे उमेदवार जाहीर होतील. उमेदवारी अर्ज भरण्यासही सुरूवात होणार आहे. पक्षाकडून तिकीट मिळणार नसल्याची किंवा संबंधित पक्षातून निवडून येणार नसल्याची खात्री झालेले अनेकजण पक्षांतर करू लागले असून, राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात नेत्यांच्या कोलांटउड्या सुरू झाल्याचे पाहावयास मिळते. तथापि, अशा आयाराम, गयाराममुळे त्या त्या पक्षातील जुणे जाणते, निष्ठावान पदाधिकारी व कार्यकर्ते कमालीचे संतप्त असल्याचेही दिसून येते.

---------------

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मंगळवारी अजित पवारांना जोरदार झटका दिला. राष्ट्रवादीचे कोकणातील बडे नेते अजित यशवंतराव यांनी मंगळवारी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी बोलताना उद्धव यांनी आपल्या कार्यकर्त्यांना पक्षाचे निवडणूक चिन्ह असणारी मशाल कोकणात घरोघरी पोहोचवण्याचे आवाहन केले.

अजित यशवंतराव हे राजापूर लांजा साखरपा या विधानसभा मतदारसंघातील एक प्रमुख नेते आहेत. त्यांनी आपल्या समर्थकांसह मंगळवारी ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे हातात मशाल घेऊन म्हणाले की, लोकसभा निवडणुकीवेळी निवडणूक आयोगाने आपल्याला मशालीचे चिन्ह दिले.

हे चिन्ह थोडेसे संभ्रम पसवरणारे आहे. त्यामुळे आम्ही आयोगाला अन्य एका चिन्हाचा पर्याय सूचवला होता. पण आयोगाने आम्हाला जे दिले तेच घ्या असे सांगितले. हरकत नाही. आम्ही या चिन्हावरही महाराष्ट्रात ९ खासदार निवडून आणलेत. आता हीच मशाल घरोघरी पोहोचली असून, मनामनात पेटली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, अजित यशवंतराव हे तब्बल ७ वर्षांनंतर शिवसेना कुटुंबात परत आलेत. एक उमदा तरुण, सुशिक्षित व मनापासून काम करणारा माणूस आपल्यासोबत येत असल्याचा मला आनंद आहे. ते कोणतीही राजकीय अपेक्षा न ठेवता आपल्या पक्षात आलेत. त्यांच्यासारख्या अनेकांची पक्षात येण्याची तयारी आहे, पण काहींनी तिकीटाची अट ठेवली आहे. तुम्ही विदाऊट तिकीट आलात. त्यामुळे तुमच्या भविष्याची काळजी माझी जबाबदारी राहील. तुम्ही अजित आहात, यशवंत व्हा, असे उद्धव ठाकरे यावेळी अजित यशवंतराव यांचे कौतुक करताना म्हणाले.

**नीलेश राणे शिंदे गटात?**

दुसरीकडे, कोकणातील अन्य एक बडे नेते नीलेश राणे यांनी मंगळवारी भाजपला सोडचिठ्ठी देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. मी २०१९ मध्ये नारायण राणे साहेबांसोबत भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपमधील सगळ्या नेत्यांनी आदर



दिला. खूप प्रेम दिले. देवेंद्र फडणवीस यांनी मला लहान भावासारखे सांभाळले. पक्षामध्ये स्थान दिले. पण उद्या 23 तारखेला दुपारी 4 वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतीमध्ये मी कुडाळ हायस्कूल मैदानावर माज्या शिवसेना प्रवेशाची सभा होणार आहे. माझा प्रवेश उद्या नक्की झाला आहे, असे नीलेश राणे यांनी सांगितले.

**ज्ञानेश्वर कटके दादांच्या गटात**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर (माऊली) आबा कटके यांनी सोमवारी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बारामतीत राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश केला. शिरूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक समन्वयक, बांधकाम विभाग- पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य आणि पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरूर विधानसभा मतदारसंघ हा जिल्ह्यातील महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ मानला जातो. ज्ञानेश्वर (माऊली) आबा कटके यांचा प्रवेश हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

**संदीप नाईक शरद पवार गटात**

महाराष्ट्रातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय खलबते सुरू असून पक्ष बदलण्यासाठी नेत्यांच्या उड्या देखील सुरू आहेत. यातच आता भाजपला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. भाजपचे नवी मुंबई जिल्हा भाजप अध्यक्ष संदीप नाईक यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते नाईक यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

विधानसभा निवडणुकीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची यादी लवकरच जाहीर होणार आहे. मात्र, त्याआधीच मी संदीप नाईकांच्या हातात तुतारी दिली असल्याचे सूचक वक्तव्य प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. या मतदारसंघात तुमच्या मनातील उमेदवार देऊ असे आश्वासनही त्यांनी उपस्थितांना दिले.

संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक हे भाजपचे मोठे नेते असून पक्षाने त्यांना ऐरोली विधानसभा मतदारसंघातून तिकीट दिले आहे. तर संदीप यांना नवी मुंबईतील बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवायची आहे. मात्र पक्षाने या जागेवरून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. पक्ष प्रवेशापूर्वी नाईक यांनी भाजपमधून राजीनामा दिला.

अशा स्थितीत तिकीट न मिळाल्याने संदीप नाईक नाराज असून त्यांना बेलापूरची जागा शरद पवार गटाने देऊ केल्याचे मानले जात आहे. शरद पवार यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. संदीप नाईक हे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाच्या काही दिवसांपासून संपर्कात आहेत. मंगळवारी संदीप नाईक यांनी आपल्या समर्थकांसह जयंत पाटील यांच्या हस्ते प्रवेश केला. त्यामुळे त्यांना उमेदवारी देण्याची घोषणा देखील होण्याची शक्यता आहे.

गणेश नाईक आणि संदीप नाईक यांचा नवी मुंबईत बराच प्रभाव असल्याचे बोलले जाते. नवी मुंबईतील ऐरोली मतदारसंघातून भाजपने संदीप नाई यांचे वडील गणेश नाईक यांना उमेदवारी दिली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस जसजसा जवळ येतो आहे, तसतशा या कोलांटउड्या अधिक प्रमाणात पाहावयास मिळणार आहेत.

●●●●●●●●●

# (नसलेले) सहावे इंद्रिय

प्रिय तरुण मित्र-मैत्रिणींनो,

अंबादास कानडे या तरुणाचे पत्र आले आहे. त्याचा प्रश्न हा अनेक तरुणांकडून आला आहे असे समजावे, असे त्याने लिहिले आहे. पत्रातला मजकूर असा, अंधश्रद्धा, बुवाबाजी, चमत्कार, भूत, देवी अंगात येणे इत्यादी बाबींवर 'डोळस व्हायचंय' या सदरातून चांगला प्रकाश पडतो.

त्या आधारे मी स्वतः माझ्या आयुष्यात आणि इतरांच्या आयुष्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. मात्र, माझा एक वेगळाच प्रश्न आहे. मी 'एच.बी.ओ.' या इंग्रजी चित्रपट चॅनलवर एक पिक्चर पाहिला. या पिक्चरचे नाव होते 'द सिक्स्थ सेन्स'.

या पिक्चरमध्ये त्या नायकाच्या मुलामध्ये सहावे इंद्रिय असते. भविष्यातील घटना त्याला स्पष्ट दिसत असतात. माझा प्रश्न असा आहे, की खरेच माणसाला असे सहावे इंद्रिय असते का? भविष्यातील घटना त्याला दिसतात का?

शंका योग्यच आहे आणि अनेकांच्या मनातील आहे. आपणास ज्ञान होते ते आपल्या पंचज्ञानेंद्रियांमार्फत. संवेदना जाणवणे आणि त्याद्वारे संबंधित वस्तुस्थितीची कल्पना येणे असेच या ज्ञानप्रक्रियेचे स्वरूप असते; परंतु माणसाला सतत वाटत आले आहे, की ज्ञान मिळवण्यासाठी या ज्ञात क्षमतांच्या पलीकडे काहीतरी वेगळी अद्भुत क्षमता माणसांच्यात असते. निदान काही माणसांच्यात तरी असणारच.

हा काही चमत्कार समजावयास नको. एखाद्या व्यक्तीला सहा बोटे असतातच ना? त्याला आपण अपवादात्मक वास्तव मानतो. तसेच काही व्यक्तींना वरवर पाहता अद्भुत वाटणारी परंतु प्रत्यक्षात अस्तित्वात असणारीही शक्ती असते. किंवा कोणत्याही व्यक्तीत काही वेळेला एखाद्या विशेष उत्कट प्रसंगाच्या निमित्ताने ती प्रकट होऊ शकते.

उदा. मूल शाळेच्या सहलीला गेलेले असते. चार दिवसांनी ते सहलीहून परत येण्याची वेळ होते आणि नेमके आईच्या मनाला सतत असे वाटू लागते, माझा बाळ आज काही सुखरूप परत येत नाही; कोणत्यातरी अपघातात तो सापडणार. आणि काय आश्चर्य! बाळाच्या बसला अपघात होतो आणि नेमका तिचाच बाळ जायबंदी होतो. दुःखी-कष्टी झालेली माता भेटावयास येणाऱ्या प्रत्येकाला सांगत असते, 'का कोण जाणे, पण मला सारखं वाटत होतं, की काहीतरी विपरित घडणार म्हणून.' मातेच्या मनाला मिळालेली ही सूचना, सहाव्या इंद्रियाद्वारे प्राप्त झाली असे मानण्यात येते.

तरुण मित्रांनो, तुम्ही ठामपणे आणि निश्चितपणे असे मानावयास हवे, की अशी अद्भुत अतींद्रिय शक्ती नसतेच. अशी शक्ती आहे का, यासाठी जगभर अनेकांनी शास्त्रशुद्ध तपासण्या करण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकी कोणत्याही तपासणीत या शक्तीबाबत निर्णायक पुरावा मिळाला नाही. या शक्तीच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणारे लोक सामान्यपणे या शक्तीच्या अस्तित्वाचे चार प्रकार मानतात.

पहिला प्रकार 'प्रिकॉग्निजन', म्हणजे भविष्यकाळात घडणाऱ्या घटनांची चाहूल आधीच लागणे. दुसरा प्रकार म्हणजे 'क्लेरव्हायन्स'. यामध्ये घडून गेलेल्या घटना स्वतःच्या लख्ख (दैवी) दृष्टीने ही शक्ती लाभलेल्या व्यक्तीला स्पष्टपणे दिसतात.

म्हणजे असे, की चोरी होऊन गेलेली असते आणि ही शक्ती लाभलेली व्यक्ती चोर कुणीकडून आला, त्याचा चेहरा, कपडे, त्याने चोरी कशी केली, यानंतर तो कोठे गेला याचे सत्य वर्णन करू शकतात. 'टेलीपथी' हा असाच आणखी एक प्रकार. ही शक्ती लाभलेला माणूस स्वतःच्या मनातील विचार स्पंदनांद्वारे अन्य कोणत्याही साधनाशिवाय दुसऱ्या व्यक्तीच्या मनात पोहोचवू शकतो.

अर्थात, दुसऱ्या व्यक्तीला अशी विचारस्पंदने स्वीकारण्याची शक्ती हवी, हे ओघानेच आले. 'सायकोकायनेसिस' ही इच्छाशक्तीद्वारे वस्तूंवर भौतिक बल लावून त्याचे दृश्य परिणाम घडवून आणते. युरी गेलर हे या संदर्भात काही वर्षांपूर्वी जगभर गाजलेले नाव आहे. नजर रोखून तो बंद घड्याळे चालू करत असे आणि गाडीच्या किल्ल्या वाकवून दाखवत असे.

मित्रांनो, ऐकताना आणि वाचताना हे सारेच अद्भुत व रोमांचकारी वाटते; परंतु लक्षात ठेवण्याची महत्त्वाची गोष्ट ही, की यांपैकी एकही गोष्ट जगामध्ये एकदाही कोणीही निर्विवादपणे सिद्ध केलेली नाही. जगात सहाव्या इंद्रियाचा अभ्यास करणाऱ्या अनेक संस्था निघाल्या व अजून आहेतही; परंतु त्यांपैकी कोणालाही याबाबत निर्णायक पुरावा देता आलेला नाही. तसेच जगातील एकाही विद्यापीठाने अशा सहाव्या इंद्रियाला, परामानस शक्तीला मान्यता दिलेली नाही.

भविष्यात घडणाऱ्या घटनांची चाहूल आधी लागणे असा स्वरूपांच्या दाव्यांवर गंभीर आक्षेप घ्यावयास हवेत.कारण याद्वारे असे सूचित केले जाते, की भविष्यकाळ हा जणू आधीच अस्तित्वात असतो. सर्वसामान्यांना त्यात डोकावता येत नाही; परंतु दैवी शक्ती लाभलेले पुरुष अथवा सहावे इंद्रिय लाभलेल्या व्यक्ती यांना या स्वरूपाची अलौकिक देणगी लाभलेली असते. याचा अर्थ असा होतो, की आधीच भविष्य ठरलेला माणूस पराधीन आहे. ते भविष्य निश्चित करणाऱ्या नियतीच्या हातांतील बाहुले आहे.

आपण हे कधीही मान्य करता कामा नये. मुले सहलीला गेली तर प्रत्येक मुलांच्या पालकांच्या मनात, ती सहलीहून सुखरूप परत येईपर्यंत एकदा वा अनेकदा विचार डोकावून जातोच, की 'माझी बाळे येतील ना सुखरूप परत? त्यांना काही अपघात वगैरे तर होणार नाही ना?'

असंख्य पालकांच्या मनात अनेक वेळा हा विचार येतो.

बहुसंख्य वेळा काही होत नाहीच. क्वचित कधीतरी काही अपघात वगैरे घडतो आणि मग मनातील मुलाबद्दलच्या स्वाभाविक काळजीमुळे निर्माण झालेल्या विचाराचे रूपांतर सहाव्या इंद्रियाद्वारे आधीच मिळालेला इशारा, असे मानण्यात येते.

माणसाच्या मेंदूच्या अफाट क्षमतेचे विज्ञानाचे आजचे आकलन बरेच अपुरे आहे.

उद्या संशोधनाने काही नवीनच सिद्ध झाले तर? लक्षात घ्या, सिद्ध झाले तर कोणतीही बाब मानण्याएवढे विज्ञान विनम्र आहे; पण आज तरी अनमानधपक्याने देखील सहाव्या इंद्रियाचा कसलाही पुरावा मिळत नाही. तुमच्या पाहण्यात असा कोणी आलाच,तर जरूर कळवा. त्याची तपासणी करण्यास आम्ही उत्सुक आहोत.

---------------

**नरेंद्र दाभोलकर**

(डॉ.नरेंद्र दाभोलकर लिखित व मनोविकास प्रकाशन प्रकाशित ठरलं..... डोळस व्हायचंच या पुस्तकातील (नसलेले) सहावे इंद्रिय या प्रकरणातून साभार.
सहकार्य - रमेश माने
८२७५९२४१७२)

●●●●●●●●●

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या मिशनचे पुनरुज्जीवन

महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक होऊन गेले त्यांच्यापैकीच एक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होते. त्यांनी दलितांचा उद्धार आणि अस्पृश्यता निवारण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यांच्या हालअपेष्ठा आणि त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे डिप्रेस्ड क्लास मिशनची स्थापन केली. अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य आयुष्यभर करेन असा निश्चय केल्यानंतर आणि भिंगारच्या कार्यक्रमानंतर ते मुंबईला गेले. त्याठिकाणी त्यांनी प्रार्थना समाजाचे पदाधिकारी व आपल्या सहकाऱ्यांबरोबर अस्पृश्यता निवारण करण्यावर सविस्तर चर्चा केली. त्यांच्या प्रयत्नामुळे प्रार्थना समाजानेसुद्धा अस्पृश्यता निर्मूलनासाठी व अस्पृश्यांच्या उद्धरासाठी कार्य केले. मुंबई येथील एफ्लिन्स्टन रोड येथे डिप्रेस्ड क्लासची पहिली शाळा स्थापन करण्यात आली. डिप्रेस्ड क्लास मिशनच्या माध्यमातून प्राथमिक व दुय्यम शाळा, वसतिगृहे, मोफत दवाखाने, उद्योग, इतर शाळा इत्यादी काम सुरू झाले.

---------------------

मिशनच्या कार्याचा व्याप वाढल्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे यांना कार्यकर्त्यांची आवश्यकता भासू लागली. त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यात तळमळ असणारे कार्यकर्ते शोधण्यास सुरुवात केली. ही सुरुवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली.

त्यांची बहीण पनवेल येथे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होती. त्यांच्या बहिणीने नोकरीचा राजीनामा देऊन मिशनचे कार्य करण्यास सुरु केले. त्यांचे आई-वडीलही जमखंडी सोडून मुंबईला आले.

त्यांनी आपल्या मुलांनी सुरु केलेल्या कार्यात भाग घेऊन अस्पृश्यता निवारण व दलितांच्या उद्धाराचे काम सुरु केले. त्यांच्या प्रयत्नामुळे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या कार्याची व्याप्ती वाढू लागली होती. महाराष्ट्राच्या बाहेरील प्रांतातही मिशनच्या शाखा स्थापन झाल्या होत्या.

दि. १८ ऑक्टोबर १९०९ रोजी डिप्रेस्ड क्लास मिशनचा तिसरा वर्धापन दिन मुंबईला टाऊन हॉलमध्ये साजरा करण्यात आला. यावेळी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड, सर नारायण चंदावरकर आणि गोपाळ कृष्ण गोखले आदी मान्यवर उपस्थित होते. याचवेळी महाराज सयाजीराव गायकवाड यांनी डिप्रेस्ड क्लास मिशनला दोन हजार रुपये देणगी जाहीर केली होती.

डिप्रेस्ड क्लास मिशनची शाळा व वसतिगृहे- मिशनने अनेक शाळा आणि वसतिगृहे सुरु केली होती. १९१२मध्ये विठ्ठल रामजी शिंदे कायम वास्तव्यासाठी पुणे येथे आले. पुणे येथे डिप्रेस्ड क्लास मिशनच्या चौदा ठिकाणी २३ शाळा, ५ वसतिगृहे आणि १२ इतर संस्था होत्या. मिशनचे पाच प्रचारक आणि शाळेत ५५ शिक्षक होते.

पुणे शाखेचा अहवाल पाहून तुकोजी महाराज होळकरांनी महर्षी शिंदेंना वीस हजार रुपये देणगी दिली. पुणे येथील सात एकर जमीन पुणे नगर परिषदेने ९९ वर्षाच्या कराराने मिशनच्या स्वाधीन केली. या जागेच्या आसपास त्या काळात अस्पृश्य समाजाची भोकरवाडी नावाची वस्ती होती. येथे १९२२मध्ये भव्य इमारत बांधण्यात आली. या इमारतीचे नाव अहिल्या आश्रम असे ठेवण्यात आले.

त्यांचे यश आणि त्यांनी सुरु केलेले सामाजिक कार्य काही लोकांना सहन झाले नाही. या लोकांनी अगदी खालच्या पातळीला जाऊन त्यांच्यावर आरोप केले. त्यांच्यावर चिखल फेकण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे १९२३मध्ये त्यांनी कंटाळून डिप्रेस्ड क्लास मिशनचे दायित्व ते ज्या समाजासाठी कार्य करीत होते त्यांच्याकडे सोपवून मिशनच्या कार्यातून मुक्त झाले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म दि.२३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटक राज्यातील जमखंडी येथे झाला. त्यांचे वडील रामजी व आई यमुना हे कानडी भाषिक असून ते वारकरी पंथाचे होते. त्यांचा परिवार जमखंडी गावात प्रतिष्ठित होता, पण आर्थिकदृष्ट्या संपन्न नव्हता. साधारण आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्याकाळी बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. या प्रथेनुसार विठ्ठल शिंदे यांचे लग्न वयाच्या ९व्या वर्षी रुक्मिणी नावाच्या मुलीशी झाले.

आई-वडील वारकरी असल्यामुळे त्यांच्यावर लहानपणापासून वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. त्यामुळे तेसुद्धा लहानपणापासून वारकरी संप्रदायाच्या भक्तिमार्गामध्ये रमले गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जमखंडी येथे पूर्ण झाले. वयाच्या १२ व्या वर्षी १८८५ मध्ये इंग्रजी हायस्कूलच्या पहिल्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला. इयत्ता दुसरीत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि त्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली.

ही शिष्यवृत्ती मॅट्रिक होईपर्यंत चालू होती. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर लगेच त्यांना संस्थानांच्या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली होती. परंतु पुढे आणखी शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा असल्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांनी गंगाराम मस्के यांच्या मदतीने पुणे येथे फर्ग्यूसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. फर्ग्यूसन कॉलेजमध्ये त्यांना दर महिन्याला दहा रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. या शिष्यवृत्तीत शैक्षणिक खर्च भगिवणे त्यांना कठीण जात होते. पण तश्याही स्थितीत त्यांनी शिक्षण सोडले नाही.

त्यांचा मित्र विष्णुपंत देशपांडे यांच्या मदतीमुळे ते पहिल्या वर्षाची परीक्षा देऊ शकले. इ.स. १८९३- १८९८ या काळात विठ्ठल रामजी शिंदे यांनी फर्ग्यूसन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवर बडोद्याच्या महाराज सयाजीराव गायकवाड यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांना दरमहा २५ रुपये शिष्यवृत्ती दिली होती.

डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन सोसायटी या संस्थेची सर्वप्रथम स्थापना १४ जून १९२८ रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृशांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी केली होती. डिप्रेस्ड क्लासेसमधील उच्च शालेय विद्यार्थ्यांचा विशेष लाभ घेण्यासाठी मुंबई सरकारने पनवेल, ठाणे, नाशिक, पुणे आणि धारवाड येथील पाच वसतिगृहाची जागा मंजूर केली.

दलितांचा उद्धार हाच आमचा ध्यास या ध्येयाने पुण्यातील नाना पेठ येथील दी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडियाची ११७ वर्षे वाटचाल सुरू आहे.



**कृष्णाकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

शोषित, पीडित आणि दलितांच्या विकासाचे ध्येय ठेवून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी या संस्थेची स्थापना करून पुनरुज्जीवन केले होते. सुरुवातीला मुंबई आणि पुणे या दोन्ही ठिकाणांहून संस्थेचे कामकाज सुरू होते. मात्र १९०८मध्ये महर्षी शिंदे यांनी पुण्यात संस्थेचे मुख्यालय असेल, असा निर्णय घेतला. हे येथे उल्लेखनीय!

●●●●●●●●●

# स्मितहास्याचे बक्षीस



**संत राजिंदरसिंहजी महाराज**

जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्ती अनेक संकटाचा सामना करत असतो. प्रत्येक मनुष्याला वाटते की तो सुखी जीवन जगावे आणि त्याच्या जीवनात कोणतीही अडचण न येवो.

आपल्याला असे वाटते की आपणच चिंतानी ग्रस्त आहोत. परंतु जेव्हा आपण दुसऱ्या लोकांची गोष्ट ऐकतो तर आपल्या लक्षात येईल की प्रत्येक जण आपल्या सारखा दुखी आहे.

वैद्यकीय (मेडिकल) संशोधन करणाऱ्यांनी स्वीकारले आहे की हसणे आणि स्मितहास्याचा प्रभाव आपल्या आरोग्यावर पडतो. त्यांनी या रिसर्च मध्ये शोध लावला आहे की आपल्या चेहऱ्याच्या मांसपेशींना स्मितहास्य करताना कोणताही जोर लावावा लागत नाही. परंतु क्रोध आल्यावर जास्त तणाव निर्माण होतो. त्यामुळे आपल्या आरोग्यावर त्याचा वाईट परिणाम पडतो.

स्मितहास्याचे अध्ययन केल्यावर असे समजते की स्मितहास्याने इंडोफर्म सारखे हार्मोन्स आपल्या शरीरात निर्माण होतात. ज्यामुळे, आपल्याला जाणवते की प्रसन्न करणारी शक्ती त्यात असते. जेव्हा आपल्या शरीरात या हार्मोन्स वाढ होते तेव्हा फक्त आपला आत्म्याला उभारी देणारी तसेच प्रतिकारशक्ती मजबूत होते, ज्यामुळे आपल्याला शरीरातील आजारापासून आपले रक्षण रक्षण होते.


स्मितहास्य चिंता दूर करणारे, क्रोधाला हास्यात बदलणारे, जिवन तणाव मुक्त करणारे एक चांगली साधन आहे. संशोधक सांगतात की आपण आपल्या आजाराचा कालावधी कमी करू शकतो आणि लवकरात लवकर बरे होऊ शकतो. त्या साठी डॉक्टर आपल्याला ध्यानाभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित करतात. लवकरच आरोग्य लाभ मिळण्यासाठी विश्रांती आणि ध्यान-अभ्यास, उपचार प्रक्रियेला शीघ्र गती देऊ शकतो. ते आपल्याला शांत परिस्थितीत आणतात. ज्यामुळे शरीरात असे हार्मोन्स उत्पन्न होतात जे आपले आरोग्य ठीक करतात. ध्यान-अभ्यास प्रक्रिया आपल्याला उपचार करण्यास साहाय्यक ठरते.

आपल्या ओठावर स्मितहास्य येण्यासाठी सर्वात चांगला परिणामकारक उपायांमध्ये एक आहे ध्यान-अभ्यास. जेव्हा आपण ध्यान-अभ्यास करतो तेव्हा खुशी आणि आनंदाच्या स्तोत्राशी आपण जोडले जातो आणि आपल्या अंतरी प्रभूचा अनुभव करतो. ज्यामुळे आपण चैतन्य व आनंदाने परिपूर्ण होतो.

आपला आत्मा प्रभु-रुपी महासागराचा एक थेंब आहे. जेव्हा आपण ध्यान-अभ्यास करतो, आपण आपल्या आत्म्या बरोबर जोडले जातो, जे आपले वास्तविक रूप आहे आणि आनंदाने परिपूर्ण आहे. येथे आपण प्रभु पासून उत्पन्न झालेल्या ज्योती व श्रुतीच्या धारेशी जोडले जातो. आनंदाच्या मानसरोवरात डुबकी मारतो, जे आपल्याला सदैव अमाप परमानंदाच्या महासागरात घेऊन जातात. या परमानंदाच्या महासागरात डुबकी मारल्याने जीवनातील अडचणी आणि दुःखापासून दूर होतो. आपला आत्मा एवढा प्रसन्न होतो की आपल्या चेहऱ्यावर कायम स्वरूपी स्मितहास्य बनून राहते. ■ ■ ■

# डेंग्यूला आता घाबरण्याची गरज नाही






डेंग्यू सारख्या डासांच्या प्रादुभार्ने होणाऱ्या जीवघेण्या आजारावर गेली अनेक वर्षे लस तयार करण्याचे प्रयत्न सुरु होते. गेली काही वर्षे भारतात यावर संशोधन सुरु होते. त्याला आता यश मिळाले असून येत्या काही काळात डेंग्यूवर लस उपलब्ध होणार आहे.

डेंग्यूच्या आजाराने अनेक जणांचे मृत्यू होत असतात. डेंग्यूमध्ये रक्तातील प्लेटलेट कमी होत असल्याने रुग्णाचा मृत्यू होण्याचा धोका होत असतो. प्लेट वाढण्यासाठी अनेक घरगुती उपायांसोबत अनेकांना तर रक्तातील प्लेटलेट चढविण्याची वेळ येते.

आता डेंग्यू बाबत इंडियन काऊन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च सेंटरने दिलासा दायक बातमी दिली आहे. भारताने डेंग्यूची लस विकसित केली असून तिच्या अंतिम ट्रायलवर काम चालू आहे.

इंडियन काऊन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च संचालक डॉ. राजीव बहल यांनी या संदर्भात माहिती दिली आहे. ते म्हणाले की भारताने डेंग्यूची लस तयार केली आहे. याचे तंत्रज्ञान अमेरिकेच्या एनआयएच यांनी तयार केले आहे. परंतू ते या लसीच्या निर्मितीपर्यंत पोहचले नव्हते. परंतू आता भारताने ही लसी संपूर्णपणे तयार करण्यात यश मिळविले आहे.

डेंग्यू साठी बनविलेल्या लसीला आयसीएमआरने पाठींबा दिला आहे. ड्रग कंट्रोल जनरलनी फेस-3 च्या अंतिम ट्रायलला मंजूरी दिली आहे. पुढील दोन वर्षांनंतर याचा रिझल्ट येणार आहे.

त्याचे रिझल्ट पॉझिटीव्ह आले तर आपल्याला व्हॅक्सीनचा वापर संपूर्णपणे करता येणार आहे. ही डेंग्यूवर देशात तयार होणारी पहीली लस होणार आहे. ही व्हॅक्सीन डेंग्यूसाठी फायदेशीर ठरणार आहे. गेली 81 वर्षे डेंग्यूवर लस संशोधन करता आली नव्हती.

**आणखी एका व्हॅक्सीनवर काम**

अशाच प्रकारे आणखी एका व्हॅक्सीनवर काम सुरु आहे, जी ज्युनोटिक आजारासाठी तयार करण्यात येणार आहे. या व्हॅक्सिनला भारतात तयार करण्यात आले आहे.

आयसीएमआर यांच्या सहकार्याने या दोन्ही लसी तयार होत आहेत. या लसीचे लहान प्राण्यांवर केलेल्या चाचण्यांना यश आले आहे. नंतर मोठे प्राणी आणि मानवावर चाचणी केली जाणार आहे. पहिल्या चाचणीला मंजूरी देखील मिळाल्याचे इंडियन काऊन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च संचालक डॉ. राजीव बहल यांनी म्हटले आहे.

**मंकी पॉक्स डायग्नोस्टीक टेस्ट**

भारतात एमपॉक्स आजाराचे ( मंकी पॉक्स ) निदान चाचणी कीट देखील विकसित करण्यात यश आलेले आहे. त्यामुळे या आजाराचे निदान करणे आता भारतात शक्य होणार आहे.

●●●●●●●●●

## वाचक लिहितात

### दारात मातीच्या पणत्या लावा!

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे.

दीपावली म्हणजे दिव्यांची रांग. दिवाळी खरेतर दिव्यांचा उत्सव. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळू हळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. सेल किंवा विद्युत प्रवाहावर चालणारे हे दिवे प्रकाश देत असले तरी पणत्यांमधून प्रक्षेपित होणारी सात्विकता यामध्ये नाही.

विजेच्या कृत्रिम दिव्यांमुळे मातीचे दिवे बनवणारी आणि ती विकणारी गोरगरीब मंडळी यांच्यावर संक्रांत येऊ लागली आहे. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार? या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

■ **जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**

## अशोकायन

### .. हे बरे नव्हे !

**जो तो उठतो**
**करतो आंदोलन**
**शासनाला इशारा**
**महागात पडेल**
**हे कोणते धोरण?**

**सनदशीर मार्गाने**
**प्रश्न आपले मांडा**
**संघटन शक्तिच्या जोरावर**
**कशाला करता राडा !**

**जखम चिघळली की**
**त्याचे बनते नासुर**
**शासनानेही निर्णय**
**घेण्यात करु नये कसुर.. !**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# बळ वाढवण्यासाठी सभासद नोंदणी आवश्यक-उदय शिंदे




■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २२ :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ही राज्यात अग्रगण्य शिक्षक संघटना असून राज्यातील शिक्षकांचे विविध प्रश्न आजपर्यंत या शिक्षक समितीच्या माध्यमातून सोडवले आहेत. शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी वेळप्रसंगी महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीने विविध आंदोलने, उपोषणे यासारखे प्रभावी अस्त्र उगारले आहे. शिक्षकांचे विविध प्रश्न मार्गी लावले आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचा फार मोठा मोलाचा वाटा राहीलेला आहे.

प्राथमिक शिक्षक समिती शाखा यवतमाळतर्फे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या कार्यकारीणीच्या सभेचे आयोजन रविवारी दि. २० ऑक्टोबर रोजी यवतमाळ जिल्हा शाखेच्या वतीने सहकार भवन येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक उदय शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विजय कोंबे, प्रमुख पाहुणे राजन कोरगावकर, आनंदा कांदळकर, किशोर पाटील, राजेश सावरकर, राजन सावंत, सतीश सांगळे, सय्यद शफिक अली, प्रफुल्ल फुंडकर उपस्थित होते. या सभेमध्ये महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांतील शिक्षक समितीचे राज्य आणि जिल्हा पदाधिकारी तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. यावेळी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

तसेच मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक आणि सहाय्यक शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

शिक्षक नेते उदय शिंदे यांनी राज्यात शिक्षक समितीचे बळ वाढवण्यासाठी राज्यातील पदाधिकाऱ्यांनी अधिकाधिक सभासद नोंदणी करावी असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी सभेचे अध्यक्ष तथा राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी शिक्षकांच्या विविध समस्या सोडवण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले व जिल्ह्यातील संघटनेचा आढवा घेत विविध संघटनात्मक समस्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येईल व आपल्या संघटनेचा लेखाजोखा मांडत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुंडलिक रेकलवार, जिल्हाध्यक्ष संदीप मोहाडे, जिल्हा सरचिटणीस नानासाहेब नाकाडे, जिल्हा नेते प्रफुल्ल फुंडकर, राज्य प्रमुख जुनी पेन्शन आघाडी गजानन देऊळकर, गुंडावार आदींनी परिश्रम घेतले.

# १८ दिवसांपूर्वी झालेल्या चोरीचा अद्यापर्यंत उलगडा झाला नाहीच

■ महासागर प्रतिनिधी,

**उमरखेड, दि. २२ :** मागील १८ दिवसांपूर्वी भरदिवसा आर्य वैश्य समाज बांधवाकडे लाखोंची चोरी झाली होती. या घटनेतील आरोपीस अद्याप अटक न झाल्यामुळे लवकरात लवकर कारवाई व्हावी याकरिता उपविभागीय पोलिस अधिकारी यांना समाजाच्या वतीने सोमवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी निवेदन देण्यात आले.

येथील श्रीकांत जनार्दन मामीडवार यांच्या घरी ३ ऑक्टोबर रोजी अंदाजे दुपारी १ ते २ च्या दरम्यान भरदिवसा अज्ञात गुन्हेगारांनी चोरी करुन घरातील मौल्यवान वस्तू व नगदी पैसे चोरुन नेले. सदर प्रकरणी पोलिस स्टेशन, उमरखेड येथे अज्ञात गुन्हेगारांविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे. सदर घटनेला आज दिवस झालेले असताना सुध्दा अद्यापपर्यंत आपल्या यंत्रणेला सदर गुन्हेगारांना पकडण्यास यश आलेले नसून व्यापारी बांधव मोठ्या प्रमाणात दहशती खाली आहेत.




त्यामुळे या निवेदनाद्वारे स्थानिक आर्य वैश्य समाज अध्यक्ष व सर्व समाज बांधवांच्या वतीने २१ ऑक्टोबर रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी यांना संबंधीत चोरीतील गुन्हेगांराचा तत्काळ शोध घेउन त्यांना अटक करावी व त्यांच्यावर कडक शासन करावे व आमच्या समाज बांधवाचे चोरीला गेलेले सर्व मौल्यवान वस्तु व नगदी पैसे त्यांना परत मिळावे. भर दिवसा झालेल्या चोरीच्या घटनेमुळे आमचे समाज बांधव अस्वस्थ आहेत. आपण या प्रकरणी तत्काळ कार्यवाही करावी अश्या आशयाचे निवेदन देण्यात आले. यावेळी आर्य वैश्य समाज अध्यक्ष सुरेंद्र कोडगिरवार सचिव डॉ. गजानन कोडगीरवार, व्यंकटेश पेन्शनवार, सचिन निलपवार, महेश पत्तेवार, डॉ. चंद्रकांत निलपवार, उदय पत्तेवार, संजय गुजलवार, वैभव कोडगिरवार, रितेश नीलावार, नंदकुमार पेन्शनवार, प्रदीप पत्तेवार, डॉ. धनंजय व्यवहारे, गजानन लंकेपिल्लेवार यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

# बँक, सेतू केंद्रात सकाळपासूनच लागतात लाडक्या बहिणींच्या रांगा

■ महासागर प्रतिनिधी,

**मारेगाव,दि. २२ :** महाराष्ट्र शासनाने चार-पाच महिन्यापूर्वी सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे बँकेत महिलांची तोबा गर्दी उसळत असून सकाळी बँका उघडण्याअगोदरच बँकेच्या दारात महिलांच्या रांगा दिसत आहेत. त्याचा बँकेच्या इतर कामांवर परिणाम होत असून नियमित ग्राहक त्रस्त झाले असल्याचे दिसून येत आहे.



नुकतीच राज्य सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरु केली तेंव्हापासून शहरासह ग्रामीण भागातील हजारो महिलांनी लाडकी बहीण योजनेचा फार्म भरण्यासाठी सकाळी सात वाजता पासूनच सेतू केंद्र बँका मध्ये हजेरी लावली होती. दरम्यान ग्रामीण भागातील आलेल्या अनेक महिलांचे बँकेत खाते नसल्याने मोठ्या अडचणी त्यांना सहन कराव्या लागल्या. आधी खाते उघडा, ज्यांचे खाते आहे त्यांनी केवायसी करावी लागत असल्याने मोठी गर्दी झाली होती ती आजही कायम आहे. त्यानंतर लाडक्या बहिणीला काही महिन्याचे मानधनही जमा झाले आहे. मात्र अजूनही काही महिला या योजनेपासून विविध कारनाने वंचित आहे. त्यामुळे पैसे काढण्यासाठी आणि खाते अपडेट करण्यासाठी महिलांची सकाळ पासूनच बँकेत गर्दी सुरु होते. या महिला रांगा लाऊन उभ्या असतात. त्यामुळे सामान्य नियमित ग्राहकांना तासनतास ताटकळत थांबवे लागते.

शासनाने बँकांमध्ये लाडकी बहीण योजनेसाठी स्वतंत्र कक्ष सुरू केल्यास बँकेच्या इतर खातेदारांसाठी ते सोयीस्कर होईल. त्यामुळे खातेदारासह इतर कामांसाठी आलेल्या लोकांना त्याचा नाहक त्रास सोसावा लागणार नाही. सध्या ज्यांचे खात्यात पैसे जमा झाले त्या महिला आणि ज्या महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत त्यांना बँकेत खात्याला आधार लिंक करण्यासाठी आणि नवीन खाते काढण्यासाठी मोठी गर्दी होत आहे. तसेच बँकेत पैसे जमा झाले आहेत की नाही? यासाठी पासबुक भरण्यासाठी महिला बँकेत थांबलेल्या दिसत आहेत. लाडकी बहीण योजनेच्या कामासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करून महिलांची होणारी गैरसोय दूर करावी. ग्रामीण भागातील महिला अशिक्षित असल्याने त्यांना बँकेच्या कारभाराची नीट माहिती नाही. त्या महिलांनी ताटकळत थांबावे लागत आहे. कामात सुटसुटीतपणा हवा. -किरण विनोद क्षीरसागर, लाभार्थी महिला.

महिलांची गैरसोय टाळा मारेगाव तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. संपूर्ण तालुक्यात मोजक्याच बँका आहे. त्यामुळे या महिलांची बँकात तुफाम गर्दी होते.

सकाळीच या महिला मिळेल त्या वाहनाने बँकेत येतात. मात्र बँकेत त्यांची कामे वेळेवर होत नसल्याने त्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यांना मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सोबतच या महिलांसाठी काही बँकेत स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, बसण्यासाठी सावलीची जागा ही नाही. त्यामुळे महिलांची कुचंबना होत आहे. त्यामुळे लाडक्या बहिणीसाठी बँकेत स्वतंत्र कक्ष सुरु करावा अशी मागणी होत आहे.

# दिवाळी पर्यटनासाठी लालपरी झाली सज्ज

## पुण्यासाठी विभागातून २२ बसचे नियोजन

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि.२२ :** दिवाळीच्या सुट्टीचा आनंद एसटी प्रवाशांना घेता यावा. याकरिता पुणे येथून यवतमाळकडे येणाऱ्या प्रवाशांच्या सुविधेकरिता अतिरिक्त बसचे नियोजन एसटी महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. पुणे येथून येण्याकरिता २६ ते ३१ ऑक्टोबर व यवतमाळ येथून जाण्याकरिता ३ ते ११ नोव्हेंबर दरम्यान २२ अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. या बसच्या दररोज चार फेऱ्या होतील.

दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी होत असते. मागील वर्षी या मार्गावर दररोज पाच अतिरिक्त बस सोडण्यात आल्या होत्या. यंदा मात्र प्रवाशांची मागणी पाहता पुणे येथून यवतमाळकरिता २२ अतिरिक्त बसचे नियोजन एसटी महामंडळाच्या वतीने केले आहे. याकरिता ऑनलाइन आरक्षणाची सुविधा देण्यात आली आहे. आतापर्यंत पुणे येथून यवतमाळसाठी बुकिंग करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांनी ऑनलाइन आरक्षण करण्याचे आवाहन विभाग नियंत्रक अमृत कच्छवे यांनी केले आहे.

प्रवाशांना अशी करता येईल ऑनलाइन बुकिंग शिवशाही व साधारण बसची पुणे व यवतमाळ येथूनही ऑनलाइन बुकिंगची सुविधा एसटी महामंडळाच्या वतीने करण्यात आली. ऑनलाइन बुकिंग रेड बस तसेच ॲप्स व राज्य परिवहन विभागाच्या वेबसाइटवर जाऊन करता येणार आहे. याकरिता सांकेतिक कोड देण्यात आला आहे. पुण्याकरिता पीसीएनटी व यवतमाळसाठी वायएमटी कोडचा वापर करता येईल.

# कंटेनरच्या धडकेत युवक ठार

■ महासागर प्रतिनिधी,

**दारव्हा ,दि. २२ :** भरधाव वेगात येणाऱ्या कंटेनरने दुचाकीस्वाराला जबर धडक दिल्याने दुचाकीस्वार युवक जागीच ठार झाला. यवतमाळ-दारव्हा मार्गावर मुंगसाजी महराज महाविद्यालयाजवळ सोमवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी झालेला हा अपघात इतका भीषण होता की, या अपघातात सदर युवकाच्या शरीराचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्रशांत पंडित राठोड (वय १७) रा. मांगकिन्ही ता. दारव्हा असे त्या युवकाचे नाव आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, मृतक प्रशांत राठोड हा युवक बहीणीला महाविद्यालयात सोडण्यासाठी जात असताना रस्त्यात समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. हा अपघात इतका भयावह होता की, कंटेनरच्या चाकाखाली आल्यामुळे युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर यावेळी दुचाकीवर मागे बसून असलेली, त्या युवकाची बहीण दुचाकीवरुन दुभाजकावर फेकल्या गेल्याने तिचे प्राण वाचले. घटनेची माहिती मिळताच दारव्हा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह रुग्णालयात रवाना करण्यात आला.

**एल्&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** नागपुर

L&T Finance

### ताबा सूचना
[नियम-8(1)]

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल्&टी फायनान्स लिमिटेडचा (आधीचे नाव, एल्&टी हाउसिंग फायनान्स होल्डिंग्ज लि.) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, 2002 [नियम 3] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13(12) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल 8 सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13 अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| कर्ज खाते क्रमांक | कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव | गहाण मालमत्तेचा तपशिल | मागणी सूचना | | ताबा घेतल्याची तारीख व प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | थकित रक्कम (₹) | |
| H012421406 21124928 & H147981406 21052459 | (1) विजय नारायणराव क्षीरसागर कर्जदार म्हणून आणि (2) हेमलता तुळशीराम डांगे | अनुसूची-1 अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : 70.46 चौ.मी. अधिमापन असणारी जमीन, वतनी क्र. 2/16 येथे स्थित, त्याच्या खाली आणि त्याच्याशी निगडित, बांधकाम क्षेत्रफळाचे अधिमापन 27.32 चौ.मी. मौजे : हंसापुरी, पी. एच. क्र. 11, खासरा क्र. 49 आणि 50, शहर सर्व्हे क्र. 1949, शीट क्र. 324/22, प्रभाग क्र. 91, विदर्भ हाऊसिंग कॉलनी येथे स्थित, पाचपाऊली, कॉर्पोरेशन हाऊस क्र. 756/91, पाचपाऊली, नागपुर, नागपुर शहराच्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये, आणि नागपुर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, नागपुरच्या हद्दीमध्ये आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध : सीमारेषा — पूर्व: वतनी क्र. 1/16; पश्चिम: वतनी क्र. 3/16; उत्तर: वतनी क्र. 5/10; दक्षिण: 7.50 मीटर रुंद रस्ता | 08.08.2024 | 07-08-2024 रोजीनुसार रु. 35,89,450.76/- | 18.10.2024 प्रतिकात्मक ताबा |

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल्&टी फायनान्स लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

दिनांक: 23.10.2024
ठिकाण: नागपुर

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

# दारु पिताना झाला वाद; तरुणाचा भोसकून खून

■ महासागर प्रतिनिधी,

**यवतमाळ , दि. २२ :** बारमध्ये बसुन दारु पितांना झालेल्या शुल्लक वादातून एका तरुणास बारच्या समोरच चाकूने भोसकण्यात आले. ही घटना रविवारी दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास आर्णी मार्गावर असलेल्या एका बारसमोर घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा सोमवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३०. वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने आर्णी मार्गावर वाढलेली तरुणांची गुंडागर्दी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. परमेश्वर जाधव (वय ३५) वर्षे रा. गोविंदनगर, जांब रोड असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आर्णी मार्गावरी असलेल्या एका परमेश्वर जाधव आपल्या साथीदारांसोबत दारू पीत होते. त्या ठिकाणी बसून असलेला आरोपी उत्कर्ष उर्फ मन्नू जयस्वाल (वय २५) रा. इतवारी चौक, छोटी गुजरी, आकाश कुबडे, ऋषीकेश खोडे यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची चालू होती.

त्यावेळी बारमधील दोघांनी परमेश्वर जाधव याच्यासोबत चर्चा केली. त्या चर्चेनंतर मन्नू जयस्वालची समजूत काढण्याकरिता परमेश्वर गेला असता, त्याने परमेश्वर जाधव याच्या कानशिलात लगावली. रागाच्या भरात परमेश्वर जाधव याने टेबलवर ठेवून असलेली बियरची बॉटल त्याच्या डोक्यात मारली. या वादानंतर बारच्या मॅनेजरने मन्नू आणि त्याच्या सोबतचे आकाश कुबडे, ऋषीकेश खोडे यांना बाहेर काढून दिले.

परंतु बारच्या बाहेरच तिन्ही आरोपींनी रात्री ११ वाजता परमेश्वर जाधवला पकडले.

यावेळी मन्नू जयस्वालने चाकू काढून परमेश्वर जाधवच्या पोटात आणि डोक्यावर मारला. यावेळी त्याला सोडवण्याकरिता गेलेल्या वैभव इंगोले याच्यावरही चाकू हल्ला केला. या घटनेनंतर तिन्ही आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

शस्त्रक्रिया झाल्यावर मृत्यू दरम्यान या हल्ल्यात जखमी झालेल्या दोघांनाही रात्रीच जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले. अति रक्तस्राव झाल्याने परमेश्वर जाधव याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. परंतु सोमवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला.

# विद्युत तारांना स्पर्श झाल्याने शेतकरी ठार

## रोहीला हाकलत असताना घडली घटना, पोलिसांत घटनेची नोंद

■ महासागर प्रतिनिधी,

**दिग्रस, दि. २२ :** शेतीला लावलेल्या जिंवत विद्युत तारेच्या कुंपणाला स्पर्श झाल्याने शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान तालुक्यातील मोख क्र. १ शेतशिवारात उघडकीस आली. बालचंद सीताराम चव्हाण वय ५२ वर्षे रा. लिंगी वाई असे मृतक शेतकऱ्याचे नाव आहे.या प्रकरणी सविस्तर असे की, मोख क्र. १ शिवारातील शेतात काढलेल्या सोयाबीन गंजी पिकावर बालचंद चव्हाण व बाबूसिंग दयाराम चव्हाण हे ताडपत्री टाकण्यासाठी गेले होते. यावेळी अचानक शेतात रोही जनावर आल्याने त्याला शेतातुन हाकलण्यासाठी बालचंद चव्हाण धावले. ते रोहीला हाकलत असताना शेताशेजारी असलेल्या विष्णू दत्ताराम जाधव यांच्या शेताकडे गेले असता त्या शेतात जनावरांसाठी लावलेल्या आणि विज प्रवाह सोडलेल्या तार कुंपणाला शेतकरी बालचंद चव्हाण यांचा स्पर्श झाल्याने त्याचा जबर धक्का बसुन ते जमीनीवर कोसळले. यावेळी ते जागीच ठार झाले. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली असता पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करून मृतदेह दिग्रस ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SAKINA MULLA MURTAZA ALI.** NOW MY NEW NAME IS **SAKINA MURTAZA BADRI.**
**ADD :** H-NO 2040/67 OPP SHARDA ISPAT KAMPTEE ROAD NAGPUR: 440026 (MS)

MY OLD NAME WAS **MULLA MURTAZA ALI.** NOW MY NEW NAME IS **MURTAZA BADRI.**
**ADD :** H-NO 2040/67 OPP SHARDA ISPAT KAMPTEE ROAD UPPALWADI NAGPUR: 440026 (MS)

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ABID ANSARI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ABID ABDUL KHALIQUE ANSARI.**
**ADD :** 1237 TAJ NAGAR TEKA PANCHISIL ROAD DR AMBEDKAR MARG 440017

MY OLD NAME WAS **MOHAMMAD DILSHAD MOHAMMAD ABID ANSARI.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD DILSHAD MOHAMMAD ABID.**
**ADD :** PLOT NO 1237 TAJ NAGAR TEKA PANCHISIL ROAD DR AMBEDKAR MARG S.O NAGAR 440017

MY OLD NAME WAS **NAZMA BEGUM.** NOW MY NEW NAME IS **NAJMA BANO.**
**ADD :** NEAR SHAKIL KANTROL TAKIYA DIWAN SHAH MOMINPURA NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **JAYANT VAISHYA.** NOW MY NEW NAME IS **JAYANT KUMAR VAISHYA.**
**ADD :** 24 , MAJI SAINIK SOCIETY, MANKAPUR NAGPUR 440030

MY OLD NAME WAS **BHUPENDRA DAYALSINGH YADAO.** NOW MY NEW NAME IS **BHUPENDRA DAYALSINGH YADAV.**
**ADD :** BEHIND LAKAD GANJ MASJID YADAV NAGAR KAMPTEE NAGPUR

MY OLD NAME WAS **ISMAILBHAI ABBASALI.** NOW MY NEW NAME IS **ISMAIL AZIM.**
**ADD :** PLOT NO 2342, JAMALI BUILDING, MOHAMMADI MOHALLA BINAKI MANGALWARI, NAGPUR - 440017 (M.S.)

# कार्यालय नगर परिषद कामठी

कमांक-नपका/कवि/४११५ /२०२४ दिनांक - २२/१०/२०२४

### जाहिर सुचना

**सर्व नागरीकांना कळविण्यात येत आहे की, खालील दर्शविलेल्यानुसार घर / प्लॉट क्रमांक वर नाव दाखल खारीज करण्याकरीता अर्जदाराने संबंधीत घराचे कागदपत्र तसेच तहसिल कार्यालय / नझूल कार्यालयाचे रिकार्ड अर्जासह सादर केलेला आहे. न.प. रिकार्डनुसार घर कमांक / प्लॉट क्रमांक वर खालील दर्शविल्याप्रमाणे नावाची नोंद आहे. तरी कुणास नाव दाखल खारीज विषयी आक्षेप असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिध्दी झाल्याचे ७ दिवसाचे आत न.प. कामठी कार्यालयात लेखी आक्षेप व सोबत संबंधीत घराचे कागदपत्रे सादर करावे अन्यथा न.प. रिकार्डमध्ये संबंधित घरावर नाव दाखल करण्यात येईल.**

| अ.क्र | वार्ड क्र | घर कमाक | सध्या स्थितीत न.प. रिकॉर्ड मध्ये दाखल असलेले तसेच खारीज करावयाचे असलेल्यांचे नांव व पत्ता | कोणत्या आधारावर नाव दाखल करावयाचे आहे | सादर कागदपत्रानुसार न.प. रिकॉर्ड मध्ये दाखल करावयाचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 29 | NL/22 | हाजी मोहम्मद ईस्माईल शेख खनु | वारसानपत्र | मोहसीन कमाल व हाजी मुमताज अहमद |
| 2 | 29 | NL/23 | हाजी मोहम्मद ईस्माईल शेख खनु | वारसानपत्र | वकार अहमद व हाजी मुमताज अहमद |
| 3 | 29 | NL/21 | हाजी मोहम्मद ईस्माईल शेख खनु | वारसानपत्र | अहसन जमाल व हाजी मुमताज अहमद |
| 4 | 28 | NL/11 | गगुबाई जैराम गजीमये | वारसानपत्र | इंदिरा शरद गजभिये / शशांक शरद गजभिये / सक्षम शरद गजभिये |
| 5 | 30 | NL/0114 | किसन सुखराम गजीभये | वारसानपत्र | विशाल सुरेश गजीभये / प्रदीप सुरेश गजीभये / सुदश सुरेश गजीभय |
| 6 | 28 | NL/830/831 | मेहम्मद आबिद व अशरफुल हक | वारसानपत्र | मोहम्मद उबैद अंसाररी व मोहम्मद फारूक |
| 7 | 28 | V/13/14/2/1 | रामचंद्र व सावलीया | विक्रीपत्र | एहतेशामुद्दीन मोहम्मद जहीर रशीदी |
| 8 | 10 | F/389/390 | त्रिलोकचंद किसनलाल गुप्ता | विक्रीपत्र | रेहाना बगेम शकील अहमद |
| 9 | 18 | K/207/1 (35.10 चौ.मी ) | मंदा उमराव बडगे / पलाश उमराव बडगे / प्रेरणा उमराव बडगे | विक्रीपत्र | कुदसिया जहेरा हैदरी व फिरोज हैदर हैदरी / तस्नीम जहेरा हैदरी व फिरोज हैदर हैदरी / फहीम हैदर हैदरी व फिरोज हैदर हैदरी |

मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# निरामय

## कर्बोदकांमुळेही होतं वजन कमी

आरोग्यमंत्र

अन्नातून मिळणाऱ्या कर्बोदकांचे अनेक उपयोग आहेत. वजन कमी करण्यातही कर्बोदकांची महत्त्वाची भूमिका असते. या प्रक्रियेत कर्बोदकांचा वापर कसा करावा याविषयी...

कर्बोदकांना शरीराचं प्रमुख इंधन म्हटलं तर वावगं ठरणार नाही. नियमित व्यायाम करणाऱ्यांच्या आहारात कर्बोदकं असायला हवीत. या घटकामुळे शरीराला ऊर्जा मिळते. त्यामुळे कमी कर्बोदकयुक्त किंवा कर्बोदकंविरहित आहार घेतल्याने थोडी कामं केल्यानंतर दम ल्यासारखं वाटतं. शरीरातल्या इन्शुलिनच्या पातळीवर कर्बोदकं खूप मोठा परिणाम करतात. साखर, पांढरा ब्रेड, मैदा, पास्ता, तळलेले पदार्थ, जंक फूड यातून मिळणारी कर्बोदकं अनारोग्यदायी असतात तर ताजी फळं, भाज्या, डाळी,



कडधान्यं, हातसडीचा तांदूळ, रताळी, सुका मेवा, विविध प्रकारच्या बिया यामधली कर्बोदकं शरीरासाठी लाभदायी असल्याने वजन कमी करण्याच्या दृष्टीने त्यांचं आहारातलं प्रमाण वाढवावं. कोणताही पोषक घटक आहारातून पूर्णपणे वर्ज्य करू नये.

## तास न तास मोबाईलवर व्यस्त असल्याने लठ्ठपणा

आरोग्य विशेष

आजकालच्या बदलत्या जीवनशैलीत मोबाईल फोन काळाची गरज बनली आहे. दैनंदिन जीवनात अनेक गोष्टी मोबाईलचा वापर करून केल्या जातात. जेवणाच्या ताटात जंक असेल, तर त्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. त्याचबरोबर स्मार्टफोनची स्क्रीन तास न तास स्क्रोल करण्याच्या सवयीबाबतही हेच लागू होते. ज्यामुळे तुम्ही डिजिटल ओबेसिटी म्हणजेच लठ्ठपणाचे बळी होऊ शकता.

मोबाईलवर दाखवणाऱ्या जंकफूडमुळेही सतत भूक लागते. नूडल्स, पास्ता किंवा एखादा चमचमीत खाद्यपदार्थ खाद्यप्रेमींना त्वरित आकर्षित करतो. ते आरोग्यासाठी चांगले नाही, हे माहीत असूनही ते दिवसभरात कधीही खाऊ शकतात. इंटरनेट प्लॅटफॉर्मवर दिला जाणारा कंटेंट जंक फूड खाणाऱ्या लोकांना आकर्षित करतो. लोक दिवसाच्या कोणत्याही वेळी तास न तास त्यांचे सेवन करतात. यामुळे तणावपूर्ण जीवनात तात्पुरता आराम मिळू शकतो; परंतु असलेल्या कंटेटचा भारी डोस एखाद्याला लठ्ठपणाचा बळी बनवण्यासाठी पुरेसा आहे. वास्तविक, इंटरनेट प्लॅटफॉर्म अशा प्रकारे डिझाइन केले गेले आहे, की तुम्ही त्यात बराच वेळ अडकून राहाल. स्क्रोल करत राहाल. जर तुम्हाला काही नवीन दिसले तर ते तुम्हाला काहीतरी नवीन शोधण्यासाठी प्रोत्साहित करते.



या स्थितीला ब्रेन कंडिशनिंग म्हणतात. आपण वारंवार करत असलेल्या गोष्टी आपला मेंदू सहज स्वीकारतो. काही वेळानंतर ते ऑटो मोडमध्ये सुरू होते. उदाहरणार्थ, कार चालवताना, आपण गाणी ऐकतो आणि एकाच वेळी क्लच, एक्सलेटर इत्यादीकडे लक्ष देतो. कधी कधी आपण फोनवरही बोलतो. काही जण मोबाईलवर स्क्रोल करण्यात इतके गुंतून जातात, की स्मार्टफोन आणि लॅपटॉपवर नाचणारी बोट क्षणभरही थांबत नाहीत किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर फोन थोडा वेळ खाली ठेवावासा वाटत नाही. अनेकदा 'सोशल मीडिया'वर अशा काही चमचमीत जंकफूडचा व्हिडीओ दाखवला जातो, की तुम्ही स्वतःच अनेक रोगांना आमंत्रण देत आहात. काहीतरी नवीन पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची भूक असा आवेग घेऊन येते, जी तुम्हाला इंटरनेटच्या जगात घेऊन जाते. आधी तुम्हाला आवडलेल्या गोष्टी खाण्याची सवय लागली, मग काहीतरी नवीन करून बघताना, सतत बसून राहून तुम्हाला खूप त्रास होतोय हे विसरलात. 'जर्नल ऑफ अप्लाइड फिजियोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, दिवसातून १३ तासांपेक्षा जास्त वेळ बसणे आरोग्यासाठी हानीकारक ठरू शकते. ही प्रवृत्ती एखाद्याला उच्च रक्तदाब आणि उच्च रक्तदाबाच्या काठावर आणू शकते. इंटरनेट मीडियावर तुम्ही वापरत असलेल्या मजकुराचा तुम्हाला काही उपयोग होत नाही, ही भावना तुम्हाला निरर्थक वाटते. वेळ वाया घालवून काहीही न मिळाल्याने निर्माण झालेली चिंता विसरण्यासाठी अनेकजण मेडिटेशन कोर्सेस आणि रिट्रीट सेंटर्सवर प्रचंड पैसा खर्च करत आहेत. अनेकदा आपण लांबच्या सुट्ट्यांवरही जातो;पण परत आल्यावर आयुष्य त्याच मोडवर येते. तोच मोबाइल, तेच कंटेंट आणि चिंता, जी तुम्हाला कधीही सोडत नाही. व्यक्तीची एकाग्रता आता आठ सेकंदांवर शॉर्ट फिल्म्स आणि रील्सच्या जमान्यात, तीन तासांचा चित्रपट पाहणे आता बहुतेकांना जड वाटते.

गेल्या काही वर्षांत एकाच ठिकाणी लक्ष केंद्रित करण्याचा कालावधी खूप वेगाने कमी झाला आहे. सुमारे दोन दशकांपूर्वी २४ मिनिटे एकाग्रता करणाऱ्या व्यक्तीची एकाग्रता आता आठ सेकंदांवर आली आहे, जी नऊ सेकंदांच्या गोल्डफिशच्या एकाग्रतेच्या कालावधीपेक्षा कमी आहे. जर विस्मरणाची समस्या वाढली असेल तर हे देखील त्याचे कारण आहे की, मेंदू लक्षपूर्वक ऐकल्यानंतरच काहीतरी लक्षात ठेवू शकतो; पण छोटी कामे करतानाही मन चंचल राहिले तर काळजी करण्याची बाब आहे. जर कुटुंबातील एखाद्याने तक्रार केली असेल, की आपण त्यांच्याशी बोलत असताना फोनकडे पाहत राहतो, तर हे लक्षण आहे की, आता नातेसंबंधांना वेळ देणे आवश्यक आहे. डिजीटल ओबेसिटीमुळे होणारी अस्वस्थता तुम्हाला कुटुंबापासून, प्रियजनांपासून आणि अगदी समाजापासून दूर घेऊन गेली आहे. प्रत्येकजण म्हणतो, की आता आयुष्य एकाकीपणात घालवले जाते.

## अपमृत्यूचा धोका ओळखण्यासाठी

नवसंशोधन

गंभीर आजारांमुळे मध्यमवयीन प्रौढांमध्ये असणारा अपमृत्यूचा धोका ओळखणारी एक प्रणाली शास्त्रज्ञांनी तयार केली आहे. ही प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर काम करेल. 'प्लॉस वन' या जर्नलमध्ये या संशोधनाची माहिती प्रसिद्ध झाली आहे. रँडम फॉरेस्ट आणि डीप लर्निंग अशी दोन मॉडेल्स या प्रणालीअंतर्गत काम करतील. या दोन्ही मॉडेल्सनी अत्यंत अचूक अशी निरिक्षणं नोंदवल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. ही मॉडेल्स व्यक्तीच्या आसपासचं वातावरण, खानपान, जीवनशैली, वैद्यकीय आणि बायोमेट्रिक या बाबींचं मूल्यांकन करून निष्कर्षापर्यंत पोहोचतात. तसंच त्यांच्या दैनंदिन आहारातल्या फळं, भाज्या आणि मांसाच्या प्रमाणाचीही नोंद घेतात. या संशोधनासाठी ४० ते ६९ वयोगटातल्या लोकांचा अभ्यास करण्यात आला.



## कधी घासावेत दात?

दंतारोग्य

सकाळी उठल्यानंतर दात घासल्यानंतरच आपण काहीही खातो. मात्र काहीजण नाश्ता केल्यावर दात घासण्यावर भर देतात. दंततज्ज्ञांच्या मते सकाळी उठल्यानंतर लगेच दात घासायला हवेत. यामुळे झोपेत दातांवर साचलेला प्लाक, बॅक्टेरिया निघून जातात आणि तोंड स्वच्छ होतं. मात्र नाश्ता केल्यानंतर दात घासण्याआधी साधारण तासभर थांबायला हवं. तुमच्या आहारातले साखर किंवा आंबट फळांचे रसांसारखे आम्लयुक्त घटक तोंडातल्या पीएचची पातळी बिघडवून टाकतात. यामुळे दातांचं कवच म्हणून काम करणाऱ्या एनामेलवर विपरित परिणाम होतो. खाल्ल्यानंतर दात घासल्याने एनामेलचं नाजूक कवच नष्ट होतं आणि आम्ल दातांच्या आत खोलपर्यंत गेल्याने खराब होण्याची शक्यता असते.



## दर्जेदार उत्पादनं वापरा

आरोग्य डोळ्यांचं

विविध प्रसंगी डोळ्यांचा मेक अप केला जातो. या मेक अप दरम्यान वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमुळे डोळ्यांना जंतूसंसर्ग होण्याचा धोका असतो. त्यामुळे दर्जेदार उत्पदानं वापरण्यावर भर द्यायला हवा. सध्या कृत्रिम पापण्या वापरण्याचा ट्रेंड आहे. क्वचित प्रसंगी अशा पापण्या वापरणं योग्य ठरतं. मात्र दररोज कृत्रिम पापण्या वापरत असाल तर त्यांच्या दर्जाकडे लक्ष द्या. या पापण्यांमधल्या घटकांमुळे डोळ्यांना सूज येणं, डोळे लाल होणं यासारख्या समस्या उद्‌भवण्याची शक्यता असते. डोळ्यांच्या खालच्या भागात फाउंडेशन लावल्याने डोळे सूजणं, जळजळणं यासारखा त्रास होऊ शकतो.



## भूक मंदावली तर...

आजीबाईंचा बटवा

विविध वयोगटातल्या लोकांना भूक मंदावण्याची समस्या भेडसावते. बहुसंख्य प्रकरणांमध्ये यामागे अगदी साधी कारणं असतात. अस्वस्थता, ताण, नैराश्य यामुळेही भूक लागत नाही. भूक न लागण्यावर काही घरगुती उपाय करता येतील. मिरीमध्ये औषधी गुणधर्म असतात. अनेक वर्षांपासून पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी मिरीचा वापर केला जातो. भूक लागत नसेल तर चमचाभर गूळ बारीक करून घ्या. त्यात अर्धा चमचा मिरपूड मिसळा. हे मिश्रण नियमितपणे किंवा बरं वाटेपर्यंत खा. आवळ्यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. तसंच यकृत स्वच्छ करण्याचं कामही आवळा करतो. पोटाच्या तक्रारी असतील तर एका भांड्यात दोन चमचे आवळा रस, लिंबाचा रस आणि तेवढाच मध घ्या. हे मिश्रण नीट हलवून घ्या. नियमित प्या. वेलची चघळल्यामुळेही आराम



## बुरशीजन्य संसर्गरोग जीवघेणा

लक्षात घ्या

बुरशीजन्य संसर्गामुळे होणाऱ्या रोगांकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो; पण ते गंभीर स्वरूप धारण करू शकते. बुरशीजन्य संसर्गाचे प्रारंभिक लक्षण म्हणजे अनेकदा खाज सुटणे; पण दुर्लक्ष केल्यास ते जीवघेण्या आजाराचे रूप घेऊ शकते. आकडेवारीनुसार, बुरशीजन्य संसर्गामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या सातत्याने वाढत आहे.




'मँचेस्टर युनिव्हर्सिटीच्या फंगल इन्फेक्शन ग्रुप'नुसार, दरवर्षी ३८ लाख लोकांना या संसर्गाचा त्रास होतो. ही संख्या एकूण मृत्यूच्या ६.८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. आजकाल लोक बुरशीजन्य संसर्गाबाबत सावध होत आहेत. बहुतेक प्रकरणांमध्ये लोक हा रोग ओळखू शकत नाहीत. बुरशीजन्य संसर्गामध्ये बहुतेक लोकांचा मृत्यू कँडिंडा बुरशीमुळे होतो. कॅन्डिडा नावाची बुरशी मानवी शरीरावर हल्ला करते, तेव्हा कॅन्डिडिआसिस होतो. ही बुरशी प्रथम त्वचेमध्ये प्रवेश करते आणि नंतर त्वचेद्वारे तोंड, घसा, आतडे आणि खासगी भागात प्रवेश करते. जेव्हा ती रक्तात प्रवेश करते, तेव्हा ते मूत्रपिंड, हृदय आणि मेंदूवरदेखील हल्ला करते. त्यामुळे समस्या उद्भवतात. कँडिडिआसिसचे अनेक प्रकार आहेत. जसे की योनिमार्ग, तोंडी, तोंड, मान आणि कॅन्डिडा, ग्रॅन्युलोमा आक्रमक कँडिडिआसिस, म्हणजे जेव्हा कॅन्डिडा बुरशी रक्ताद्वारे शरीरात पोहोचते. कॅन्डिडिआसिस तोंड, घसा आणि मान, आतडे, मूत्रपिंड, त्वचा, हृदय तसेच मेंदूपर्यंत पोहोचते. जेव्हा कँडिडिआसिस होतो, तेव्हा त्वचेवर पुरळ उठू शकतात. त्याच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये त्वचेवर पुरळ उठणे, खाज सुटणे, जळजळ होणे, योनीतून स्त्राव होणे, तोंडात फोड येणे किंवा पांढरे चट्टे येणे, चव कमी होणे, वेदना होणे, सूज येणे इत्यादी अनेक लक्षणे दिसू शकतात.

## कोविड १९ एक्सईसीचा कहर

आरोग्य वार्ता

सध्या कोरोना महामारी हा पुन्हा एकदा जगासाठी चिंतेचा विषय बनला आहे. युरोपमध्ये उदयास आलेल्या कोरोनाच्या नव्या प्रकाराने पुन्हा एकदा जगभरात चिंता वाढवली आहे. कोरोनाचा हा नवा स्ट्रेन, कोविड-१६, युरोपमध्ये सातत्याने कहर करत आहे. हा नवीन स्ट्रेन पूर्वीच्या प्रकारांपेक्षा खूपच जास्त संसर्गजन्य आहे. उपचाराशिवाय, कोविड-१९ बरा होत नाही. काही प्रकरणे गंभीर असू शकतात आणि म्हणून त्यांना वैद्यकीय सेवेची आवश्यकता असते. छातीत दुखणे किंवा ताप, सततचा खोकला, डोकेदुखी, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा धाप लागणे, थकवा, स्नायू किंवा अंगदुखी, घसा खवखवणे, चव किंवा वास कमी होणे, नाक बंद होणे किंवा वाहणे, मळमळ किंवा उलट्या होणे, अतिसार ही कोरोनाची नवीन लक्षणे आहेत. सौम्य कोविड-१९ लक्षणे असलेले बहुतेक रुग्ण घरी झोपणे, भरपूर पाणी पिणे आणि वेदना किंवा तापासाठी ओव्हर-द-काउंटर औषधांनी बरे होऊ शकतात. लक्षणांचे निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे आणि ते वाढत गेले तर वैद्यकीय मदत घ्यावी. कोविड-१९ चा नवीन स्ट्रेन साधारणपणे सौम्य प्रकरणांमध्ये सुमारे एक ते दोन आठवडे टिकतो. गंभीर प्रकरणांमध्ये व्यक्तीच्या आरोग्यावर अवलंबून तीन ते सहा आठवडे लागू शकतात.



## आजारांनी वाढवली चिंता

आरोग्य चर्चा



मधुमेह आणि हृदयविकार लवकरच महामारीचे रूप धारण करणार असल्याचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे.

जगभरातील दोन तृतीयांश मृत्यू या आजारांमुळे होत आहेत. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने जवळपास सर्वच देशांना संतुलित आहार आणि शारीरिक हालचालींना प्रोत्साहन देण्यासाठी लवकरात लवकर धोरण तयार करण्यास सांगितले आहे. अधिक वजन, लठ्ठपणा आणि चयापचय म्हणजेच मेटाबॉलिजम विकारांनी ग्रस्त रुग्णांची संख्या सतत वाढत आहे. ही समस्या मुले आणि प्रौढ दोघांनाही प्रभावित करते. या आजारांमुळे आता दोन तृतीयांश मृत्यू होत आहेत. परिणामी अनेक देशांनी आधीच फूड लेबलिंग नियम लागू केले आहेत, ट्रान्स फॅट्सवर बंदी घातली आहे आणि गोड पेयांवर कर वाढवण्यासाठी पावले उचलली आहेत; पण काही देशांमध्ये निरोगी समाजासाठी अजूनही अनेक पावले उचलण्याची गरज आहे. आता वेळ आली आहे की, आपण आपला आहार आणि शारीरिक क्रियाकलाप पुन्हा परिभाषित करू शकू.

## उपाय पित्तदोषावरचे

आयुर्वेद आणि विकार

शरीरातल्या पित्तामुळे चयापचय क्रिया सुरळीत सुरू राहते, असं आयुर्वेद सांगतं. पित्त म्हणजे शरीरातली उष्णता. पित्त दोष निर्माण झाल्यावर शरीरातली उष्णता खूप जास्त प्रमाणात वाढते. ही सगळी प्रक्रिया अचानक घडल्यामुळे शरीराचं सगळं चक्र बिघडून जातं. चयापचय क्रियेवर परिणाम झाल्याने अपचनासारख्या समस्या निर्माण होतात. शरीरातल्या रसायनांचं संतुलन बिघडतं. छातीत जळजळ, मुरूमं, अंगावर पुरळ उठणं, जुलाब अशी लक्षणं दिसू लागतात.

पित्तदोष दूर करण्यासाठी आयुर्वेदाने आहारविषयक बदल सुचवले आहेत. शरीराच्या तापमानवाढीला कारणीभूत ठरणारं तेलकट, मसालेदार अन्न वर्ज्य करायला सांगण्यात आलं आहे. काकडी, उकडलेल्या हिरव्या भाज्यांमुळे शरीराचं तापमान कमी होतं. ताक आणि टरबूजही थंडावा देतं. तुळशीच्या बिया(सब्जा) थोडा वेळ पाण्यात भिजवून गुलाबपाणी घातलेल्या दुधात घालून प्यायल्यानेही उष्णतेचे त्रास कमी होतात. आयुर्वेदाने भरपूर पाणी पिण्याचा सल्लाही दिला आहे.




प्राणायाम, सूर्यनमस्कार, त्रिकोणासनामुळेही शरीरातली उष्णता कमी व्हायला मदत होते. रक्ताभिसरण सुधारून शरीरात थंडावा निर्माण करण्यासाठी आयुर्वेदिक तेलाने मसाज करायला हवा. शरीराची उष्णता कमी करण्यासाठी खोबरेल तेलाचा वापर करावा.

## वीकेंडला झोपताय?

आपण कुठे चुकतो?

आठवडाभर सकाळी लवकर उठून कामाला जायच्या लगबगीत असलेली बहुतेक व्यक्ती शनिवार-रविवारी छान आराम करते. त्यातही सकाळी उशीरा उठणं हा मुख्य कार्यक्रम असते. उद्या मी उशीरा उठणार, असं ठरवूनच सुटीच्या आदल्या रात्री लोक झोपी जातात. सकाळी ताणून देण्याच्या आनंदाचं वर्णन खरं तर शब्दात करता येणार नाही. मात्र असं करणं आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं. सुटीच्या दिवशी सकाळी जास्त वेळ झोपल्याने विविध रोगांना आमंत्रण मिळतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. आपल्याला अतिरिक्त झोपेचा लाभ न होता नुकसानच होतं.

शरीराला पुरेशी झोप मिळणं गरजेचं आहे हे अगदी खरं. अपुऱ्या झोपेमुळे अस्वस्थता हृदयविकार, उच्च रक्तदाब, स्ट्रोकसारख्या व्याधी जडण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. मात्र सुटीच्या दिवशी जास्त झोपणं आरोग्याला मारक ठरतं. यामुळे स्थूलपणा, हृदयविकाराचा धोका वाढतो, असं हे संशोधन सांगतं. कोलोरॅडो बोल्डर विद्यापीठात याबाबतचं संशोधन पार पडलं. यासाठी निरोगी तरुणांचे तीन गट तयार करण्यात आले होते. अभ्यासाचा भाग म्हणून पहिल्या गटाला पहिले नऊ दिवस नऊ तास झोपायचं होतं. दुसऱ्या गटाला फक्त पाच तास झोप घ्यायची होती तर तिसऱ्या गटाला पाच दिवस पाच तास झोपायला सांगण्यात आलं. मात्र सुटीच्या दोन दिवशी सकाळी त्यांना जास्त वेळ झोप घ्यायला सांगितलं गेलं. कमी झोप मिळालेले दोन गट रात्रीच्या जेवणानंतरही जास्तीचं खाऊ लागले. यामुळे त्यांचं वजन वाढायला सुरूवात झाली. नऊ तास झोप घेणाऱ्या गटाने वीकेंडला जास्तीचं फारसं काही खाल्लं नाही. मात्र कमी झोप मिळाल्यावर त्यांचंही चरण्याचं प्रमाण वाढलं. त्यामुळे वीकेंडला सकाळी झोप पूर्ण करण्याचा विचार बाजूला ठेवणं गरजेचं आहे.



## असा आहे क्लेप्टॉमेनिया

व्याधी विचार

विविध प्रकारचे मानसिक आजार आहेत. त्यापैकी एक म्हणजे क्लेप्टॉमेनिया. हा विकार जडलेल्या माणसाला चोरी करण्याची तीव्र इच्छा होते. चोरी करण्याच्या तीव्र इच्छेमुळे रुग्ण अस्वस्थ होतो किंवा त्याला ताण येतो. चोरी केल्यानंतरच त्याच्या मनाला शांतता लाभते. मात्र नंतर त्यांना आपल्या या कृत्याचा पश्चातापही होतो. आपण करत असलेली कृती चुकीची असल्याचं माहीत असूनही क्लेप्टॉमेनियाचा रुग्ण ते करतो. सर्वसाधारणपणे लोक मौल्यवान वस्तूंची चोरी करतात. मात्र या विकाराचे रुग्ण कोणतीही वस्तू चोरतात. क्लेप्टॉमेनिया हा अत्यंत दुर्मीळ असा विकार आहे. चोरी करणाऱ्या प्रत्येकाला क्लेप्टॉमेनिया असतोच असं नाही. दुकानांमध्ये चोरी करणाऱ्यांपैकी फक्त पाच टक्के लोक या विकाराने ग्रस्त असतात. क्लेप्टॉमेनियाची नेमकी कारणं माहीत नसली तरी मेंदूत स्रवणाऱ्या सेरोटॉनिन नावाच्या रसायनाशी याचा संबंध असल्याचं म्हटलं जातं. अचानक झालेल्या नुकसानाच्या धक्क्यामुळे माणसाला क्लेप्टॉमेनिया होऊ शकतो. अगदी पाच वर्षांच्या मुलापासून कोणालाही हा विकार होऊ शकतो. तो महिलांनाही होण्याची शक्यता बरीच जास्त असते.



एखादी वस्तू नकळत उचलणं, मौल्यवान नसलेल्या, फारशा उपयुक्त नसलेल्या वस्तू चोरणं, चोरी करण्याआधी खूप ताण येणं, वस्तू चोरताना आनंद वाटणं, समाधानाची भावना उत्पन्न होणं ही क्लेप्टॉमेनियाची सर्वसाधारण लक्षणं आहेत. या लोकांना आहाराशी संबंधित विकारही उद्‌भवतात. या विकाराच्या निदानासाठी मनोविकार तज्ज्ञांकडे जायला हवं. हे तज्ज्ञ रुग्णाची नीट तपासणी करून आजाराचं निदान करतात. रुग्णाला लक्षणांबद्दल तसंच मद्यपानासारख्या इतर घातक सवयींबद्दल विचारलं जातं. काही वैद्यकीय समस्यांची शक्यता पडताळून पाहण्यासाठी रक्त किंवा इतर चाचण्याही केल्या जातात. याआधी नमूद केलेली लक्षणं दिसली तर क्लेप्टॉमेनियाचं निदान केलं जातं.

या विकाराच्या उपचारांमध्ये विविध प्रकारच्या थेरपींचा वापर केला जातो. मात्र नेमकी कोणती उपचारपद्धती सर्वोत्तम आहे हे अजूनही स्पष्ट झालेलं नाही. कॉग्निटिव्ह बिहेवियर थेरपीचा वापर यात केला जातो. स्वतःबद्दलचं मत बदलण्यात रुग्णाला मदत केली जाते. या माध्यमातून रुग्णाच्या चुकीच्या समजुती दूर करण्याचा प्रयत्न होतो. त्याची विचार करण्याची पद्धत जाणून घेण्यासाठी ही थेरपी उपयुक्त ठरते. वागणुकीच्या सकारात्मक पद्धती रुग्णापर्यंत पोहोचवण्याच्या कामी या थेरपीची खूप मदत होते. रुग्णाला कौटुंबिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न केले जातात. कुटुंबातल्या एखाद्या सदस्याच्या या सवयीमुळे सगळ्यांनाच त्रास होतो. मात्र सर्वांनी याचा एकत्रित सामना केला तर रुग्ण नक्की बरा होऊ शकतो.




# विदर्भातील दोन लाडक्या लेकी देणार बाप आणि काकांना टक्कर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक जाहीर होताच अनेक वेगवान घडामोडी घडत आहे. आयाराम गायराम सुरु झाले आहे. महिन्याभरापूर्वी दुसऱ्या पक्षात असलेले नेते नवीन घरोबा करत आहे. ऐनकेन प्रकार आमदार व्हावे, यासाठी नाती विसरत आहेत.

आता महाराष्ट्रातील दोन मतदार संघ चर्चेचे ठरणार आहे. या दोन्ही मतदार संघात मुली आपल्या काका आणि वडिलांना आव्हान देणार आहे. यामुळे निवडणुकीचे लक्ष आता या दोन्ही मतदार संघावर लागणार आहे.

गडचिरोली जिल्ह्याच्या अहेरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात ते आहेत. आता त्यांच्या विरोधात त्यांची मुलगी भाग्यश्री आत्राम शरद पवार गटाकडून मैदानात उतरणार आहे. यामुळे यंदा या मतदार संघात बाप - लेकीची लढाई रंगणार आहे.

विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी शरद पवार गटाची शिवस्वराज्य यात्रा अहेरीत आली होती. तेव्हा त्यांनी शरद पवार गटात प्रवेश केला होता. अजित पवार यांनी भाग्यश्री आत्राम यांना समजवण्याचा प्रयत्न केला. बापासोबतच राहा, अशी भावनिक साद घातली. परंतु भाग्यश्री आत्राम माघार घेण्याच्या तयारी नाही. त्या आता निवडणूक आखाड्यात बापाविरुद्ध उतरणार आहे.



दुसरीकडे, बुलढाणा जिल्ह्यातही असाच सामना रंगण्याचे संकेत आहेत. माजी मंत्री आणि बुलढाण्यातील सिंदखेडराजा मतदारसंघाचे विद्यमान आमदार राजेंद्र शिंगणे यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला रामराम केला. त्यानंतर ते शरद पवार यांच्या पक्षात आले. त्यांनी तुतारी हाती घेण्याचा निर्णय घेतला. शरद पवार यांच्या पक्षात राजेंद्र शिंगणे येताच त्यांची पुतणी गायत्री शिंगणे नाराज झाली झाली.

त्या अजित पवार गटात जाणार असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच त्याही सिंदखेडराजा मतदार संघातून मैदानात उतरण्याच्या तयारीत आहे. यामुळे या ठिकाणी काका अन् पुतणी अशी लढत रंगणार आहे. अर्थात पितापुत्री आणि काका पुतणी यांच्यातील या लढतीकडे राज्याचे लक्ष असणार आहे.

# भाजपमध्ये बंडाचा झेंडा !

## डमी उमेदवार दिल्याचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. २२ :**

भाजपच्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत अचलपूर मतदारसंघातून प्रवीण तायडे यांचे नाव झळकल्यानंतर भाजपमधील अंतर्गत उद्रेक बाहेर आला असून सात इच्छूक उमेदवारांनी एकत्र येत बंडाचा इशारा दिला आहे.

पक्षाने निवडून येण्याची क्षमता नसलेला डमी उमेदवार दिल्याचा आरोप या इच्छूक उमेदवारांनी केला. उमेदवार न बदलल्यास तीन जण उमेदवारी अर्ज भरतील आणि त्यापैकी एका उमेदवाराच्या नावावर मतैक्य घडवून आणून निवडणूक लढवू, असा इशारा भाजपच्या नाराज पदाधिकाऱ्यांनी दिला.

प्रवीण तायडे यांनी गेल्या एक वर्षापासून अचलपूर मतदारसंघामध्ये गटबाजीचे राजकारण करून पक्ष कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. भाजपच्या इतर इच्छूक उमेदवारांनी पक्षश्रेष्ठींना याबाबत अवगत केले. प्रवीण तायडे वगळून इतर कुणालाही उमेदवारी दिल्यास सर्व एकदिलाने काम करून भाजपचा उमेदवार निवडून आणू, असे पक्षश्रेष्ठींना सांगितले. तरीही पक्षाने कटकारस्थान करणाऱ्यास संधी दिल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे. प्रवीण तायडे हे निवडून येण्याची शक्यता नसल्याने आम्ही पक्षश्रेष्ठींकडे उमेदवार बदलण्याची मागणी केली आहे, ती मान्य न झाल्यास आम्ही बंडखोरी करू, असा इशारा या पदाधिकाऱ्यांनी दिला.

प्रवीण तायडे यांच्या उमेदवारीविषयी मतदारसंघात नाराजीचे वातावरण आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांना आम्ही यासंदर्भात कळवले आहे. आमच्यापैकी कुणीही भाजपच्या विरोधात किंवा भाजपच्या वरिष्ठ नेत्याच्या विरोधात वक्तव्य करणार नाही, असे या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

प्रवीण तायडे यांची उमेदवारी पक्षाने कायम ठेवल?ास प्रमोदसिंह गड्रेल, मनोहर सुने, सुधीर रसे हे तीन जण अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरतील. यापैकी एका जणाची सवार्नुमते उमेदवार म्हणून निवड केली जाईल आणि ते नाव काही दिवसांत जाहीर करण्यात येईल, असे या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

पक्षांतर्गत निवड समितीने जेव्हा मतदान घेतले, तेव्हा मतदार यादीत बाहेरील व्यक्तींची नावे आम्हाला दिसली. आम्ही पक्ष निरीक्षकांकडे यासंदर्भात निवेदन दिले, पण त्यांनी त्याची दखल घेतली नाही. प्रभारी म्हणून प्रवीण तायडे यांनी मतदार यादी ठरवली आणि आपल्या बाबतीत अनुकूल बाबी घडवून आणल्या, असा आरोपही यावेळी करण्यात आला. पत्रकार परिषदेला इच्छूक उमेदवार प्रमोदसिंह गड्रेल, सुधीर रसे, मनोहर सुने, गोपाल तिरमारे, अक्षरा लहाने, डॉ. राजेश उभाड, नंदकिशोर वासनकर यांच्यासह अभय माथने, प्रसन्ना काठोळे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# केळापूर - आर्णी विधानसभेसाठी उबाठा आग्रही

## किशोर तिवारी यांनी मातोश्री गाठली

■ **महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. २२ :**

केळापूर - आर्णी या मतदार संघात दिग्रस, यवतमाळ, वर्धा, उमरखेड येथील पार्सल मागील ३० वर्षांपासून राजकीय पक्ष लादत असून बापाचं संपल तर मुलगा... या परीवारवादाला जनता कंटाळली आहे. परिणामी, स्थानिक भूमिपुत्राला येथून उमेदवारी द्यावी अशी मागणी करीत उबाठा शिवसेनेचे किशोर तिवारी यांनी मुंबईत ठाण मांडले आहे.

दरवेळी बाहेरचे उमेदवार लादण्यात येत असल्याने मतदार कमालीचे नाराज असून, हाकेवर काम करणारा गरीब कार्यकर्ता अंकित नैताम यालाच आमदार करण्याचा संकल्प स्थानीय मतदारांनी केल्यामुळे व तास दबाव जनतेनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते किशोर तिवारी यांच्यावर वाढविला. परिणामी, त्यांनी मुंबई गाठली असून उद्धव ठाकरेंना केळापूर मतदार संघातील मतदारांचा निरोप सांगितला असून महाविकास आघाडीने अंकित नैताम यांना संधी द्यावी यासाठी काँग्रेस व राष्ट्रवादीशी सुद्धा चर्चा करणार असल्याचे तिवारी यांनी सांगितले.

केळापूर आर्णी विधानसभा मतदार संघावर शिवसेना ( उबाठा) या पक्षाचा उमेदवार जाहीर होणार आहे. या जागेवर अंकित नैताम यांची उमेदवारी जाहीर झाल्यास राजकीय समिकरणे बिघडू शकतात. केळापूर -आर्णी विधानसभा मतदार संघांची जागा शिवसेना या पक्षाला महाविकास आघाडीने सोडावी व पांढरकवडा येथील स्थानिक व्यक्तीला उमेदवारी द्यावी, यासाठी शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे उबाठाचे राष्ट्रीय प्रवक्ते किशोर तिवारी मुंबईला मातोश्री येथे ठाण मांडून बसले आहे.

जमिनीशी नाळ जुडलेल्या प्रामाणिक कार्यकर्त्याला यावेळी संधी देण्याचा तसेच मतदार संघामध्ये जितेंद्र मोघे यांना मतदारांनी नापसंती दाखवीत आहे परीवारवादाला सोडुन आमदार निवडण्याच्या आग्रहाचा आदर करावा अशी विनंती किशोर तिवारी यांनी नाना पटोले यांच्याकडे केली आहे.

# वंचित बहुजन आघाडी रत्नागिरीत उमेदवार देणार ?

■ **वृत्तसंस्था, रत्नागिरी, दि. २२ :**

रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण विभागातील विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रस्थापितांच्या विरोधात तळ ठोकून बसणार असल्याचे सांगण्यात येत आहे. असे झाल्यास या मतदार संघातील मतदानाची गणिते बदलण्याची आणि विद्यमान आमदारांना ही निवडणूक आणखीच जड जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्यात वंचित बहुजन आघाडीने विविध अठरा पगड जाती-धर्माच्या उमेदवारांना वेळोवेळी संधी दिलेली आहे. यातच वंचित कडून आता रत्नागिरी दक्षिण भागात विधानसभेच्या तिन्ही जागांवर उमेदवार उतरवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागात देखील परिवर्तनवादी मतदार मोठ्या संख्येने आहे. राजापूर लांजातून शिवसेना ठाकरे गटाचे राजन साळवी, चिपळूणमधून अजित पवार गटाचे शेखर निकम, तर रत्नागिरीतून शिंदे गटाचे उदय सामंत असे तीन आमदार आहेत. या तिन्ही आमदारांविरोधात त्यांच्याच मतदारसंघात नाराजीचा सुर मोठा असून, त्यांच्याविरोधात वंचित उमेदवार देणार आहे.

# छंद पोष्टाच्या तिकिटांचा

**लोकमानस**



व्यक्ती तितक्या प्रकृती, या न्यायाने प्रत्येकाचे छंद देखील आगळे वेगळे असू शकतात. दुर्मिळ झालेली पोष्टाची तिकीट जमविण्याचा आणि याच पोष्टाच्या तिकिटांचा संग्रह करण्याची अनेकांना आवड असे. अशीच आवड पोष्टाच्या तिकीटाचे संग्राहक अभिजित मुळे यांना अगदी तिसऱ्या इयत्तेत असल्यापासून लागली. आपल्या एका नातेवाईकाकडे ते गेलेले असताना,त्यांच्या मित्राने त्यांना त्याच्याकडील असलेला पोष्टाच्या तिकीटांचा संग्रह दाखवला. वास्तविक त्यांच्या मित्रामुळे अकस्मात त्यांना अशा प्रकारचा पोष्टाचा संग्रह बघायला मिळाला,आणि असाच तिकीट जमविण्याचा छंद आपणही सुरु करायचा असं त्यांच्या बालमनाने संकल्प केला.

अभिजित यांच्या त्या मित्राने त्यांना इंग्लडच्या राणीचे एक पोष्टाचे तिकीट भेट म्हणून दिले आणि याच तिकिटापासून मग त्यांचा पोष्टाचा संग्रह सुरु झाला. अभिजित शाळेमध्ये,आपल्या आप्तस्वकीयांकडे किंवा अगदी अनोळखी लोकांकडे आणि पोस्टात देखील जाऊन अशा प्रकारची पोष्टाची वेगवेगळी तिकीट जमवू लागले. अभिजित यांचे जे जे नातेवाईक किंवा मित्रमंडळीपैकी जे लोक परदेशी जात असत त्यांच्याकडून ते तिकडच्या देशांच्या पोष्टाची तिकीट आवर्जून मागत असत. पाहता पाहता त्यांच्याकडे सुमारे शंभर पेक्षा अधिक पोष्टाची तिकीट जमा झाली, आणि त्यामध्ये मग नवनवीन देशांच्या पोष्टाच्या तिकिटांची भर पडत गेली.

आजच्या घडीला अभिजित यांच्या संग्रहात साठ देशांची दुर्मिळ अशी एकापेक्षा एक सुंदर अशी पोष्टाची तिकीट जमा झालेली आहेत. इतरांसाठी केवळ कागदाचे तुकडे असलेला हा तिकिटांचा साठा म्हणजे अभिजित यांच्यासाठी मात्र, तिजोरीतल्या मौल्यवान दागदागिण्याइतकाच महत्वाचा खजाना होता. त्यांच्या एका मित्राने त्यांचा हा अनोखा छंद पाहून त्याच्याकडे असलेली सर्व पोष्टाची तिकीट अभिजित याना भेट म्हणून देऊन टाकली, तो क्षण त्यांच्यासाठी आनंदाचे डोही आनंद तरंग असाच होता.

ते ज्या कार्यालयात काम करायचे तिथे देशोदेशी व्यवहार करताना जी पोष्टाची तिकीट वापरली जायची त्यातून देखील अभिजित याना नवनवीन तिकीट जमवता आली. आता त्यांच्याकडे जगभरातील सुमारे दीडशे देशांची सुमारे एक हजाराच्या वर पोष्टाची तिकीट आहेत. त्यांच्या कडील या पोष्टाच्या संग्रहाचे अभिजित जी विविध शाळांमध्ये आणि सोसायट्यांमध्ये प्रदर्शन भरवतात आणि या पोष्टाच्या तिकिटांची गमतीशीर माहिती देखील लोकांना देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालत असतात. पोष्टाच्या तिकिटांचा हा अनोखा संग्राहक आणि त्यांचा छंद हा इतरांना देखील आदर्शव्रत असाच आहे. ■ ■ ■



# टोयोटा किर्लोस्करची टोयोटा Rumion मर्यादित फेस्टिव्हल आवृत्ती सादर




कार खरेदीदारांसाठी हा सणाचा हंगाम खास बनवून, टोयोटा किर्लोस्कर मोटर ने टोयाटा Rumion चे फेस्टिव्ह एडिशन सादर केले. Rumionचे सौंदर्य आणि आराम वाढवण्याच्या उद्देशाने खास टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरी पॅकिजेस असलेले हे मर्यादित-संस्करण हा हंगाम भव्यतेने आणि शैलीत साजरा करण्यासाठी योग्य गतिशीलता पर्याय आहे.

Rumionची ही उत्सवी आवृत्ती, सर्व श्रेणींमध्ये उपलब्ध आहे, २०,६०८ किमतीचे डीलर-फिट केलेले TGA पॅकिज आहे, जे ग्राहकांना प्रीमियम अनुभवाचा आनंद घेतील याची खात्री देते. मागील दरवाजा गार्निश, मागील बंपर गार्निश, डिलक्स कार्पेट मॅट, हेड लॅम्प गार्निश,नंबर प्लेट गार्निश, डोअर व्हिझर क्रोम, बॉडी साइड मोल्डिंग गार्निश फिनिश ही या कारची खास वैशिट्य आहेत.

सणासुदीच्या आवृत्त्यांच्या परिचयावर टिप्पणी करताना, साबरी मनोहर, उपाध्यक्ष, सेल्स-सर्व्हिस-युज्ड कार बिझनेस, टोयोटा किर्लोस्कर मोटर, म्हणाले,

आम्ही मर्यादित-संस्करण टोयोटा रुमिओन सादर करताना रोमांचित आहोत, जे केवळ सौंदर्यशास्त्रच वाढवत नाही आणि आरामदायी पण उत्तम ड्रायव्हिंग अनुभवाची खात्री देते. दिवाळीपर्यंतचा सणाचा उत्साह स्वीकारत असताना, आमच्या ग्राहकांना अपवादात्मक मूल्य देण्याची आमची बांधिलकी अटूट आहे.

ही विशेष आवृत्ती प्रीमियम ॲक्सेसरीज, उत्कृष्ट विक्री-पश्चात सेवेसह विस्तारित वॉरंटी यांसारख्या वैशिष्ट्यांद्वारे नवीनता प्रदान करून ग्राहकांच्या समाधानासाठी आमचे समर्पण दर्शवते, हे सर्व भारतीय खरेदीदारांच्या अद्वितीय गरजा पूर्ण करण्यासाठी काळजीपूर्वक डिझाइन केलेले आहे.



# भाज्यांचे वाढते दर कमी केंव्हा होणार?

**माझं मत**

**मीना कर्णिक (गृहिणी)**

मागील काही महिन्यांपासून सातत्याने कांदा आणि लसणाचे भाव हे अगदी टोकाचे वाढलेले आहेत.आता काही महिन्यापासून रोजच्या जेवणासाठी लागणाऱ्या पालेभाज्या,आणि फळभाज्यांचे दर देखील अव्वाच्या सव्वा वाढलेले आहेत.भाजांच्या या वाढत्या दरावर सरकारचे नियंत्रण आहे की नाही? असा प्रश्न पडतो.यामुळे सामान्यांचा जीव मात्र मेटा कुतीस आलेला आहे.

**रवींद्र माने (पोस्टमन)**

भाज्यांच्या वाढत्या दरामुळे गोरगरिबांना जगणे नकोस झालेले आहे.पूर्वी अवकाळी पावसामुळे किंवा दुष्काळ सदृश परिस्थिती मुळे काही काळ हे दर वाढते असायचे मात्र लगेच पुन्हा स्थिर देखील व्हायचे. सरकारने आता पैशाची उधळपट्टी फालतू योजनांवर करण्यापेक्षा महागाई कमी करावी तरच सर्व सामान्यांना दिलासा मिळेल.

**शैला चव्हाण (शिक्षिका)**

मागील काही महिन्यांपासून भाज्यांचे आणि कांदा व लसणाचे वाढते दर लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जो कृषीमाल येतो आणि त्याचे भाव ठरतात त्यावर सरकारचे अजिबात नियंत्रण दिसत नाही.

सरकारने भाज्यांचे हे दर कमी करून ही वाढती महागाई नियंत्रित केली तर फार बरे होईल.

**विजय जाधव (कर्मचारी)**

भाज्यांचे वाढते दर ही गंभीर समस्या बनलेली आहे. सरकारने एकीकडे लाडकी बहीण योजना सुरू करून बहिणींना 1500 रुपयांचा मासिक हफ्ता सुरू केला. मात्र, दुसरीकडे भाज्यांचे, तेलाचे, गॅस ची दरवाढ करून गरिबांना मोठा झटका दिलेला आहे.यातून शेतकऱ्याचे देखील काही भले न होता अडते आणि दलाल यांचाच फायदा होतोय. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# माजी मंत्री बडोले यांनी बांधले घड्याळ

## दादांचा भाजपला धक्का

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने मंगळवारी आपला मित्र पक्ष भाजपला धक्का दिला. भाजप नेते तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून आपल्या हातावर घड्याळ बांधले. आता त्यांना अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील तत्कालीन भाजप सरकारच्या काळात राजकुमार बडोले यांच्यावर सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी होती. बडोले हे अर्जुनी मोरगाव मतदारसंघात इच्छुक आहेत. पण महायुतीच्या जागावाटपात ही जागा राष्ट्रवादीला सुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे बडोले यांनी राष्ट्रवादीत जाणे पसंत केल्याची चर्चा आहे. उपमुख्यंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.




राजकुमार बडोले यांच्या पक्षप्रवेशानंतर अजित पवारांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले की, माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा कार्यक्रम प्रदेश कार्यालयात पार पडला. त्यांच्यासारखा एक अनुभवी आणि जनसामान्यांसाठी आवाज उठवणारा नेता पक्षात सामील झाल्याने पक्षाची ताकद नक्कीच वाढल्याचे ते म्हणाले.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीच्या मनोहर चंद्रिकापुरे यांनी राजकुमार बडोले यांचा अवघ्या ७१५ मतांनी पराभव केला होता. आता राजकुमार बडोले हे राष्ट्रवादीत आल्याने आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांची चिंता वाढली आहे.

# राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**

अजित पवार यांचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. अजित पवार यांच्यासह प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांची नावे यादीत आहेत. मात्र, राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांचे नाव या यादीत नाही. नवाब मलिक यांच्यावर ईडीचा खटला सुरू आहे. त्यांच्या नावावर भाजपचा देखील आक्षेप आहे.

ट्विटरवर स्टार प्रचारकांची यादी जाहीर करताना अजित पवार यांनी लिहिले की, महाराष्ट्रात फक्त गुलाबी वादळ वाहणार, राष्ट्रवादीचे घड्याळ जोमाने फिरणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासाचा राष्ट्रवादी विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारकांमध्ये अजित पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवाळ, अदिती तटकरे, नितीन पाटील, सयाजीराव शिंदे, अमोल मिटकरी, जल्लाउद्दीन सय्यद, धीरज शर्मा, रुपाली इंद्रिया, सुप्रसिद्ध नाईक, सुप्रसिद्ध पाटील, कृष्णा चव्हाण आदी नेत्यांची यात नावे आहेत. तर कल्याण आखाडे, सुनील मगरे, महेश शिंदे, राजलक्ष्मी भोसले, सुरेखा ठाकरे, उदयकुमार आहेर, शशिकांत तरंगे, वसीम बनहान, प्रशांत कदम, संध्या सोनवणे यांच्या नावांचाही यात समावेश आहे.

या स्टार प्रचारकांच्या यादीत नवाब मलिक यांचे नाव नाही. या मुद्द्यावर शरद पवार गटाच्या नेत्यांनी अजित पवार यांना घेरले आहे.

# ॲफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर लि.कंपनीची आयपीओ ऑफर २५ ऑक्टोबरपासून

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

शापूरजी पल्लनजी उद्योग समुहात अभियांत्रिकी व बांधकाम क्षेत्रातील धुरावाहक कंपनी असलेली ॲफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड ही कंपनी २५ ऑक्टोबरपासून आयपीओच्या माध्यमातून खुली प्रारंभिक शेअर विक्री करणार आहे. त्यासाठी कंपनीने प्रत्येकी रु. १०/- फेस व्हॅल्यू असलेल्या शेअरसाठी रु. ४४०/- ते रु. ४६३/- दरम्यान प्राईस बँड निश्चित केला आहे.

गेल्याच आठवड्यातच ॲफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर कंपनीने व्यवस्थापन, वैयक्तीक व संस्थात्मक गुंतवणूकदार यांच्या साहाय्याने प्री-आयपीओ प्लेसमेंट माध्यमातून रु. २९६७/- कोटी रुपये उभे केले आहेत. प्री-आयपीओ गुंतवणुकदारांमध्ये जीआयसी सिंगापूर, एनाम होल्डिंग्स (आकाश भन्साळी), सिनर्जी कॅपिटल, ३६० वन, एम अँड जी इनव्हेस्टमेंट्स, थिंक इनव्हेस्टमेंट्स, डिस्क० हरी कॅपिटल मॅनेजमेंट, आर्सेलरमित्तल यांची आर्टिअन इनव्हेस्टमेंट, मधुसुधन केला, व्हाईट ओक व अन्य गुंतवणूकदारांचा समावेश आहे.

कंपनीची इनिशिअल पब्लिक ऑफरींग (आयपीओ वा ऑफर) २५ ऑक्टोबर रोजी गुंतवणुकीसाठी खुली होईल व मंगळवार २९ ऑक्टोबर रोजी बंद होईल. इच्छुक गुंतवणूकदार किमान ३२ शेअरसाठी व त्यापुढे ३२ च्या पटीत शेअरसाठी बिड करु शकतील. कंपनीच्या अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांना कर्मचारी राखीव हिश्यातून प्रत्येक समभागावर रु. ४४/- सवलतीच्या दराने समभाग दिले जातील.

आयपीओ मधून उभे होणाऱ्या भांडवलापैकी ८० कोटी रुपये बांधकाम उपकरणे खरेदीसाठी वापरण्यात येणार आहेत. तसेच ३२० कोटी रुपये दीर्घकालीन खेळत्या भांडवलासाठी वापरण्यात येणार आहेत तर ६०० कोटी रुपये कंपनीच्या काही कर्जाचा भाग फेडण्यासाठी व सामान्य कॉपोरेट हेतुंसाठी वापरण्यात येणार आहेत.

ॲफकॉन्स इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनी भारतातील तब्बल साठ वर्षांचा गौरवशाली इतिहास असलेला उद्योग समूह आहे. कंपनीने देशविदेशातील अत्यंत क्लीस्ट व आव्हानात्मक इंजिनिअरींग, प्रॉक्युरमेंट, व कंस्ट्रक्शन (इपीसी) प्रकल्प लिलया पूर्ण केले आहेत. फीच अहवालानुसार ॲफकॉनला भारतातील अग्रणी आंतरराष्ट्रीय इंफ्रास्ट्रक्चर कंपनीचा मान देण्यात आला आहे.

२०२३ सालच्या इएनआर मानांकनानुसार कंपनीचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील पायाभूत सुविधा क्षेत्रात ठसठशित कार्य आहे. सागर बंदरे, पूल, वाहतूक व पारेषण लाईन क्षेत्रात तर ॲफकॉन कंपनीचा जगातील अग्रणी कंत्राटदारांमध्ये समावेश आहे. फीच अहवालानुसार, २०२३ च्या आंतरराष्ट्रीय महसूलावरुनच हा बहुमान देण्यात आला आहे.

आकडेवारीनुसार ॲफकॉन कंपनी कडे सध्या १७ देशातील एकूण ७९ प्रकल्प सुरु आहेत. ॲफकॉन इंफ्रा कंपनीच्या हाती तब्बल रु. ३१,७४७.४३ कोटी मूल्याच्या ऑर्डर आहेत.

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४ ■

## दिवाळीत अनिल देशमुखांचा डायरी बॉम्ब!



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सांगितले की माझ्या विरुध्द षडयंत्र रचून मला खोट्या आरोपामध्ये १४ महिने तुरुंगात ठेवण्यात आले. न्यायालयीन लढाई लढून मी तुरुंगाच्या बाहेर आलो. मी तुरुंगात असतांना माज्या विरुध्द कसे षडयंत्र रचण्यात आले यावर पुस्तक लिहीले. हे पुस्तक मराठी, हिंदी व इंग्रजीमध्ये छापण्यात आले आहे. लवकरच मी लिहिलेल्या डायरी ऑफ होम मिनिस्टर या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

माझ्याविरोधात कोणी व कसे षडयंत्र रचले, आघाडीचे सरकार पाडण्यासाठी कसा प्रयत्न झाला, मला व माझ्या परिवाराला कसा त्रास देण्यात आला, हे जाणुन घेण्याची उत्सुकता महाराष्ट्रातील जनतेला आहे. मी तुरुंगात असतांना हे पुस्तक लिहण्यास सुरुवात केली. मला अडकविण्यासाठी कोणी व कसे षडयंत्र रचले, याची संपुर्ण माहिती या पुस्तकात देण्यात आली असल्याचेही अनिल देशमुख यांनी सांगितले. आपण स्वतः लिहिलेल्या डायरी ऑफ होम मिनिस्टर या पुस्तकाच्या माध्यमातून अनेक बाबी उघड करणार असून, यापुस्तकाचे प्रकाशन लवकरच करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दलित महिलेवर अन्यायाचा वचपा, काँग्रेसची जबरदस्त खेळी

# रश्मी बर्वे यांना उमरेडमधून उमेदवारी?

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** सत्ताधारी पक्षांच्या कटकारस्थानामुळे रामटेक मतदारसंघातून निवडणूक लढण्यापासून वंचित राहिलेल्या काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांना उमरेड राखीव मतदारसंघातून उमेदवारी देण्याचा निर्णय काँग्रेस श्रेष्ठींनी घेतला आहे.

दलित महिलेवरील अन्यायाचे प्रतीक म्हणून बर्वेंची उमेदवारी निश्चित करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने रश्मी बर्वे यांना रामटेकमधून उमेदवारी दिली होती. त्यांनी अर्जही दाखल केला होता. मात्र, ऐनवेळी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द ठरवले. याच आधारावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा नामांकन अर्ज रद्द केला होता. त्यामुळे काँग्रेसने ऐनवेळी त्यांचे पती श्यामकुमार बर्वे यांना उमेदवारी दिली होती व ते विजयी झाले.

दरम्यान, बर्वे यांनी समितीच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने समितीचा निर्णय असंवैधानिक ठरवत तो रद्द केला व बर्वे यांना जात प्रमाणपत्र बहाल करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे राज्य शासनाची नाचक्की झाली. ती पुसून टाकण्याचा प्रयत्न म्हणून राज्य शासनाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च



न्यायालयात आव्हान दिले. पण तेथेही बर्वे यांच्याच बाजूने निर्णय लागला. विशेष म्हणजे, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने समितीला चांगलेच फटकारले होते.

सत्ताधाऱ्यांच्या दबावापुढे नमून प्रशासनाने एका दलित महिलेला जाणीवपूर्वक निवडणूक लढवण्यापासून वंचित ठेवले, असा आरोप काँग्रेसने केला होता. विधानसभा निवडणुकीत दलित महिलेवर केलेल्या महिलेचा मुद्दा लावून धरण्यासाठी व या माध्यमातून भाजपची कोंडी करण्यासाठी काँग्रेसने रश्मी बर्वे यांना उमरेडमधून उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे.

उमरेड हा राखीव मतदारसंघ आहे.२०१९ मध्ये काँग्रेस येथून विजयी झाली होती. नंतर राजू पारवे यांना भाजपने रामटेक लोकसभा निवडणुकीत उमेदवारी देतो म्हणून काँग्रेस सोडायला लावली. ऐनवेळी त्यांना शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली. त्यात त्यांचा पराभव झाला होता.

## युको बँकेने जाहीर केला दुसऱ्या तिमाहीचा व्यवसाय निकाल

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** भारत सरकारची प्रमुख बँक असलेल्या यूको बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या दुसऱ्या तिमाहीचे व्यवसाय निकाल जाहीर केले.



एकूण उलाढाल वार्षिक आधारावर १३.५६ टक्क्यांनी वाढून ४,७३,७०४ कोटी रुपये झाली आहे. वार्षिक आधारावर, एकूण ठेवी १०.५७ टक्क्यांनी वाढून रु. २,७५,७७७ कोटींवर पोहोचल्या आहेत, तर एकूण अॅडव्हान्स १८.00 टक्क्यांनी वाढून रु. १,९७,९२७ कोटींवर पोहोचले आहेत.

किरकोळ पत, कृषी पत आणि एमएसएमई अॅडव्हान्स पोर्टफोलिओ वार्षिक २०.१६ टक्क्यांनी वाढून १,०८,२०० कोटी रुपयांवर पोहोचला, ज्यामध्ये किरकोळ कर्जाचा वाटा २९.३६ टक्के, कृषी पत १७.४१ टक्के होता.

एमएसएमई अॅडव्हान्समध्ये ११.३२ टक्के वार्षिक वाढ नोंदवली गेली. गेल्या तिमाहीचा ऑपरेटिंग नफा १,४३२ कोटी रुपये होता, जो वार्षिक आधारावर ४५.८२ टक्के वाढ दर्शवितो. बँकेचा निव्वळ नफा ६०३ कोटी रुपये आहे आणि वार्षिक ५०.०० टक्के वाढ नोंदवली आहे.


## आमरो उमेदवार नही तर मंग मतदान बी करबको नही...

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** विधानसभा निवडणुकीत अद्यापही युती आणि आघाडीतील घटक पक्षांमधील जागा वाटपाचा तिढा सुटला नाही. मध्य नागपुरात मात्र काँग्रेस आणि भाजपमध्ये थेट लढतीचे संकेत आहे. परंतु येथे दोन्ही पक्षांकडून उमेदवार घोषित करण्यात आला नाही.

दोन्ही पक्षातील स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये मात्र येथील गैर हलबा उमेदवार देण्याबाबत चर्चा आहे. हे उमेदवार कधीही जाहिर होण्याची शक्यता असतांनाच आता हलबा समाजाच्या इशारा फलकाने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. हलबा समाजाला जो पक्ष उमेदवारी देणार नाही, त्याच्याविरोधात संपूर्ण विदर्भात मतदान करण्याचा इशारा यातून देण्यात आला आहे. त्यामुळे राजकीय पक्षांना धडकी भरली आहे.

नागपूर जिल्ह्यातील काही मतदारसंघांत हलबा समाजाची लक्षणीय लोकसंख्या आहे. विशेषतः मध्य नागपुरात तर हलबा समाजाच्या वस्त्या मोठ्या प्रमाणात आहेत. याशिवाय भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली येथेदेखील हलबा मतदार आहेत. मध्य नागपुरातून २००९ सालापासून हलबा समाजाचे विकास कुंभारे यांच्यावरच भाजपने विश्वास टाकला. यावेळी त्यांच्या उमेदवारीबाबत शंका व्यक्त होत आहे.

### हलबा कोष्टी समाज आक्रमक



काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांनी हलबा उमेदवारच द्यावा, असा समाजाचा आग्रह आहे. उमेदवार कोणताही द्या, मात्र तो समाजाचाच असावा, अशी भूमिका जोर धरते आहे. मध्य नागपुरातील काही ठिकाणी हलबा क्रांती सेनेतर्फे फलक लावण्यात आले आहेत. हलबा समाजाचा हा दबाव दोन्ही पक्षांसाठी डोकेदुखी ठरतो आहे.

## शालिमार एक्स्प्रेस रुळावरून घसरली

**प्रवासी जखमी**

**वेग कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली**



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** मुंबईहून नागपूरमार्गे पश्चिम बंगलाकडे निघालेल्या शालिमार एक्स्प्रेस मंगळवारी कळमना रेल्वे स्थानकाजवळ घसरली. गाडीची गती कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली. परंतु अनेक प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

एलटीटी- शालिमार एक्सप्रेस सोमवारी मुंबईहून निघाली. ही गाडी मंगळवारी दुपारी पावणे दोनच्या सुमारास इतवारी स्थानकाहून गोंदियाकडे निघाली. कळमना स्थानकजवळ असताना एका शयनयान (एस२) डब्याची चार चाके घरसली. तसेच एका पार्सल व्हॅनचे देखील चार चाक रुळावरून घसरले. गाडी रुळावरून घसरताच या डब्यातील प्रवासी एकमेकांवर आदळले. तसेच वरील बर्थवरील (आसन) वस्तू खाली पडल्या. त्यामुळे अनेक प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली.

घटनेची माहिती रेल्वे नियंत्रण कक्षाला मिळताच रेल्वेच्या मदत व बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. प्रवाशांना डब्यातून काढण्यात आले. तसेच घसरलेले दोन्ही डबे गाडीपासून वेगळे करण्यात आले.

रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार एलटीटी-शालिमार एक्स्प्रेस दुपारी १ वाजून ५४ मिनिटांनी कळमना रेल्वे स्थानकाच्या जवळ (कळमना यार्ड) घसरली. ही गाडी इतवारी स्थानकावरून चार क्रमांकाच्या रुळावरून पुढे निघाली होती.

त्यावेळी इंजीनपासून तिसऱ्या क्रमांकावरील पार्सल व्हॅनचे चार चाके अचानक घसरले. तसेच इंजीनपासून १२ क्रमांकावर असलेला शयनयान (एस२) डब्याचे चार चाके घसरली. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही.

घटनास्थळी दक्षिण -पूर्व-मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक नमिता त्रिपाठी, अतिरिक्त विभागीय व्यवस्थापक पी. चंद्रिकापूरे, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह पोहोचले. या घटनेची माहिती देण्यासाठी नागपूर, इतवारी, गोंदिया, डोंगरगड, दुर्ग आणि राजनांदगाव स्थानकावर हेल्पलाईन सुरू करण्यात आली. आणि घटनेचा तपासाचे आदेश देण्यात आले.

## २७ माळ्याच्या निर्मल ट्रिनीटी प्रकल्पाची उभारणी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** दिवाळी आगमनानिमित्त आपल्या स्वप्नातील घराचे स्वप्न साकरण्यासाठी सुविधायुक्त आणि सुंदर घर तेही कमी दरात देण्याचा संकल्प निर्मल उज्वल क्रेडिट को. ऑप. सोसायटीने सोडला आहे. त्याअन्वये प्रथमच दक्षिण नागपूर परिसरात निर्मल ट्रिनीटी प्रकल्पाच्या माध्यमातून २७ माळ्याचे टॉवर उभारण्यात येणार आहे.

२० ऑक्टोबर रोजी या भव्य प्रकल्पाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर प्रकल्पामध्ये २ बीएचके. २.५ बीएचके, ३ बीएचके व ४ बीएचके (पेंट हाऊस) अशा सदनिका असतील. २७ माळ्याचे एकूण ११ टावरचा समावेश असून फेस १ च्या ४ टॉवरची बुकिंग सुरू केली आहे. ही संस्था मल्टीस्टेट असून, नागपूर व्यतिरिक्त भंडारा, गोंदिया, अमरावती, चंद्रपुरसह अन्य राज्यात शाखा आहेत. कार्यक्रमाला नागपूरसह ग्रामिण परीसरातील अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शविली.

नागपुरकरांच्या स्वप्नाला एक नवीन दिशा मिळावी व संस्थेच्या विकासाला चालना मिळावी या उद्देशाने संस्थेचे संस्थापक प्रमोद मानमोडे यांच्या नेतृत्वात सदर सोहळा पार पडला. या भव्य प्रकल्पाच्या ईमारतीच्या फेस १ ची सुरूवात करण्यात आली आहे. उद्घाटन प्रसंगी बुकिंग रक्कम देवून अनेक सभासदांनी संस्थेवरची



निष्ठा प्रकट केली.

सदर प्रकल्पामध्ये भविष्यातील आधुनिक तंत्र सुविधा तसेच व्यापाराकरिता एक नवीन मार्केटची सुविधा असेल. या सोहळ्याला प्रामुख्याने संस्थेचे अध्यक्ष शिवराज गुजर, उपाध्यक्ष विठ्ठलराव गांवडे, संचालक हंसराज गाडीवान, उमा कोहळे, संजय चव्हाण, रामकृष्ण इंगळे, उपस्थित होते.

## ई-रिक्शा चोर गजाआड

**दोन गुन्हे उघडकीस**

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** पाचपावली पोलिसांनी गोपनिय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून ठाण्यांतर्गत ई-रिक्शा चोरी करणा?या आरोपीला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले. अॅलेक्स सचिन भोयर (18) रा. म्हाडा कॉलनी, कपिलनगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी मनोज भानुदास गजभिये (46) रा. बाळाभाऊपेठ, पाचपावली यांनी गत 9 सप्टेंबर रोजी सकाळी त्यांची ई-रिक्शा घरासमोर पार्क केली होती. दरम्यान कोणीतरी दिवसाढवळ्या त्यांची ई-रिक्शा चोरून नेली. त्यांच्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपी अॅलेक्सचा सुगावा लागला. खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

त्याला अटक करून सखोल चौकशी केली असता जरीपटका हद्दीतून मोटारसायकल चोरी केल्याचेही समोर आले. पोलिसांनी त्याच्याकडून ई-रिक्शा आणि मोटारसायकल असे दोन्ही वाहन जप्त केले. पुढील तपास सुरू आहे.

## प्रेयसीची थंड डोक्याने हत्या

### सैन्यदलातील विवाहीत जवानाचे कृत्य

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** भारतीय सैन्यातील एका विवाहित जवानाने एका तरुणीशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले. तिने लग्नाचा तगादा लावल्यामुळे तिचा गळा आवळून खून करीत मृतदेह जंगलात पुरला. ही घटना बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करुन आरोपी जवानाला अटक केली आहे.

अजय वानखेडे (३३, न्यू कैलासनगर) असे आरोपीचे नाव आहे. तर ज्योत्स्ना आकरे (३२) असे मृत तरुणीचे नाव आहे. ज्योत्स्ना ही टेलिकॉलर म्हणून नोकरीला होती. तिचा घटस्फोट झाला होता व दुसऱ्या लग्नासाठी तिने विवाह संकेतस्थळावर नोंदणी केली होती. यातूनच तिची आरोपी अजयसोबत ओळख झाली होती.

अजयने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले व लग्न करण्याचे वचन दिले. मात्र प्रत्यक्षात त्याने १९ मे मध्ये दुसऱ्याच मुलीशी लग्न केले. ही बाब त्याने ज्योत्स्नापासून लपवून ठेवली होती. २८ ऑगस्ट रोजी ज्योत्स्ना बेसा येथे तिच्या मैत्रिणीकडे थांबण्यासाठी गेली होती. मात्र त्यानंतर ती घरी न आल्याने तिच्या कुटुंबियांनी फोन लावून मैत्रिणीला विचारणा केली. ज्योत्स्ना रात्री फोनवर बोलण्यासाठी जवळील बगिच्यात गेली व तेथून परत आलीच नाही असे तिच्या मैत्रिणीने सांगितले. तिच्या नातेवाईकांनी १७ सप्टेंबरपर्यंत तिचा सगळीकडे शोध घेतला. मात्र ती न सापडल्यामुळे त्यांनी बेलतरोडी पोलीस ठाण्यात तक्रार केली.

याचा तपास करत असताना पोलिसांना तिच्या मोबाईलमुळे सुगावा लागला. तिचा मोबाईल आरोपीने हैदराबादला गहू घेऊन जाणाऱ्या ट्रकमध्ये टाकला होता. तो ट्रक काही दिवसांनी नागपुरात परत आला व ट्रकचालकाला त्यात मोबाईल दिसला. त्याने त्यातील सीम काढून वेगळे सीम टाकले. तेव्हा पोलिसांना मोबाईल फोन ट्रेस झाला. त्यांनी ट्रकचालकाची चौकशी केली असता त्यांना मोबाईलबाबत माहिती मिळाली.

**थंड डोक्याने केली हत्या**

आरोपी अजयने ज्योत्स्नाला भेटण्यासाठी बोलविले व तिला कारमधून वारंगा येथील निर्जन स्थळी घेऊन गेला. तेथे त्याने तिची हत्या केली. त्यानंतर तिचे पूर्ण कपडे काढून जवळील निर्जन स्थळी तिचा मृतदेह मेणकापड व प्लास्टिकमध्ये गुंडाळून पुरला. तेथे त्याने निवांतपणे सिमेंटने फ्लोअरिंगदेखील केले. तिचे कपडे त्याने वेगवेगळ्या ठिकाणी फेकले.

तरुणीचा मोबाईल फोन सापडल्यावर सीडीआर काढला असता त्यात पोलिसांना ती गायब होण्याच्या वेळी अजयसोबत बोलत असल्याची बाब लक्षात आली. त्याला विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. तो तेथून पुण्याला गेला. त्याने अटकपूर्व जामिनासाठीदेखील अर्ज केला होता. मात्र तो फेटाळल्या गेला. त्यानंतर चौकशीदरम्यान त्याने पोलिसांची दिशाभूल केली. मात्र अखेर त्याने तिचा मृतदेह पुरलेली जागा दाखविली.

पोलिसांनी त्याची सखोल चौकशी केली. त्याची गाडी धुतल्याची बाब समोर आली. गाडी आतूनदेखील धुतली होती. त्याने याबाबत समाधानकारक उत्तर न दिल्याने पोलिसांना संशय आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्याची ज्योत्स्नासोबत त्याच्या लग्नानंतर मेडिकलमध्ये भेट झाली होती. तिने त्याच्या आईला संपूर्ण प्रकार सांगितला होता व त्याची पोलिसांत तक्रार करेन असा इशारा दिला होता. यामुळे घाबरून अजयने तिचा जीव घेतला.

## दिवाळीनिमित्त कपड्यांच्या खरेदीसाठी महिलांची तोबा गर्दी, बाजार फुल्ल!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** नागपुरातील महाल व इतवारी हा भाग मध्यमवगीर्यांसाठी दागिने व कपड्यांच्या खरेदीसाठीचा बालेकिल्ला आहे. दिवाळी या सणाला नऊ दिवस उरले असताना एक महिन्यापूवीपासूनच येथील रंगोली, इंद्रायणी, वैशाली, वाडा, सत्यम, आराधना, गुरुगोविंद सिंग येथे कपडे विशेषतः साड्या व घागरा ओढणी खरेदीसाठी महिलांची झुंबड उठत असून परिणामतः वाहतूक कोंडी निर्माण होताना दिसत आहे.

दिवाळी हा हिंदूंचा सर्वात मोठा पाच दिवसीय सण आहे. या सणाला विविध रंगी फराळ, रंगा रंगाची रांगोळी, फटाक्यांची आतिषबाजी या सोबतच महिलांसाठी दागदागिने व कपडे खरेदीची मोठी पर्वणी असते.

त्यासाठी एक महिना अगोदरपासूनच साड्या, घागरा ओढणी, सलवार कुर्ता, वन पीस यासाठी प्रसिद्ध असलेल्या



महाल व इतवारी भागातील रंगोली, इंद्रायणी, वाडा, वैशाली, आराधना, सत्यम, गुरु गोविंद सिंग या कपड्यांच्या दुकानात महिला एवढी गर्दी करीत आहे की दुकान मालक जागेच्या अभावामुळे महिलांना रांगेत लावून एकापाठोपाठ एक खरेदीसाठी सोडत आहे. एवढीच गर्दी सोन्या चांदीच्या दुकानातही पाहायला मिळत आहे.

दिवाळीच्या पर्वावर पैठणी व डिझायनर साड्यांची मोठी मागणी आहे. दुकानदारही महिलांची पसंत लक्षात घेऊन पैठणी मध्ये चंद्रकोट, पेशवाई, गडवाल तर डिझायनर साड्यांमधे मोती वर्क, हॅन्ड वर्क, सिक्वेन्स वर्क अशा व्हेरायटीच्या साड्या उपलब्ध आहेत. घागरा ओढणी या प्रकारात बनारसी, राजस्थानी, बांधणी, लहरिया, मोथडा, वर्क पॅटर्न या प्रकारांना डिमांड आहे. याशिवाय दिवाळी सोबतच नोव्हेंबर, डिसेंबर हा महिना लग्न व साक्षगंधाचा सिझन असल्याने वन पीस, शालू, काठापदराच्या साड्या, सलवार कुर्ता व पुरुषांसाठी कुर्ता पायजामा, शेरवानी, पटियाला, मोदी पॅटर्न याची मागणी जोरकस धरत आहे. याचा परिणाम वाहतुकीवर होत असून इतवारी येथील गांधी चौक व महाल येथील बडकस चौक येथे वाहतूक कोंडी होत असून ट्रॅफिक पोलिसांना वाहतूक नियंत्रणासाठी पाचारण करावे लागत आहे.

# शुद्धलवार मोबाईल दुकानामध्ये शॉर्ट सर्कीटमुळे लागली आग, लाखाचे नुकसान



■ महासागर प्रतिनिधी

**भिवापूर, २२ :** गडचिरोली ते नागपूर मार्गावरील बस स्थानक परिसरात शुद्धलवार मोबाईल रिपेरिंग व विक्री दुकान असून या दुकानात साडेबार ते एक वाजताच्या सुमारास इलेक्ट्रीक शॉर्ट सर्कीटमुळे मोबाइल दुकानाला लागून असलेल्या रूममध्ये किराणा साहित्य, घरगुती भांडे. कपडे, महत्वाच्या वस्तू व नगदी रक्कम वेळीच अग्निशामक वाहन वेळेत न पोहचल्याने जळून खाक झाली आहे. सतिश शुद्धलवार यांच्या मोबाईल दुकानासह चार रूमचे सामान बेचिराख झाले असून यात लाखाचे नुकासान झाल्याची माहिती सतिश शुद्धलवार यांनी दिली आहे. मोबाइल दुकानाला लागून त्याचे खाली दोन रूम व वरच्या मजल्यावर दोन रूम असून लागलेल्या आगीची तीव्रता एवढी होती की संपूर्ण दुकानाचे मोबाईल हॅन्ड सेट, दुरुस्ती करीता आलेले मोबाइल, इतर मोबाइल साहित्य, नगदी रक्कम, घरातील कपडे, धान्य, भांडे व इतर महत्वाचे साहित्य उमरेड, पवनी नगरपरिषदे च्या अग्निशामक वाहन वेळेवर पोहचले नसल्याने सर्व साहित्याची राखरांगोळी झाली आहे. मात्र हाकेच्या अंतरावर असलेली भिवापूर नगरपंचायत च्या अग्निशामक वाहन वेळेवर आले नसल्याचे कळते समजते. घटनास्थळी ठाणेदार जयप्रकाश निर्मल व नागरीकांनी आग विझविण्यास मदत केली.

# गुरांच्या अवैध वाहतुकीचा ट्रक मुद्देमाला सह पकडला

**महासागर तालुका प्रतिनिधी कामठी २०२४ :** नवीन कामठी पोलीस पथकाने रविवारी सकाळी ३.३० वाजताच्या दरम्यान कामठी गुमथळा मार्गावरीलआवंढी भागात केलेल्या कारवाईत गुरांची अवैध वाहतूक करत असलेला ट्रक पकडला . यातील आरोपीला पकडण्यात आले .त्याच्या कडुन एकूण ११ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला .तसेच ट्रक मधील १२ जनावरांची सुटका करण्यात आली . सय्यद फारूक सय्यद रशीद रा . भाजी मंडी कामठी असे अटक करण्यात आरोपीचे नाव असल्याचे कळते .अधिक चौकशी केली असता वरील जनावरे कत्तल खाण्या कडे नेली जात असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने सय्यद फारूक विरूद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली .त्याच्या कडुन नवु लाख रुपयांचा ट्रक आणि दोन



लाख चाळीस हजार किमतीचा मुद्देमाल जप्त केला . ट्रक मधील गुरांना पिंपळगाव ता लाखनी जिल्हा भंडारा येथील गोरक्षण शाळेत पाठविण्यात आल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले .या प्रकरणात नवीन कामठी पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे .ही कारवाई ठाणेदार व पोलीस निरीक्षक प्रमोद पोरे यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक विकास तिडके , आकाश मनवर , अमोल डोंगरे , सीमा सरमते आदींनी केली .

# आनंदाचा शिधा आता फोटोविना

■ महासागर प्रतिनिधी

**वाडी, २२ ऑक्टोबर :**

नाही ,हो, म्हणता म्हणता , आनंदाचा शिधा पोहचला सरकारी स्वस्त धान्याच्या दुकानात , तो ही बिना फोटोचा. राज्यातील पावणेदोन कोटी शिधापत्रिकाधारकांना गौरी-गणपतीच्या सणात रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा शासन निर्णय झाला होता. परंतु तो शिधाचे आता वाटप सुरू झाले आहे. त्यात साखर, रवा, हरभरा डाळ व तेल (प्रत्येकी एक किलो) अशा चार वस्तू आहेत. पण, विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे या वस्तू एकत्रितपणे ज्या पिशवीतून दिल्या जातात, त्यावर सत्ताधाऱ्यांची छायाचित्रे असल्याने ती पिशवी देणे बंद आहे. मात्र घरुन आणलेल्या पिशवीत या चार वस्तु देत आहे.

राज्य सरकारने दुर्बल घटक, सामान्य नागरिकांना शिधावाटप दुकानाच्या माध्यमातून सण, उत्सवाच्या काळात लागणारे अत्यावश्यक साहित्य किरकोळ दराने वाटप करण्याचे धोरण अवलंबिले होते. सरकारने सण-उत्सवाच्या काळात सामान्य कुटुंबातील शिधापत्रिकाधारकांना रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचे निर्णय घेतले. गौरी- गणपतीच्या उत्सवातही तसाच निर्णय झाला होता. मात्र, तो वेळेत उपलब्ध झाला नव्हता आणि आता निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने बिना पिशवीने वाटप सुरू आहे.

दीड वर्षाच्या कालावधीत राज्य सरकारने रुपये दर आकारून एक किलो साखर, अर्धा किलो रवा, मैदा, एक किलो तेल, चणाडाळ या वस्तूंचा संच तयार करून तो शिधावाटप दुकानातून लाभार्थींना सणाच्या काळात वाटप केला जात होता. साखर, रवा, हरभरा डाळ आणि तेलाच्या पिशवीवर कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेत्यांची छायाचित्रे नाहीत, त्यामुळे त्याच्या वाटपाला काहीही अडचण नाही. मात्र, ज्या पिशवीतून या सर्व वस्तू एकत्रितपणे दिल्या जातात, त्यावर पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची छायाचित्रे आहेत. त्यामुळे आचारसंहितेच्या काळात या पिशव्या न देता केवळ वस्तूंचे वाटप करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या वस्तू खरेदीच्या वेळी शिधा पत्रिकाधारकांना घरून पिशव्या आणण्याच्या सूचना करण्यात येत आहेत.

# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात बॉटनिकल क्लबचे उदघाटन




■ महासागर प्रतिनिधी

**वाडी, २२ ऑक्टोबर :** येथील जवाहरलाल नेहरू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाद्वारे स्थापित बॉटनिकल क्लबचे उदघाटन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांचे अध्यक्षतेखाली व रा.तू.म. नागपूर विद्यापीठ फार्मसी विभागाचे प्रा.डॉ. सत्येंद्र प्रसाद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या प्रसंगी डॉ. सत्येंद्र प्रसाद यांनी 'अपयशाचा लाभ यशस्वी भविष्याच्या वाटचालीसाठी करणे' या विषयाचे महत्व पॉवर पॉईंटद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आकांक्षा रामटेके, संचालन कंचन शुक्ला तर आभार अपेक्षा मैंद हिने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. नरेंद्र घारड, प्रा.डॉ. गजानन झाडे, प्रा.डॉ. नितीन कोंगरे, प्रा.डॉ. मनीषा भातकुलकर, प्रा. डॉ. काशिनाथ मानमोडे, प्रा.डॉ. अविनाश इंगोले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मयुरी देशमुख, प्रा. वैभव मेंघरे, प्रा. तृप्ती चौधरी, प्रा.डॉ. रेश्मा हिवसे, रितेश डहारे व विभागातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १०६ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

**नागपूर, ता. २२:** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५१ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (२२) रोजी शोध पथकाने १०६ प्रकरणांची नोंद करून ७६,९००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३५ प्रकरणांची नोंद करून १४,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत ६ प्रकरणांची नोंद करून ६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ६ प्रकरणांची नोंद करून २,४००/-



रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २,००० रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १७ प्रकरणांची नोंद करून ३८,५००/-रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १००० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २७ प्रकरणांची नोंद करून ५,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १२ प्रकरणांची नोंद करून १२,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. श्रीराम अपार्टमेंट यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. शावत इन्फ्रा यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. ५,०००/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. श्रीनिवासन होम मेकर यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच श्री. राजेश अग्रवाल, यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. २०,०००/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. तसेच मे. कॅफे कॉफी डे यांनी रेस्टॉरंटचा कचरा जवळच्या फूटपाथ परिसरात टाकला जात असल्याने मनपा नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. हनुमान नगर झोन अंतर्गत मे. सतगुरू कनस्ट्रक्शनस यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. वर्मा स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ,/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. महादेव किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ,/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. मंगळवारी झोन अंतर्गत मे. हिमकश पार्क यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. साई श्रध्दा डेव्हलपर्स अँड प्रमोटर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. उपद्रव शोध पथकाने १० प्रकरणांची नोंद करून रू. ९०,०००/- दंड वसूल केला.

# राहुल खोब्रागडेवर तिसऱ्यांदा एमपीडीए

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** गत ८ वर्षांपासून गुन्हेगारीत सक्रीय गुंड राहुल अनिल खोब्रागडे (२६) रा. आंबेडकर चौक, जरीपटका विरुद्ध पोलिसांनी तिसऱ्यांदा एमपीडीए लावला आहे. राहुलविरुद्ध खुनाचा प्रयत्न, लुटपाट, खंडणी वसूलणे, दंगा आणि मारहाणीसह अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. २०१८ आणि २०२० सालीही पोलिसांनी त्याच्यावर एमपीडीए लावला होता. गतवर्षी त्याच्यावर सीआरपीसीच्या कलम ११० अन्वये प्रतिबंधक कारवाईही करण्यात आली. त्यानंतरही तो गुन्हेगारीत सक्रीय होता. गत काही दिवसांमध्ये त्याच्यावर मारहाण आणि आर्म्स ॲक्टचे गुन्हे नोंद झाले आहेत. परिसरातील नागरिकांमध्ये त्याची दहशत निर्माण झाली होती. आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी जरीपटका पोलिसांनी गुन्हे शाखेमार्फत त्याच्यावर एमपीडीए लावण्याचा प्रस्ताव पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्याकडे पाठवला. पोलिस आयुक्तांनी त्याच्यावर एमपीडीए लावून एक वर्षासाठी येरवडा तुरुंगात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.

# आर्य क्षत्रिय तेलगु शिंपी समाज, वरोरा तर्फे आयोजित नवरात्र महोत्सव व स्नेहमिलन सोहळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, २२ ऑक्टोबर :** आर्य क्षत्रिय तेलगु शिंपी समाज, वरोरा तर्फे आयोजित श्री. नवरात्र महोत्सव व स्नेहमिलन सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन दि. २० ऑक्टोंबर २०२४ ला करण्यात आले होते. भारताचे जगप्रसिध्द उद्योगपती आणि दानसूर व्यक्तीमत्वाचे धनी प्रेमळ स्वर्गीय रतन जी टाटा त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दोन मिनटे मौन धारण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. संदीप भूषणवार, मुख्य अतिथी मा. यशवंतराव भूषणवार, मा. डॉ. सिमलाताई गाजर्लवार, मा. वंदनाताई समुद्रवार, मा. रितेशजी लक्केवार, मा. सुरेशराव बरतलवार हे होते. या कार्यक्रमाकरिता नागपूर, चंद्रपूर, बल्लारशा, हिंगणघाट, राळेगाव, मुल, भद्रावती, पारडपार येथून मोठ्या प्रमाणात समाज बंधू-भगीनिंनी सहभागी होवून कार्यक्रमाचा आनंद घेतला. वरोरा समाज भवन बांधकाम करिता कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. संदीप भाऊ भूषणवार यांनी ५१ हजार रु., मुख्य अतिथी मा. वंदनाताई समुद्रवार यांनी २१ हजार रु रोख व समाज भवन करिता १० सिलिंग फॅन तसेच समाज बंधू-भगीनिंनिआपले बहुमूल्य योगदान देऊन समाज भवन बांधकाम कार्यास शुभेच्छा दिल्या. या स्नेहमिलन कार्यक्रमात वरोरा समाज कडून बाहेर गावून आलेल्या समाज बंधु-भगिनींचे पुष्प देवून स्वागत तसेच गुणवंत प्राप्त ४३ विद्यार्थांचे सन्मान चिन्ह व पुष्प देवून सत्कार करण्यात आले. तसेच साई महिला बचत गट नागपूर, शारदा महिला बचत गट व गौरी महिला बचत गट बल्लारशा, निमिषंम्बा महिला बचत गट चंद्रपूर यांचे वरोरा समाज कडून स्वागत सत्कार करण्यात आले. या स्नेहमिलन कार्यक्रमाचे सुत्र संचालन सौ. रश्मी डोंगरवार व प्रास्ताविक राहुल डोंगरवार यांनी केले असून

आभार प्रदर्शन राजेंद्र नामपल्लीवार यांनी केले.नागपुर वरुन सामाजिक कार्यकर्ते हेमंत गाजरलवार, कमल नारायण नामपल्लीवार, विवेक नामपल्लीवार, सचिन ईल चलवार, बाबूलाल जी , विनोद जी , राजेश जी , बमरोतवार जी , पवन जी ,गजेंद्र सिंग ठाकूर सामाजिक कार्यकर्ते आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# शताब्दी नगर चौकात जनतेचा संविधान सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, २२ ऑक्टोबर :** दक्षिण पश्चिम विधानसभेच्या आक्रमण युवक संघटना व पीपल्स पार्टी ऑफ इंडियाचे (डेमोक्रॅटिक) चे अधिकृत उमेदवार ओपुल तामगाडगे यांच्या तर्फे रविवारी शताब्दी नगरचौक येथे संविधान सभेचे आयोजन करण्यात आले होते. या संविधान सभेत कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्यमार्गदर्शक म्हणुन ड सुनील गजभिये आक्रमण संघटन प्रमुख व (सुप्रीम कोर्ट) उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल मडामे यांनी केले तर कार्यक्रमाचे आयोजक आक्रमण चे जिल्हाध्यक्ष ओपुल तामगाडगे हे प्रामुख्याने उपस्थित होते. या सभेच्या मुख्य विषय होता संविधान बचाव बचाव करणाऱ्या लोकांचा परदाफास करणे, या विषयाला अनुसरून कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शन करताना एडवोकेट सुनील गजभिये आपल्या



भाषणात म्हणाले. या देशात भारतीय संविधान हे इतकं मजबूत आहे की ते कोणीही बदलू शकत नाही.आणि जे लोक या भारत देशामध्ये संविधानाच्या माध्यमातून संविधान धोक्यात आहे संविधान वाचवायला पाहिजे असे सांगून फिरत असतील, किंवा जे लोक शिवबंधन घालतात आणि संविधानाची भाषा करतात, जे लोक संविधानाचे पुस्तक हातात घेऊन संपूर्ण भारत देशात भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून आमच्या लोकांना भावनिक करतात हेच ते लोक, हेच संविधानाचे खरे विरोधी व शत्रु आहेत आणि जेव्हा जेव्हां संविधानिक अधिकार व आरक्षण धोक्यात येतो त्यावेळेस हे लोक चूप बसून तमाशा पाहण्याव्यतिरिक्त काही करत नाही. म्हणून अशा बहिरुपी लोकांना एससी, समाजाने ओळखणे फार गरजेचे आहे. समता, स्वातंत्र, बंधुत्व, याचे मूल्य जोपासण्याचे काम खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने केलेले आहे त्यामुळे कुणीही लहान किंवा मोठा नाही सर्व कायद्यापुढे समान आहे. अन्न, वस्त्र, निवारा, हे जे मूलभूत अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळालेले आहे ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही किंवा त्याला गुलामी मध्ये टाकू शकत नाही त्यामुळे कोणालाही घाबराची गरज नाही कारण तुमच्यासोबत भारतीय संविधान आहे. परंतु संविधानाचे संरक्षण व त्याला संवर्धन आणि त्याला समाजापर्यंत नेण्याचे काम तुम्हा आम्हाला आपल्या खांद्यावर घेउन भारतीय संविधानाच्या मान सन्मान ठेवण्याकरिता आपल्या सर्वांना सज्ज व्हावे लागेल तेव्हाच भारतीय संविधानाचे मौलिक अधिकार देशांमध्ये खात्री पूर्ण राबविल्या जाऊ शकते असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्ष भाषणात केले. कार्यक्रमाचे संचालन आक्रमण युवक संघटनेचे जिल्हा संघटक धनराज हाडके यांनी केले. संगीतमय प्रस्तुती संदीप चव्हाण व अविनाश साखरकर यांच्या माध्यमातून प्रबोधनात्मक गाणे म्हण्यात आले. यासभेमध्ये जिल्हा संघटक विशाल बनसोड, दीक्षा चौरे, शहराध्यक्ष मुस्तुरी वारसी, अजय गायकवाड, सुरज पुराणिक आतिश सम्भरकर, अमित लोहोकरे, नागेंद्र पाटील प्रफुल खोब्रागडे, टेंभुर्णी, आदर्श शेंडे, अश्विन पाटील, हेमंत तामगाडगे मसारकर, हर्षानंद तामगाडगे, झब्बु तामगाडगे रवि पाटील, आयुष सूर्यवंशीध सुंदर भलावी, आशिष ताकसांडे, संजय मेश्राम तसेच पीपीआयचे प्रवीण अडकिने, अविष्कार कांबळे. अनिल चिमणकर , मोडघरे गौरव सोनवणे अनिकेत कन्नाके निशान वांद्रे चेतन झलके रोहन ओके निलेश सरोदे शशांक वाघमारे, इत्यादी असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये संविधान सभा संपन्न झाले.

कार्यक्रमाचे आभार सशांक वाघमारे यांनी मानले.

**जाहिर नोटीस**

कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांचे न्यायालय

सक्सेशन केस नं. ०३/२०२४
पे.ता. : १८/११/२०२४
Process No. 1654

अर्जदार : संगीता श्याम पाटील रा. प्लॉट नं ६, ७ दुर्गा सोसायटी, न्यु येरखेडा ता. कामठी जि. नागपूर

---- विरुध्द ----

गैरअर्जदार : कोणीही नाही

सदरहु अर्जदाराने सक्सेशन सर्टीफिकेट ॲक्टचे ३७२ अन्वये, श्री सागर श्याम पाटील मयत दि. २२/०६/२०२४ रा. न्यु येरखेडा कामठी ता. कामठी जि. नागपूर यांचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांनी दिनांक १८/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारसान नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला श्री सागर श्याम पाटील मयत दि. २२/०६/२०२४ रा. न्यु येरखेडा कामठी ता. कामठी जि. नागपूर यांचे वारसान सर्टिफिकेट मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

**जाहीरनामा**

को.वि.श्रीमती. सारीका धात्रक, तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. ३/ एम आर सी-८१/२०२४
मौजा किरणापुर ता. रामटेक
जिल्हा नागपुर

ज्याअर्थी श्रीमती कांचन चंद्रकांत मोटघरे रा. डहाळी, ता. मौदा, जि. नागपूर यांनी स्वतः नामे श्रीमती कांचन महादेव मेश्राम यांचा जन्म दिनांक ०१.०७.१९७७ रोजी मौजा किरणापुर, ता. रामटेक येथे राहत्या घरी झाला असुन जन्मची नोंद गट ग्रामपंचायत, किरणापुर येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत, किरणापुर यांनी दिनांक ०९.०७.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे श्रीमती कांचन महादेव मेश्राम यांचा जन्म दिनांक ०१.०७.१९७७ बाबत गट ग्रामपंचायत, किरणापुर येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद श्रीमती कांचन महादेव मेश्राम याचा जन्म दिनांक ०१.०७.१९७७ बाबत गट ग्रामपंचायत किरणापुर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २८/१०/२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक : २८/१०/२०२४

(सारीका धात्रक)
नायब तहसिलदार, रामटेक

# कै.गोविंद गणेश उपाख्य काकासाहेब चोळकर पुण्यतिथी संपन्न



■ **महासागर प्रतिनिधी हिंगणा, २२ ऑक्टोबर :** विदर्भातील अनाथ, निराधार, निराश्रित मुलांच्या शिक्षण व संगोपनाचे कार्य विगत १०२ वर्षापासून करीत असलेल्या 'अनाथ विद्यार्थी गृह मंडळ', लकडगंज, नागपूर या संस्थेचे आद्य संस्थापक कै.पू.गोविंद गणेश उपाख्य काकासाहेब चोळकर यांची वी पुण्यतिथी व तद्वतच संस्थेचे जुने आश्रयदाते तथा भूतपूर्व अध्यक्ष कै.मा.ना. उपाख्य बाबासाहेब घटाटे यांची ३५ वी पुण्यतिथी नुकतीच पार पडली. विनायकराव देशमुख हायस्कूल, लकडगंज, नागपूरच्या सभागृहात सुधीर पाठक, माजी संपादक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष जयंत जोशी, सचिव अंबरीश घटाटे,संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधीर पाठक आणि संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी संस्थेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत काकासाहेब चोळकर आणि बाबासाहेब घटाटे यांची जीवनी कथन केली.संस्थेचे अध्यक्ष जयंत जोशी यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेऊन अनाथ विद्यार्थी गृहाच्या उभारणीसाठी सर्वांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.महाराष्ट्र शासनाचा शिक्षण क्षेत्रातील विशेष पुरस्कारप्राप्त डॉ.प्रदीप बिबटे आणि संस्थेचा माजी विद्यार्थी गुलाब सतई यांचा कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका मधुरा जोशी यांनी केले.डॉ.पूनम चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर डॉ.प्रदीप बिबटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तिन्ही शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद मारोडकर,डॉ.प्रदीप बिबटे,अंजली कुळकर्णी,संस्थेचे माजी विद्यार्थी, हितचिंतक, संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होती.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगारांना १९ % घोषित पगारवाढ म्हणजे निवडणुकीचा जुमला

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, २२ ऑक्टोबर :** महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाच्या आंदोलनाची दखल घेत उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी दि.९ सप्टेंबर रोजी वीज ऊद्योगातील कंत्राटी कामगारांना १९% वेतन वाढ एप्रिल २०२४ पासून लागू करण्या बाबत घोषणा केली.

ऊर्जामंत्री यांनी प्रशासना समोर मूळ वेतनात १९ % घोषित केलेल्या पगारवाढ या शब्दाचा शब्दछळ तिन्ही वीज कंपनीच्या चाणाक्ष प्रशासकीय अधिकारी वर्गाने करून १९% पगारवाढीला निवडणूकीचा जुमला ठरवला आहे कि काय ? अशी शंका भारतीय मजदूर संघाच्या महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाला आहे. निवडणूकी नंतर शासनाकडून किमान वेतन वाढेल व त्यानंतर जाहीर केलेली १९% वाढ रक्कम गायब होणार असल्याचे निर्मिती वितरण व पारेषण यांच्या परीपत्रकात दिसत आहे. मग



याला पगारवाढ म्हणता येईल का? असा सवाल महामंत्री सचिन मेंगाळे यांनी प्रशासनाला विचारला.

शब्दछळ न करता संघटने सोबत मीटिंग घ्यावी तसेच वित्त विभागाने तातडीने कंत्राटदारांना पैसे दिल्यास तिन्ही कंपनीतील कामगारांना दिवाळी आनंदात साजरी करता येईल अन्यथा कामगार नाराज होतील व याचे विपरीत परिणाम आगामी काळात राजकीय पटलावर नक्कीच दिसतील असे संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात म्हणाले. प्रशासनाने केलेल्या या कृत्याचा जाहीर निषेध महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने पत्राद्वारे नोंदवला असून, संघटनेचे पदाधिकारी ,प्रदेश सरचिटणीस सचिन मेंगाळे ,अध्यक्ष महावितरण समीर हांडे ,केंद्रीय सचिव अभिजित माहूलकर त्यावेळी उपस्थित होते.कामगार हितार्थ पुन्हा आंदोलनाची तयारी असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

# दक्षिण नागपूरकडे ढुंकूनही पाहू नका...

## आमदार ॲड. अभिजीत वंजारींचा शिवसेनेला सल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
शहरातील दक्षिण नागपूर हा काँग्रेसचा परंपरागत मतदारसंघ राहिला असून, यावेळीही काँग्रेसच येथून लढणार आहे. त्यामुळे, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने या मतदारसंघाकडे ढुंकूनही पाहू नये, असा स्पष्ट इशारा काँग्रेसचे विधान परिषद सदस्य ॲड. अभिजीत वंजारी यांनी दिला.

महाविकास आघाडीमध्ये जागावाटन अद्याप निश्चित झाले नसून, राज्यातील काही मतदारसंघासोबत विदर्भातील काही ठराविक मतदारसंघाबाबत पेच आहे. रामटेक, दक्षिण नागपूर आणि भंडाराकरिता शिवसेना (उबाठा) अधिक आग्रही असल्याचे सांगण्यात येते. निर्मल उज्वल बँकेचे प्रमोद मानमोडे यांना या मतदारसंघातून शिवसेना रिंगणात उतरविण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे.

दुसरीकडे, काँग्रेस नेत्यांनी उबाठाच्या या मागणीचा विरोध चालविला असून, कोणत्याही परिस्थितीत हा मतदारसंघ उबाठाला देणार नसल्याचे नेत्यांनी सांगितले. यासंदर्भात माध्यमांशी बोलताना आमदार ॲड. अभिजीत



वंजारी म्हणाले, प्रत्येक पक्षाला तिकीट मागण्याचा अधिकार आहे. परंतु, त्या त्या मतदारसंघातील स्थिती लक्षात घेणेही तितकेच महत्वाचे आहे. परिस्थिती लक्षात घेवून मित्रपक्षांनी जागांचे वाटप केले तर निश्चितच विदर्भात महाविकास आघाडीला मोठे यश मिळेल.

ॲड. वंजारी पुढे म्हणाले की, जेंव्हापासून दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात आला तेंव्हापासून काँग्रेस येथे लढत आली असून, बहुतेक वेळा विजय संपादन केला आहे. राजकारणात जर, तर, परंतु, याला महत्व नसते. हा मतदारसंघ काँग्रेसकडे असावा, अशी सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची ईच्छा आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत या मतदारसंघातून काँग्रेसचाच उमेदवार दिला जाईल.

२०१९ च्या निवडणुकीत येथून काँग्रेसने गिरीश पांडव यांना उमेदवारी दिली होती. भाजपाचे मोहन मते यांच्याकडून अवघ्या ४ हजार मतांनी पांडव पराभूत झालेत. यावेळी पांडव नव्या ताकदीने उतरणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# ६३ पेक्षा अधिक उंच इमारतींचा नागपूर विमानतळाला विळखा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खासगी विकासकामार्फत अद्ययावतीकरण व विस्तारीकरणातील अडथळा दूर झाला असला तरी विमानतळाच्या सभोवतालच्या ६३ उंच इमारतींचा अडथळा अद्याप दूर व्हायचा आहे.

मिहान प्रकल्पाचा अविभाज्य भाग असलेल्या कार्गो हबसाठी नागपूर विमानतळावर दोन धावपट्टी असणे आवश्यक आहे. त्यासाठी खासगी विकासकाकडून या विमानतळाचे अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. ह्यजीएमआरह्ला हे काम मिळाल्यानंतर केंद्र सरकार आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण न्यायालयात गेले होते.

त्यासंदभार्तील निकाल जीएमआरच्या बाजूने लागल्याने नागपूर विमानतळाच्या विस्ताराचा मार्ग मोकळा झाला आहे. विमानतळ विस्ताराचा प्रकल्प ७ हजार कोटींचा आहे. या प्रकल्पाचे चार टप्प्यात काम होणार असून यामध्ये दोन धावपट्टीच्या कामाचा समावेश आहे. त्यामुळे सुमारे दीड कोटी प्रवासी, नऊ लाख टन कार्गो हाताळण्याची क्षमता राहणार आहे.

एकीकडे विमानतळ विस्तार प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. तर दुसरीकडे अनियंत्रित विकास अडथळा ठरू पाहतो आहे. विमानतळ परिसरात सुमारे ६८ उंच इमारतीमुळे विमान उतरवताना आणि उड्डाण घेताना त्रास होत असल्याची बाब समोर आली आहे.

त्या सर्वांना नोटीस बजावण्यात आली असून त्यापैकी पाच इमारतींची उंची कमी करण्यात आली आहे. परंतु अद्यापही ६३ इमारती धोका क्षेत्रात आहेत, असा तपशील माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना प्राप्त झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या २० किलोमीटरपर्यंत येणाऱ्या प्रभावित क्षेत्रातील ६३ उंच इमारती आहेत. प्रभावित क्षेत्रातील इमारतींची ५५ मीटर उंचीची मर्यादा आहे. नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्रातील इमारतींच्या उंचीवरील मर्यादा संदर्भातील तांत्रिक अडचणींची समाधानकारक सोडवणूक करण्याकरिता नागरी हवाई वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण हे लक्ष ठेवून आहे.

या क्षेत्रातील इमारतींच्या बांधकामांना भारतीय विमानतळ प्राधिकरणकडून ना-हरकत प्रमाणपत्र घ्यायचे आहे. भारत सरकारच्या नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने जारी केलेल्या नियमावलीनुसार, विमानतळाभोवतालच्या २० किलोमीटर क्षेत्रातील इमारतींना स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणांकडून बांधकाम परवाना प्राप्त करण्यापूर्वी भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून इमारतीच्या उंची संदभार्तील वैध ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य आहे.

येथील हवाई क्षेत्रातील संभाव्य अडथळे टाळण्याकरिता उंचीची सदर मयार्दा भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात आली आहे.

### मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षकावर गुन्हा

# निवडणूक कामात कसूर करणे पडले महाग

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
निवडणूक कामात कसूर केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीत प्राथमिक टप्प्यात ८५ पेक्षा अधिक वय आहे अशा ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांग मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

ही जबाबदारी सोपविण्यात आलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तथा सहाय्यक शिक्षक जयप्रकाश हेडाऊ यांनी अधिकृत कर्तव्याचे पालन न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार दाखल झाली. या तक्रारी अन्वये सावनेर येथील पोलिस स्टेशनमध्ये लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावनेरचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रविंद्र होळी यांनी सावनेर पोलिस ठाण्यात सदर तक्रार दाखल केली. नगर परिषदेची सुभाष प्राथमिक शाळा, सावनेर येथील सहाय्यक शिक्षक जयप्रकाश जगराम हेडाऊ यांची यादी भाग क्रमांक १३५ करीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली होती. या क्षेत्राचे तलाठी तथा पर्यवेक्षक यांनी १२-ड फॉर्म भरून घेण्यास सांगितले असता हेडाऊ यांनी सदर काम करण्यास स्पष्ट नकार दिला. आदेश घेण्यास त्यांनी नकार दिला. अरेरावीचे असभ्य वर्तणूक केली. यामुळे ही तक्रार दाखल करण्यात आली होती.

निवडणूक कामाच्या आदेशाचे पालन करण्याच्या त्यांना वारंवार सूचना देवूनही त्यांनी आपल्या कर्तव्यात टाळाटाळ केली. याबाबत उपविभागीय अधिकारी संपत खलाटे यांनी समज देवून पाहिली. त्यांना वाजवी संधी देवूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे खलाटे यांनी सांगितले.

**अन्यथा कठोर कारवाई...**

निवडणूक विभागातर्फे सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी ही राष्ट्रीय कर्तव्याचा भाग आहे. याच बरोबर कोणताही शासकीय कर्मचारी हा राजकीय प्रचारात सहभागी होता कामा नये. निवडणूक विभागामार्फत आदेश जारी केले आहे. आपली जबाबदारी टाळण्यासाठी कोणीही आदेश रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास नियमानुसार कारवाई अटळ असल्याचा इशारा जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी दिला.

## करंट लागल्याने मीटर चोराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
निमार्णाधिन घराचे मीटर चोरी करताना विजेचा जबर धक्का बसल्याने चोराचा मृत्यू झाला. ही अनोखी घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. वय अंदाजे 25 ते 30 वर्षे आहे.

कळमनाच्या पुंजारामवाडी परिसरात राजेश श्रीराम जैस (55) रा. जुनी शुक्रवारी यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी त्यांनी महावितरणकडून नवीन मीटरही लावून घेतले होते.

शनिवारी मध्यरात्री अज्ञात तरुण त्यांच्या बांधकाम सुरू असलेल्या घरात घुसला. मीटर चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना त्याला विजेचा जबर धक्का लागला आणि जागीच त्याचा मृत्यू झाला. रविवारी सकाळी स्थानिक नागरिकांना तो बेशुद्धावस्थेत दिसला. त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.




■ नागपूर : विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, लवकरच उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात होणार आहे. त्यादृष्टीने नागपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील विविध शासकीय विभागात नामनिर्देशन कक्ष तयार करण्यात आले आहेत. निवडणुकीच्या कामाला संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा जुंपल्याचे दिसून येते.

## गरम भाजीच्या गंजात पडून चिमुकलीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
बारशाच्या कार्यक्रमादरम्यान गरम भाजीच्या गंजात पडल्याने एका 4 वर्षीय चिमुकलीचा गंभीररित्या होरपळल्याने मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. त्रिशा बाळू पानबुडे असे मृत चिमुकलीचे नाव आहे.

वाठोडाच्या श्रावणनगर परिसरात पानबुडे कुटुंब वानखेडे यांच्या घरी भाड्याने राहते. गत 14 ऑक्टोबर रोजी वानखेडे यांच्या घरी बारशाचा कार्यक्रम होता. परिसरातील मुलांसोबत त्रिशाही तेथे खेळत होती. खेळता-खेळता ती अचानक गरम भाजीच्या मोठ्या गंजात पडली. रडण्याचा आवाज ऐकताच लोकांनी धाव घेतली. तिला तत्काळ गंजातून बाहेर काढण्यात आले. मात्र तोपर्यंत ती गंभीररित्या होरपळली होती.

कुटुंबीयांनी तिला उपचारार्थ खासगी रुग्णालयात नेले, मात्र प्रकृती नाजूक असल्याने मेडिकल रुग्णालयात पाठविण्यात आले. त्रिशाची प्रकृती सुरुवातीपासूनच चिंताजनक होती. सोमवारी सकाळी तिचा मृत्यू झाला. पानबुडे कुटुंबाला या घटनेचा मोठा मानसिक आघात बसला आहे. परिसरातही सर्वत्र शोक पसरला आहे. वाठोडा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# सोन्याच्या दरात प्रथमच घसरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
नवरात्रीनंतर सातत्याने सोन्याच्या दरात वाढ नोंदवली जात आहे. त्यामुळे सध्या सोन्याचे दर आजपर्यंतच्या विक्रमी उंचीवर आहे. दिवाळीच्या तोंडावर सोन्याच्या दराने ग्राहकांची चिंता वाढवली असतांनाच मंगळवारी (२२ ऑक्टोंबर) सराफा बाजार उघडल्यावर एक सुवर्णवार्ता पुढे आली आहे.

त्यानुसार आठवड्याभरात प्रथमच सोन्याचे दर किंचीत कमी झाले आहे. नागपुरात दिवाळीच्या तोंडावर २१ ऑक्टोंबरला बाजार उघडल्यावर सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी ७८ हजार ४०० रुपये प्रति दहा ग्राम होते. परंतु रात्री बाजार बंद होताना हे दर वाढून ७८ हजार ६०० रुपयापर्यंत विक्रमी उंचीवर गेले. परंतु दुसऱ्याच दिवशी मंगळवारी (२२ ऑक्टोंबर) सराफा बाजार उघडल्यावर सकाळी ११ वाजता सोन्याच्या दरात आठवड्याभरात प्रथमच किंचित घट झाली. त्यामुळे दर ७८ हजार ५०० रुपये नोंदवले गेले.



दिवाळीत ग्राहक मोठ्या संख्येने सोने-चांदीचे दागिने खरेदी करतात. परंतु सोन्याच्या दर उंचीवर असल्याने ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे. नागपुरातील सराफा बाजारात २१ ऑक्टोबरला रात्री बाजार बंद होतांना सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार ६०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार १०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ३०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार १०० रुपये नोंदवले गेले.

परंतु २२ ऑक्टोंबरला बाजार उघडल्यावर मात्र सोन्याच्या दरात किंचित घट झाली. त्यामुळे सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार २०० रुपये, नोंदवले गेले. दरम्यान सोन्याचे दर वाढले असले तरी पुढे हे दर आणखी वाढणार असल्याने आता सोने- चांदीच्या धातूत गुंतवणूक लाभदायक असल्याचा दावा नागपुरातील सराफा व्यवसायिक करत आहे.

# प्रधान वनसचिवांना अवमानना नोटीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
राज्याच्या वन विभागाचे प्रधान सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी यांच्या वर्तणुकीतून अहकारांचा गंध येत आहे. जर वन विभाग एखाद्या जागेवर मालकी हक्क दाखवत आहे, तर मग त्या विभागाच्या प्रधान सचिवांनी त्याबाबत माहिती असायला हवी.

मात्र ते जबाबदारी ढकलण्याचे काम करतात, अशा कठोर शब्दात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्रधान सचिवांना फटकारले आणि त्याच्या नावाने अवमानना नोटीस काढली, मात्र एका तासातच आधीचा आदेश रद्द केला. नागपूर ते फेटरी दरम्यानच्या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत सुनावणी करताना सोमवारी उच्च न्यायालयात ही नाट्यमय घडामोड बघायला मिळाली.

विदर्भाच्या महामार्गाच्या विकासाबाबत ॲड. अरुण पाटील यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या.नितीन सांबरे आणि न्या.वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली.

नागपूरच्या नवीन काटोल नाका ते फेटरीदरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरणे वनविभागाच्या आडमूठी भूमिकेमुळे रखडले आहे. उच्च न्यायालयाने तीन महिन्यांपूर्वी रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत आदेश दिले होते आणि वनविभागाला याप्रकरणी एनएचएआयला सहकार्य करण्याचे आदेश दिले होते.

रस्त्याच्याकडेला उपलब्ध जागेचाच वापर करून रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत न्यायालयाने उपाययोजना सुचविली होती. मात्र वन विभाग यात सातत्याने अडथळा निर्माण करत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

**न्यायालयाचा संताप**

सुनावणीदरम्यान वनविभागाचे प्रधान सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी यांनी शपथपत्र दाखल केले आणि एनएचआयला जमिनीच्या अलाईनमेंटबाबत माहिती देण्याबाबत आदेश देण्याची विनंती केली. प्रधान सचिवांच्या या भूमिकेमुळे न्यायालय प्रचंड संतापले.

न्यायालयाने आदेश दिल्यावरही मागील तीन महिन्यापासून याप्रकरणी एक इंच प्रगतीही झालेली नाही. मागील एका शतकापासून वन विभागाकडे संबंधित जमिनीचे मालकत्व आहे, तरी देखील त्यांनाच जमिनीबाबत माहिती नाही.

याशिवाय वन विभागाने स्वतः रस्त्याच्या दोन्ही बाजूला संरक्षित भिंत बांधली आहे. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी पुरेशी जागा असताना प्रधान सचिव अशाप्रकारचे वक्तव्य करतात ही बाब समजण्यापलिकडे आहे, असे न्यायालय म्हणाले.

न्यायालयाने अवमानना नोटीस दिल्यावर सरकारी वकील ॲड.देवेंद्र चव्हाण यांनी प्रधान वनसचिवांची बाजू मांडण्याच्या प्रयत्न केला आणि लगेच कारवाई करण्याची हमी दिली. यामुळे न्यायालयाने त्यांना एका तासाची संधी दिली. न्यायालयाने फटकारल्यावर वन विभागाने सक्रियता दाखवत एनएचआयला सर्व प्रकारचे सहकार्य करण्याची हमी दिली. न्यायालयाने या हमीनंतर आधीचा आदेश रद्द करत प्रधान सचिवांवरील अवमानना नोटीस मागे घेतला.

# एमडी विक्रेता पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने प्रतापनगर ठाण्यांतर्गत एका ड्रग्स विक्रेत्याला अटक केली. तो परिसरातील एका महाविद्यालयाजवळ संशयास्पदरित्या फिरताना आढळला होता. आरोपीजवळून १ लाख २० हजार रुपये किंमतीचे १२ ग्रॅम एमडी पावडर जप्त करण्यात आले आहे. नजीम बेग अहफाज बेग मिर्झा (२८) रा. मोमिनाबाद कॉलनी, पांढरकवडा, यवतमाळ असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलिसांचे पथक प्रतापनगर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मोखारे महाविद्यालयाजवळ एक तरुण संशयितरित्या फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र घेराबंदी करून त्याला पकडण्यात आले. झडतीमध्ये त्याच्या पॅन्टच्या खिशात १२ ग्रॅम एमडी पावडर मिळाले. पोलिसांनी आरोपीकडून एमडी आणि मोबाईल फोनसह एकूण १ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त केला. त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी प्रतापनगर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. मंगळवारी दुपारी न्यायालयात हजर करून त्याची सखोल चौकशी करण्यासाठी पोलिस कोठडी घेण्यात आली.

# अभिनेता नवाजुद्दिन सिद्दीकीवर गुन्हा दाखल करा

## सुराज्य अभियानाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
महाराष्ट्र पोलिसांचा गणवेश परिधान केलेला सिनेअभिनेता नवाजुद्दिन सिद्दीकी लोकांना जुगार खेळण्याचे आवाहन करत असल्याची धक्कादायक जाहिरात बिग कॅश पोकर या ऑनलाईन ॲपने केली आहे.

या जाहिरातीकडे दुर्लक्ष केले, तर अनेक अवैध, अनैतिक गाष्टींच्या जाहिरातींसाठी महाराष्ट्र पोलिसांच्या गणवेशाचा वापर केला जाऊ शकतो. बिग कॅश पोकर ऑनलाइन ॲपवर महाराष्ट्र पोलिसांनी तत्परतेने कठोर कारवाई करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभिमानाने केली आहे.

सुराज्य अभियानाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे यांनी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक आणि मुंबईचे पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार केली आहे. बिग कॅश पोकरचे मालक अंकुर सिंघ, व्यवस्थापक आणि विज्ञापनात काम करणारे अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्यावर गुन्हा नोंदवावा, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त आणि अपील) नियम १९७९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ द्वारे कठोर कारवाई करावी, अशी मागणी अभिषेक मुरुकटे यांनी केली आहे.

या जाहिरातीतून ऑनलाईन जुगारामुळे त्यांच्यात ह्यस्कीलह्ल येते, असे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. पोलीस दलातील कोणालाही स्वतःहून या ॲपवर कारवाई करावीशी वाटली नाही? या संदर्भात इतरांना तक्रार द्यावी लागत आहे, हे दुर्दैवी असल्याचेही मुरुकटे यांनी म्हटले आहे. या प्रकरणी पोलीस खात्याचे प्रमुख म्हणून गृहमंत्र्यांनीही लक्ष घालावे आणि कारवाई करावी, अशी मागणीही सुराज्य अभियानाने केली आहे.

## प्रवेश घ्या आणि टॅबलेट मिळवा...

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २२ :
राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय या संस्थांच्या यूपीएससी, एमपीएससीसह आयबीपीएसच्या व पोलीस आणि सैन्य भरती पूर्व प्रशिक्षणासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. यातून महाज्योतीने माघार घेतली असली तरी बार्टी, सारथी आणि टीआरटीआयसाठी प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात आली आहे.

एका प्रशिक्षण कार्यक्रमासाठी तीन ते चार संस्थांची निवड करण्यात आली असून प्रशिक्षणासाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य वाटणाऱ्या संस्थेची निवड करण्याचा पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या संस्थेला अधिक विद्यार्थी मिळावेत यासाठी प्रशिक्षण संस्थांनी चक्क विद्यार्थ्यांना आमिष दाखवण्याचा प्रकार सुरू केला आहे. प्रशिक्षण संस्थेची निवड करा आणि मोफत टॅबलेट अशी जाहिरातबाजी केली जात आहे.

समान धोरणामुळे प्रशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी मिळवण्यासाठी शर्यत सुरू आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना वेगवेगळे आमिष दाखविण्यात येत असल्याची माहिती आहे.

# मध्य नागपूरचा पेच; काँग्रेसमध्ये रस्सीखेच

## बंटी शेळकेंना पुन्हा संधी?; नंदा पराते, रमेश पुणेकर आग्रही; मुस्लीम समाजही प्रतिक्षेत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :
मध्य नागपूरमध्ये भाजपचे विकास कुंभारे यांची धाकधुक वाढली आहे. पण तशीच परिस्थिती काँग्रेसची आहे. कारण कुणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालायची, असा प्रश्न नेत्यांपुढे निर्माण झाला आहे.

गेल्यावेळी विकास कुंभारे यांना काट्याची टक्कर देणारे बंटी शेळके यांचे नाव आघाडीवर आहे. त्यांना पुन्हा संधी देऊन विजयासाठी जोरदार प्रयत्न करण्याचा निर्धार काँग्रेस करत आहे. मात्र, त्याचवेळी इतर इच्छुकांनीही नेत्यांपुढे पेच निर्माण केला आहे.

सलग तीन टर्म विकास कुंभारे यांनी मध्य नागपूरचा गड भाजपकडे ठेवला आहे. त्यापूर्वीच्या सात निवडणुका काँग्रेस आणि एक निवडणूक जनता दलाच्या उमेदवाराने जिंकली आहे. त्यामुळे पूर्वी मध्य नागपूर हा काँग्रेसचाच गड मानला जात होता. पण विकास कुंभारे यांच्या रुपात हलबा समाजाला प्रतिनिधित्व मिळाले आणि मध्यचे चित्रच पालटले.

आजही हलबा समाजाची ६० हजाराहून अधिक मते मध्य नागपुरात आहेत. पण गेल्या निवडणुकीत कुंभारे यांच्याबद्दलचा भाजपमध्ये असलेला रोष बंटी शेळके यांच्या पथ्यावर पडला. शेळके विजयी झाले नाही. त्यांची कामगिरी दखल घेण्यासारखी ठरली. २०१९ मध्ये बंटी शेळके यांचा अवघ्या ४ हजार मतांनी पराभव झाला होता. हा विकास कुंभारे यांच्यासाठी विजयी झाल्यानंतरही मोठा धक्का होता. त्यामुळेच आपली पुढच्या वेळी उमेदवारी धोक्यात आहे, याची जाणीव त्यांना झाली होती.

अर्थात त्यामुळेच महाविकास आघाडीकडून बंटी शेळकेच मध्यचे उमेदवार राहतील, हे यंदाही निश्चित होते. पण, ॲड. नंदा पराते आणि रमेश पुणेकर यांनी हलबा कार्ड समोर केले आहे. या मतदारसंघात काँग्रेसने हलबा समाजाकडे दुर्लक्ष केल्याची खंत त्यांनी नेत्यांकडे व्यक्त केली आहे.

मध्य नागपूरमध्ये मुस्लीम बहुल भाग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे आसिफ कुरेशी, हैदरअली दोसानी यांनी देखील काँग्रेसकडे उमेदवारीसाठी आग्रह धरला आहे. ११ पैकी ५ निवडणुकांमध्ये काँग्रेसचा मुस्लीम उमेदवार विजयी झाला आहे.

१९८० मध्ये याकुब कमर खान, १९८५ मध्ये शौकत कुरेशी मध्यमध्ये काँग्रेसचे आमदार होते. त्यानंतर १९९०, १९९५ आणि २००४ अशा सलग तीन निवडणुका अनिस अहमद यांनी जिंकल्या. २००१ ते २००९ या कालावधीत ते मंत्रीमंडळातही होते. त्यामुळे यंदा मुस्लीम समाजाला संधी मिळावी, असा आग्रह धरला जात आहे. काँग्रेसकडून नेमकी संधी कुणाला मिळणार? यावरही विजयाचे गणित अवलंबून आहे.